CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर | मंगळवार, ३० एप्रिल २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८० | पाने १२| किंमत रु. ६/-

# एससी, एसटी, ओबीसींचे आरक्षण अल्पसंख्याकांना देण्याचा काँग्रेसचा डाव : मोदी

**संविधान अन् आरक्षण बदलणार नाही**

**सोलापुरातील महासभेत पंतप्रधान मोदींची ग्वाही**

**एससी, एसटी, ओबीसी यांच्या विकासासाठी कटिबद्ध**

**मलई खाण्यासाठी काँग्रेसला हवी सत्ता**

**मोदी सरकारने खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय दिला**




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल**

देशात काँग्रेसच्या ६० वर्षाच्या कार्यकाळात एससी, एसटी आणि ओबीसी यांचे हक्क डावले. त्यांना विकासापासून वंचित ठेवले. त्या उलट केवळ १० वर्षात मोदी सरकारने एससी, एसटी व ओबीसी या घटकांना खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय दिला. त्यांच्या विकासाकडे प्राधान्याने लक्ष दिले, असे सांगतानाच काँग्रेसला देश चालवायचा नाही, त्यांना देशाच्या भल्याची चिंता नाही तर मलई खायची आहे, अशी घणाघाती टिका करतानाच एससी, एसटी, ओबीसींचे आरक्षण अल्पसंख्यांकांना देण्याचा काँग्रेसचा डाव असल्याचा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोलापुरात केला.

प्रचार करायला मुद्देच नसल्याने संविधान बदलणार आणि आरक्षण संपवणार, असा खोटा आरोप आमच्यावर इंडिया आघाडीच्या काही वरिष्ठ नेत्यांनी केला आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरही आरक्षण संपवू शकणार नाहीत. मोदींचा तर सवालच नाही. मोदीकडे आज जेवढे पाहिजे तेवढे मतदान आहे. पण तो रस्ता आम्हाला मान्य नाही. शेकडो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला. आमच्या पूर्वजांकडून पाप झाले असेल. मात्र माझ्यासाठी ही प्रायश्चित घेण्याची वेळ आहे, त्यामुळे आरक्षणासाठी जेवढी ताकद देता येईल, तेवढी ताकद देण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असा शब्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोलापूरच्या जाहीर सभेत बोलताना दिला. सोलापूर लोकसभा राखीव मतदार संघातील महायुती अंतर्गत भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारार्थ होम मैदानावर आयोजित सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते. यावेळी विचार मंचावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती. सोलापुरातील महासभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला.

(सविस्तर वृत्त पान ३ आणि ९ वर)

### 'पाच वर्षात पाच पंतप्रधान' हा फॉर्म्युला देशाला लुटण्यासाठी

काँग्रेसने सत्तेसाठी देशाचे तुकडे केले आहेत. पाच वर्षात पाच पंतप्रधान करण्याचा फार्मूला त्यांनी पुढे आणला आहे. तो फॉर्मुला देशात चालवू शकतो का ? त्या दिशेला आपण जाऊ शकतो का? या फार्मूल्यामुळे प्रत्येक वर्षी एक पंतप्रधान या फार्मूल्याने जेवढे लुटता येईल तेवढे लुटणे हाच त्यांचा उद्देश आहे. त्यांना देश चालवायचा नाही. देशाच्या भल्याची काँग्रेसला चिंता नाही. त्यांना मलई खायचे आहे, असा आरोप यावेळी मोदी यांनी केला. नकली शिवसेना असा उल्लेख करत या शिवसेनेत पीएमसाठी खूप उमेदवार असल्याचे सांगण्यात येते अशी टीकाही यावेळी त्यांनी केली.

### सोलापुरात पूर्वीच्या मताधिक्याचे रेकॉर्ड तोडा

सोलापूर लोकसभा राखीव मतदार सघातील भाजपचे उमेदवार आ. राम सातपुते हे सोलापूरच्या विकासासाठी निश्चितच काम करणार आहेत. त्यांना मत देणे म्हणजे थेट मोदींना मत पडणार आहे. येत्या ७ मेला राम सातपुते यांना मोठ्या संख्येने मतदान करा. पूर्वीचे मताधिक्याचे रेकॉर्ड तोडा असे आवाहन यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मोदी सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या जनधन, विश्वकर्मा, मुद्रा यासह विविध योजनांचा लेखाजोखा यावेळी आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी मांडला. मोदी सरकारने कश्मीरमध्ये ३७० कलम हटविले. इंडिया आघाडीत संभ्रमाची स्थिती आहे. नियत चांगली असेल तर परिणाम चांगले येतात, असेही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पद्मशाली समाजाचे मीठ खाल्ले

सोलापुरात पद्मशाली समाजातील लोक मोठ्या संख्येने आहेत. गुजरातमध्ये पद्मशाली समाजातील कुटुंबांच्या घरी मी अनेक वेळा भोजन केले आहे. त्यांचं मीठ खाल्ले आहे. आज गरिबांची सेवा करून ते कर्ज चुकतं करण्याचा प्रयत्न करीत आहे.

### वंचितांसाठी अनेक विकास योजना आणल्या

महाराष्ट्र हा डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकारक सामाजिक कार्याचा वारसा सांगणारे राज्य आहे. या महापुरुषांनी राज्यातील वंचित, उपेक्षितांना ताकद आणि प्रेरणा दिली. महाराष्ट्रातील त्या सामाजिक न्यायाच्या धर्तीवर देशभरात उपेक्षित, वंचित घटकांच्या हितासाठी मोदी सरकारने अनेक विकास योजना आणल्या. यशस्वीपणे राबवल्या, असेही मोदी म्हणाले.

### भाजपच्या काळात दोन वेळा राजकीय आरक्षणाला मुदतवाढ

एससी, एसटीसाठी संवैधानिक रूपात असलेले राजकीय आरक्षण दर दहा वर्षांनी मुदतवढ द्यावी लागते. ही मुदतवाढ भाजपच्या कार्यकाळात देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी भाजपचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात प्रथम मुदतवाढ दिली. त्यानंतर मोदी सरकारच्या कार्यकाळातही राजकीय आरक्षणाची मुदत वाढवली, असेही पंतप्रधान मोदींनी यावेळी स्पष्ट केले.

### वोट बँकेपेक्षा विकासावर भर दिला

मोदी सरकारने सामाजिक न्याय दिला. आमची नजर वोट बँकेवर कधीच नाही तर गावाचा, शहराचा विकास झाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. मतदार हा प्रथम नागरिक आहे. त्याचा विकास झाला पाहिजे, याला प्राधान्य आम्ही देतो. एखाद्या समाजात किती मतदार आहेत. याचा विचार आम्ही कधी केला नाही. मात्र त्यांचा विकास झाला पाहिजे, याचा विचार मात्र निश्चित केला आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.




## सत्तेत आल्यास जात, आर्थिक सर्वेक्षण : गांधी

**पाटन :** काँग्रेसला सत्ता मिळाल्यास प्राधान्याने जात आणि आर्थिक सर्वेक्षण केले जाईल, असे प्रतिपादन काँग्रेसचे नेते राहुला गांधी यांनी सोवारी येथील प्रचारसभेत केले. देशाच्या ९० टक्के लोकसंख्ये गे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मासावर्गीयांचा समावेश आहे. परंतु, तुम्हाला कॉर्पोरेट, मीडिया, खाजगी रुग्णालये, खाजगी विद्यापीठे किंवा सरकारी नोकरशहांध्ये त्यांचे प्रतिनिधित्व दिसणार नाही. आम्ही सत्तेत आल्यानंतर पहिले जात आणि आर्थिक सर्वेक्षण करू, असे राहुल गांधी यांनी सांगितले. सत्ताधारी भाजपा घटना बदलण्याची योजना आखत आहे.

## जयपूर, नागपूर, गोव्यासह १५ विमानतळ उडवण्याची धमकी

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २९ एप्रिल**

जयपूर, नागपूर आणि गोव्यासह १५ विमानतळ बॉम्बस्फोटांनी उडवून देण्याच्या धमकीचा मेल सो वारी प्राप्त झाला. त्यामुळे या सर्व विमानतळांची सुरक्षा वाढवून कसून शोधमोहीम राबवण्याचा आदेश अधिकाऱ्यांनी दिला आहे. पोलिसांना हा फसवा ई-मेल असल्याचा संशय आहे. ई-मेल पाठविणाऱ्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले.

अनेक विमानतळांना एकसारखे मेल प्राप्त झाल्यानंतर दोन दिवसांनी हे मेल आले असून, यापूर्वी पाठविण्यात आलेले मेल फसवे असल्याचे सिद्ध झाले. गोव्याच्या दाबोलीम विमानतळाला त्यांच्या अधिकृत ई-मेलवर मेल प्राप्त झाला. विमानतळ अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पोलिस आणि बॉम्बशोधक पथकाने शोध घेतला. आम्ही अतिरिक्त खबरदारी घेत आहोत. विमानतळावर सुरक्षा वाढवण्यात आली असली, तरी उड्डाणांवर कोणताही परिणाम झालेला नाही, असे संचालक एस. व्ही. टी. धनजया राव यांनी सांगितले.

राजस्थानातील जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विमानतळ संचालकांना आज सकाळी ई-मेल प्राप्त झाला आणि शोधमोहिमेनंतर अद्याप काही संशयास्पद आढळले नाही. आरोपींचा शोध घेण्यासाठी आम्ही वेगवेगळ्या राज्यांतील आमच्या समकक्षांशी सहकार्य करीत आहोत, असे अधिकाऱ्याने सांगितले. उत्तरप्रदेशातील कानपूर विमानतळालाही अशाच प्रकारचा मेल प्राप्त झाला. २६ एप्रिल रोजी कोलकाता, जयपूरसह अनेक विमानतळांना धमकी मिळाल्यानंतर विविध तपास यंत्रणांनी व्यापक शोध घेतला. मुंबई पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली.





## महत्त्वाचे...

### सीए परीक्षा वेळेवरच होणार

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीमुळे मे महिन्यात होणारी सीएची परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, या मागणीसाठी दाखल याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया अर्थात् आयसीएआयने निवडणुकीच्या तारखा पाहून परीक्षा ठरवलेली नाही, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड प्रमुख, न्या. जे. बी. पार्डिवाला व न्या. मनोज मिश्रा यांच्या न्यायासनाने म्हटले. लोकसभा निवडणुकांची तारीख ७ आणि १३ मे असून, परीक्षेची तारीख ६ व १२ मे आहे, असेही न्यायालयाने सांगितले.

### राज ठाकरे यांची पहिली सभा राणेंसाठी

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा देण्यात आल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते राज्यातील महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचाराला देखील लागले आहेत. मात्र, अद्याप राज ठाकरे यांनी प्रत्यक्ष एकाही मतदारसंघात सभा घेतली नाही. आता रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे पहिली सभा घेणार असल्याची माहिती आहे. ४ मे रोजी सायंकाळी पाच वाजता कणकवली येथे राज ठाकरे यांची सभा होणार आहे.



## पंतप्रधान मोदींना अपात्र ठरवण्याची याचिका फेटाळली

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २९ एप्रिल -**

देवी-देवतांच्या नावाने मते मागणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडणूक लढण्यापासून सहा वर्षे अपात्र ठरवण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. ही याचिका पूर्णपणे चुकीची असल्याचे आणि याचिकेत कोणतीही गुणवत्ता नसल्याचे न्या. सचिन दत्ता यांनी सांगितले. याचिकाकर्ते वकील आनंद एस. जोंधळे यांनी देवी-देवता आणि मंदिरांच्या नावावर मते मागितल्याबद्दल मोदींविरुद्ध कारवाई करण्याची विनंती केली होती. या माध्यमातून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले आहे तसेच भादंवि आणि लोकप्रतिनिधी कायद्यानुसार गुन्हाही केला असल्याचा दावा याचिकेत केला होता.

## मुख्यमंत्री रेड्डींना दिल्ली पोलिसांचा समन्स

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या बनावट व्हिडीओ प्रकरणात तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांना दिल्ली पोलिसांनी समन्स बजावून १ मे रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे. एक्सवर टाकण्यात आलेल्या या व्हिडीओ प्रकरणी पोलिसांनी रेड्डी यांच्यासह पाच जणांना नोटीस बजावली. एक्सवर हा बनावट व्हिडीओ पोस्ट करण्यासाठी कथितपणे वापरलेल्या मोबाईल फोनसह चौकशीसाठी हजर राहावे, असे त्यांना सांगण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. गृह मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या इंडियन सायबर क्राई कोऑर्डिनेशन सेंटरने शाह यांच्याशी संबंधित या व्हिडीओबद्दल तक्रार दाखल केल्यानंतर दिल्ली पोलिसांच्या विशेष सेलने रविवारी एफआयआर दाखल केला. त्यात कोटा रद्द करण्याची वचनबद्धता दर्शवणारी त्यांची विधाने होती.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची आज माळशिरस येथे जाहीर सभा

**५३ एकर क्षेत्रात जर्मन अँगलचा मंडप**

**उन्हापासून संरक्षणासाठी उपाययोजना**

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २९ एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा माळशिरस येथील कृषी विभागाच्या ५३ एकर क्षेत्रामध्ये उभारण्यात आलेल्या भव्य जर्मन अँगेलच्या मंडपामध्ये होणार आहे.

पंतप्रधान हेलिकॉप्टरने कृषी विभागाच्या मैदानावर सभेसाठी सकाळी ९ वा. दाखल होणार आहेत. या सभेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, आ. जयकुमार गोरे, आ. गोपीचंद पडळकर, आ. राम सातपुते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या जाहीर सभेसाठी सुमारे १ लाख नागरिकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून ६ हेलिकॉप्टर मैदान बनविण्यात आले आहेत. दुचाकी आणि चारचाकी वाहने, बससाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. सभेच्या अनुसंगाने वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला असून माळशिरस शहरातील वाहतूक नवीन बायपास मार्गाने वळविण्यात आली आहे.

### सभास्थळी स.६.३० पासून प्रवेश

सुरक्षा तपासणी वेळेमध्ये पूर्ण होण्यासाठी सभेस येणाऱ्या नागरिकांना सकाळी ६.३० वाजल्यापासून येण्याबाबत जिल्हा पोलीस प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनापूर्वी कम ीतकमी एक तास अगोदर सर्व नागरिकांनी स्थानापन्न होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सभेसाठी येणाऱ्या नागरिकांनी येताना मोठ्या बॅग, पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थ, ज्वालाग्रही पदार्थ सोबत आणू नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.

## सहा जागांवर महायुतीचा उमेदवार ठरेना

**मुंबई, २९ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे तीन दिवस उरले आहेत. मात्र, अजूनही ठाणे, पालघर, नाशिक, उत्तर मुंबई, उत्तर-पश्चिम, दक्षिण मुंबई या सहा जागांवर महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार जाहीर करण्यात आले नाहीत. या सर्व मतदार संघात २० मे रोजी मतदान होत आहे.

आज मुंबई, ठाणे आणि नाशिकमध्ये उबाठा गटाकडून अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजन विचारे यांनी अर्ज भरला. दुसरीकडे दक्षिण-मध्य मुंबईतून महायुतीकडून राहुल शेवाळे यांनी अर्ज दाखल केला. असे असले तरी, मविआ व महायुती दोघांनाही काही ठिकाणी उमेदवार निश्चित करता आले नाही. ज्या ठिकाणी महायुतीचा उमेदवार ठरला, तिथे मविआचा उमेदवार ठरला नाही, तर ज्या ठिकाणी मविआला उमेदवार मिळाला, तिथे महायुतीचा उमेदवार ठरला नाही.

● **दक्षिण मुंबई :** येथे उबाठा गटाकडून अरविंद सावंत यांनी अर्ज भरला. मात्र, महायुतीत जागा नेकी कोणता पक्ष लढणार, यावर चर्चा सुरू आहे. शिवसेनेकडून यामिनी जाधव यांचे नाव निश्चित मानले जात असताना भाजपानेही येथे दावा केला आहे.

● **ठाणे :** उबाठा गटाकडून राजन विचारे यांनी उमेदवारी अर्ज भरला. मात्र, महायुतीचा उमेदवार ठरलेला नाही. ठाण्यात शिवसेनेकडून नरेश म्हस्के यांचा उमेदवारी निश्चित असल्याचे बोलले जाते.

● **उत्तर मुंबई :** महायुतीचे उमेदवार पीयूष गोयल मंगळवारी उमेदवारी अर्ज भरणार असून, महाविकास आघाडीत जागा कुणाला सोडायची, यावर चर्चा सुरू आहे.

● **उत्तर-पश्चिम मुंबई :** उबाठा गटाकडून अमोल कीर्तीकर यांना आज पक्षाचा एबी फॉं मिळाला. तिथेच, महायुतीचा उमेदवार अजूनही ठरलेला नाही. शिवसेनेने रवींद्र वायकर यांना उमेदवारी देण्याची तयारी केली असली, तरी त्यांच्या नावाला मनसे आणि भाजपाचा विरोध आहे.

● **पालघर :** उबाठा गटाकडून भारती कामडी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र, महायुतीकडून राजेंद्र गावीत यांना उमेदवारी नेकी कोणत्या पक्षातून द्यायची हा निर्णय व्हायचा आहे.

● **नाशिक :** उबाठा गटाकडून राजाभाऊ वाझे यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. महायुतीकडून अद्याप उमेदवार जाहीर होऊ शकला नाही.

## यूपीएससी पूर्वपरीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली :** यूपीएससी २०२५ मध्ये होणाऱ्या विविध पदांसाठी भरती परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. पूर्व परीक्षा २५ मे रोजी होणार आहे. यूपीएससीच्या संकेतस्थळवर हे वेळापत्रक उपलब्ध आहे. वेळापत्रकानुसार, प्रिलिम्स परीक्षा आणि आयएफएसचे (इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस) आयोजन २५ मे २०२५ रोजी करण्यात आले आहे. या संदर्भातील अधिसूचना २२ जानेवारी २०२५ ला जारी करण्यात येईल. ११ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.



www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### डिपॉझिट जप्त



**निवडणुकींच्या** काळात अनेकदा आपण जाहीर सभांमधून नेते मंडळी एकमेकांना आव्हान देताना बघत असतो. 'या निवडणुकीत तुझं डिपॉझिटच जप्त होणार' असेही काही वेळा कानावर पडत असते. निवडणुकीत डिपॉझिट जप्त होण्याला का बरे इतके मानहानीकारक मानल जाते, असाही प्रश्न अनेकांच्या मनात येतो. निवडणूक निकाल लागल्यानंतर एक गोष्ट सर्वाधिक बोलली जाते, ती म्हणजे डिपॉझिट जप्तीची. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ अन्वये एखादा उमेदवार लोकसभा किंवा विधानसभा निवडणूक लढवत असेल, तर त्याला निवडणूक आयोगाकडे ठराविक रक्कम जमा करावी लागते. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये ही रक्कम वेगवेगळी असते.

### कोणत्या निवडणुकीत किती डिपॉझिट?

**निवडणूक आयोगाच्या मते, वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये डिपॉझिटची रक्कम बदलते.**

- १) लोकसभा निवडणुकीत उमेदवाराला सुरक्षा ठेव म्हणून २५ हजार रुपये जमा करावे लागतात. ही रक्कम सर्वसाधारण श्रेणीतील उमेदवारासाठी आहे. त्याच वेळी एसटी, एससी श्रेणीतील उमेदवारांना १२,५०० रुपये जमा करावे लागतात.
- २) विधानसभा निवडणुकीसाठी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराला १० हजार रुपये आणि एसटी, एससी प्रवर्गातील उमेदवाराला ५ हजार रुपये जमा करणे आवश्यक आहे.
- ३) राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत प्रत्येक प्रवर्गातील उमेदवाराला समान रक्कम जमा करावी लागते. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला १५ हजार रुपयांची रक्कम जमा करावी लागते.

### डिपॉझिट कधी जप्त होते?

निवडणूक आयोग नावनोंदणी करणाऱ्या उमेदवारांकडून निश्चित रक्कम घेतो. निवडणुकीत ठराविक मते न मिळाल्यास डिपॉझिट जप्त केले जाते. मतमोजणीत कोणत्याही उमेदवाराला १६.६६ टक्के मते मिळणे आवश्यक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास उमेदवाराचे डिपॉझिट जप्त केले जाते. उदाहरणार्थ, विधानसभेच्या जागेवर दोन लाख मते असतील आणि त्या जागेवरून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला ३३,३३२ पेक्षा कमी मते मिळाली असतील, तर त्याचे डिपॉझिट जप्त केले जाते. त्याचबरोबर राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत उमेदवाराला १/६ मते मिळणे आवश्यक आहे.

### किती रक्कम परत मिळते?

उमेदवाराला सिक्युरिटी डिपॉझिट वाचविण्यासाठी १/६ पेक्षा जास्त मते मिळवावी लागतात, परंतु, उमेदवार विजयी झाला तर सिक्युरिटी डिपॉझिट त्याला परत केले जाते. याशिवाय १/६ पेक्षा जास्त मते मिळविणाऱ्या उमेदवारालाही रक्कम परत केली जाते. याशिवाय उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यास त्याला रक्कम परत मिळते.

# सुरतनंतर इंदूरमध्येही काँग्रेसला धक्का

## अक्षय बम यांनी मागे घेतली उमेदवारी; भाजपात प्रवेश

◆ **इंदूर, २९ एप्रिल**

गुजरातच्या सुरतनंतर आता मध्यप्रदेशच्या इंदूरमध्येही काँग्रेसला जबरदस्त झटका बसला. या मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांती बम यांनी सोमवारी अचानक आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. ते लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती भाजपाचे वरिष्ठ नेते कैलास विजयवर्गीय यांनी दिली.

इंदूर लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांना कुठलीही कल्पना न देता अक्षय बम यांनी अचानक आज आपला अर्ज मागे घेतला. इंदूरचे जिल्हाधिकारी आशिष सिंह यांनी या वृत्ताची पुष्टी केली आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर बम यांनी थेट विजयवर्गीय यांची भेट घेतली आणि त्यांच्याच कारमधून प्रवास केला.



यावेळी त्यांच्यासोबत भाजपाचे स्थानिक आमदार रमेश मेंडोला हे देखील होते.

अक्षय बम यांच्यासोबतचे छायाचित्र 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करताना, त्यांचे भाजपात स्वागत आहे, अशी ओळ विजयवर्गीय यांनी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वात अक्षय बम लवकरच भाजपात येणार आहेत, असेही विजयवर्गीय यांनी एक्सवर म्हटले आहे. विशेष म्हणजे, अक्षय बम पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. काँग्रेसने त्यांना भाजपाचे विद्यमान खासदार शंकर लालवानी यांच्याविरोधात उमेदवारी दिली होती. ◂(वृत्तसंस्था)

# गुजरातमध्ये पंतप्रधान मोदींचा 'डुप्लिकेट' चर्चेत!

◆ **अहमदाबाद, २९ एप्रिल**

बरेचदा एखाद्या व्यक्तीचे एखादा सेलेब्रिटी, राजकीय किंवा क्रिकेटर्सच्या चेहऱ्याशी असलेले साम्य थक्क करणारे असते. सध्या इन्स्टाग्रामवर अशाच एका व्यक्तीचा चेहरा आणि पेहराव लोकांना संभ्रमात टाकताना दिसत आहे. कारण, या व्यक्तीचा चेहरा आणि पेहराव पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखा आहे.

ही व्यक्ती गुजरातमध्ये पाणीपुरी विक्रीचे काम करते. या व्यक्तीचा व्हिडीओ व्हायरल केल्यावर नेटकऱ्यांकडून त्याला पसंती मिळत आहे. अनेक युझर्सनी या व्हिडीओवर कमेंट्सही केल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यांचा आवाज पंतप्रधान मोदींच्या आवाजाशी ७० टक्क्यांपर्यंत मिळताजुळता आहे, अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.

पंतप्रधान मोदी यांच्यासारख्या दिसणाऱ्या या व्यक्तीचे नाव अनिल ठक्कर आहे; पण लोक त्यांना मोदी या नावाने ओळखतात. अर्थात् त्यामागे काही विशेष कारणे आहेत. त्यांच्या चेहऱ्याच्या एका बाजूची ठेवण आणि पेहराव अगदी पंतप्रधान मोदींसारखा आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी ते नरेंद्र मोदी असल्याचा भास होतो. ही गोष्ट ठक्कर यांना खूप आवडते.

मोदी चहा विक्रेता होते आणि मी पाणीपुरीवाला आहे. आमच्यात फारसा फरक नाही, असे ठक्कर नमूद करतात.



तुम्ही पाणीपुरीऐवजी चहा विकला असता, तर मोठ्या पदापर्यंत पोहोचला असता, असे लोक म्हणत असल्याचे ठक्कर सांगतात. अनिल ठक्कर यांनी वयाच्या १५व्या वर्षापासून पाणीपुरी विक्री सुरू केली. त्यांनी हे दुकान सुरू केले, तेव्हा ते २५ पैशांना पाणीपुरी विकत होते. विशेष म्हणजे, ते वर्षाला लाखो रुपयांची पाणीपुरी विकतात. ◂(वृत्तसंस्था)

# अपक्ष उमेदवारांचा भर 'तुतारी'वर

## अपक्षांना १९० चिन्हे

◆ **नाशिक, २९ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत अपक्ष उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाने १९० चिन्हांची यादी प्रसिद्ध केली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे चिन्ह असलेल्या तुतारी वाजविणारा मनुष्य या चिन्हाशी नामसाधर्म्य असलेल्या तुतारी चिन्हासाठी अपक्षांनी आतापासून 'फिल्डिंग' लावली आहे. या व्यतिरिक्त कपाट, सफरचंद, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरा, खाट, भेटवस्तू, गॅस सिलेंडर अशा चिन्हांचा त्यात समावेश आहे.



नाशिक व दिंडोरी मतदारसंघासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ६ मे रोजी माघारीनंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. त्याच दिवशी उमेदवारांना चिन्हाचे वाटप केले जाणार आहे. निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या यादीनुसार, देश व राज्यस्तरावर नऊ राजकीय पक्षांना मान्यता दिली असून, त्यांचे निवडणूक चिन्हही अंतिम करण्यात आले.

याशिवाय, अपक्ष उमेदवारांसाठी आयोगाने १९० चिन्हे अंतिम केले आहेत. त्यात शिट्टी, तंबू, कलिंगड, दूरध्वनी, टीव्ही, रिमोट, त्रिकोण, सोफा, कात्री, सेफ्टी पिन, प्रेशर कूकर, शिवण यंत्र, पेनड्राईव्ह, रोड रोलर, टुथपेस्ट, संगणक माऊस, ऑटोरिक्षा, पाव, कॅमेरा, कॅरम बोर्ड अशा चिन्हांचा समावेश आहे. त्यामुळे निवडणुकीत अपक्षांना कोणते चिन्ह मिळणार, यावरून मतदारांमध्ये आता उत्सुकता लागून राहिली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# प्रचाराच्या झंझावातातही आहाराबाबत नेते सजग

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

एप्रिल-मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात होणाऱ्या सभांसाठी मातब्बर नेते आहाराबाबत सजगता बाळगत प्रचारसभा घेत आहेत. योग्य आहार, भरपूर पाणी पिणे आणि जमेल तेवढी झोप घेणे याची सांगड घालत नेत्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे.

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार एकेका दिवशी किमान चार सभा, मेळावे व पत्रपरिषदा घेत आहेत. त्या-त्या गावी मुक्काम करून सभेनंतर महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीगाठी घेत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांना



भेटण्यासाठी सदैव सज्ज असतात. एकेका ठिकाणी ठाण मांडून प्रश्न निकाली काढतात आणि वादावर तोडगा काढतात. ते कोल्हापूर येथे दोन दिवस मक्कामी होते. राज्यभर प्रचार करीत असतानाही मुख्यमंत्री शिंदे मध्येच मुंबई ठाण्याचा दौराही करतात. रात्री सभा घेतात व त्यानंतरही लोकांना भेटतात. या काळात ते थोडाफार आहार करतात.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिवसाला तीन ते पाच सभा घेतात. सध्या ते केवळ एकवेळ जेवतात. न्याहारी भरपूर घेतात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दिवस पहाटे पाच वाजता सुरू होतो. सकाळी सात वाजता संपर्क दौरा सुरू होतो. बारामतीतून विविध ठिकाणांहून सभा घेऊन परत येतात.

या नेत्यांच्या दिमतीला वाहने हजर आहेत. मध्यंतरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना अतिश्रम आणि उन्हामुळे चक्कर आली. मात्र, त्यांनी काही वेळातच भाषण देऊन प्रचारातील उत्साह दाखवून दिला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे प्रचारासाठी फिरत आहेत. ते आहाराबाबत अत्यंत जागरुक आहेत. ते मोजकेच पदार्थ घेतात. प्रचारादरम्यान कुटुंबातील एक व्यक्ती त्यांच्या समवेत असते. अनेकदा पत्नी रश्मी असतात, कधी धाकटा मुलगा तेजस, तर कधी सचिव मिलिंद नार्वेकर सोबत असतात. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले प्रचाराच्या काळात तेलकट पदार्थ घेण्याचे टाळतात. चाळीसच्या आसपास तापमान असल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनाही काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. ◂(वृत्तसंस्था)



**राजनाथसिंह यांनी सोमवारी लखनौ मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत उत्तरप्रदेश आणि उत्तराखंडचे मुख्यमंत्री अनुक्रमे योगी आदित्यनाथ व पुष्करसिंह धामी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात स्मृती इराणी यांनी अमेठीतून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव व भाजपाचे इतर नेते उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यापूर्वी इराणी यांनी गौरीगंज येथील भाजपा कार्यालयातून रोड शो आयोजित केला.**



# राजगडमध्ये दिग्विजयसिंह अडचणीत

## मतांसाठी वणवण फिरण्याची वेळ

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

आपल्या वादग्रस्त विधानाने काँग्रेस पक्षाला वेळोवेळी अडचणीत आणणारे मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह राजगड या आपल्या



लोकसभा मतदारसंघात अडचणीत आले आहेत. त्यामुळे ही माझी शेवटची निवडणूक आहे, यानंतर मी निवडणूक लढणार नाही, (त्यामुळे यावेळी मला कसेही करून निवडून द्या) असे भावनिक आवाहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

दिग्विजयसिंह यांना माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याविरोधात विदिशा मतदारसंघातून निवडणूक लढवायची होती, पण काँग्रेसने त्यांना राजगडमधून उमेदवारी दिली. या मतदारसंघात त्यांचा मुकाबला भाजपाचे विद्यमान खासदार रोडमल नागर यांच्याशी आहे. नागर २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून निवडून आले होते. यावेळी विजयाची हॅट्ट्रिक करण्यासाठी ते मैदानात उतरले आहेत.

नागर पंतप्रधान मोदी यांच्या नावावर आणि त्यांच्या सरकारच्या विकासकामावर मते मागत आहे. तर, दहा वर्षे तुम्ही एक खासदार पाहिला आहे, आता पाच वर्षे मला द्या, असे आवाहन दिग्विजयसिंह करीत आहेत.

राजगड मतदारसंघ हा दिग्विजयसिंह यांना नवा नाही. १९८४ आणि १९९१ ची लोकसभा निवडणूक त्यांनी येथून जिंकली होती. १९८९ च्या निवडणुकीत मात्र त्यांचा पराभव झाला होता. १९९३ मध्ये खासदार असतानाच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर त्यांना खासदारकी सोडली होती. त्यावेळी झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांचे भाऊ लक्ष्मणसिंह विजयी झाले होते. १९९६, १९९८ आणि १९९९ अशा तीन निवडणुका लक्ष्मणसिंह यांनी काँग्रेस उमेदवार म्हणून या मतदारसंघातून लढवल्या आणि जिंकल्या होत्या. २००४ ची लोकसभा निवडणूक लक्ष्मणसिंह यांनी भाजपा उमेदवार म्हणून लढवत जिंकली होती.

२०१९ ची लोकसभा निवडणूक दिग्विजयसिंह यांनी भोपाळ मतदारसंघातून लढवली होती. भाजपाच्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी त्यांचा पराभव केला होता. राजगड लोकसभा मतदारसंघातील आठ विधानसभा मतदारसंघापैकी सहा विधानसभा मतदारसंघ भाजपाकडे आहे, काँग्रेसकडे फक्त दोन विधानसभा आहेत. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत या ८ मतदारसंघात भाजपाला काँग्रेसपेक्षा १ लाख ७१ हजार मते जास्त मिळाली होती.

# जवानी दाखवण्यासाठी दिग्गीराजांच्या पदयात्रा

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

राजगड लोकसभा मतदारसंघात सुरुवातीला भाजपा उमेदवार रोडमल नागर यांच्याबद्दल मतदारांमध्ये नाराजी होती. त्यामुळे नागर यांनी मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत जाहीर सभेत मतदारांची माफीही मागितली होती. तुम्ही मला मत देऊ नको, पण मोदींना मत द्या, भाजपाला मत द्या, असे आवाहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली.

गृहमंत्री अमित शाह यांनी नागर यांच्यासाठी प्रचारसभा घेत वातावरण बदलवून टाकले. 'दिग्विजयसिंह इनका जनाजा ऐसा निकाला जाये, जैसे आशिक का जनाजा निकाला जाता है', असे आवाहन करीत शाह यांनी खळबळ उडवून दिली.

दिग्विजयसिंह पाकिस्तानी दहशतवादी हाफीज सईदचा उल्लेख 'साहब' असा करतात, झाकिर नाईकची गळाभेट घेतात, याकडे शाह यांनी लक्ष वेधले. परिणामी रोडमल नागर विरुद्ध दिग्विजयसिंह या लढतीला आता अमित शाह विरुद्ध दिग्विजयसिंह असे वळण मिळाले.

दिग्विजयसिंह ७७ वर्षांचे आहेत. काँग्रेसने बुढ्याला उमेदवारी दिली, असा आरोप भाजपा करीत होती, याचा उल्लेख करीत दिग्विजयसिंह म्हणाले की, काँग्रेसने बुढ्याला उमेदवारी दिली, असा आरोप भाजपा करीत आहे, त्यामुळे माझी जवानी दाखवण्यासाठी मी पदयात्रा काढत आहे.

'वादा निभाओ यात्रा' अशी पदयात्रा करीत दिग्विजयसिंह या आठ विधानसभा मतदारसंघांत पदयात्रा करीत आहेत. दिग्विजयसिंह यांच्यासाठी त्यांचे पुत्र जयवर्धनसिंह आणि नातू सहस्त्रजयसिंह मत मागत आहे. म्हणजे त्यांच्या तीन पिढ्या मत मागत फिरत आहे. राजघराण्यातील दिग्विजयसिंह यांच्यावर मतांसाठी वणवण फिरण्याची वेळ या निवडणुकीत आली. यावरून ही निवडणूक त्यांच्यासाठी अडचणीची असल्याचे दिसून येते.


दिग्विजयसिंह यांना जशी आपल्या विजयाची चिंता आहे, तशीच गुणा लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार ज्योतिरादित्य शिंदे यांचा पराभवही करायचा आहे. मध्यप्रदेशच्या राजकारणात कधीकाळी काँग्रेसमध्ये दिग्विजयसिंह, कमलनाथ आणि ज्योतिरादित्य शिंदे असे तीन गट होते. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीनंतर ज्योतिरादित्य शिंदे मुख्यमंत्री होऊ नये म्हणून दिग्विजयसिंह यांनी कमलनाथ यांना पाठिंबा दिला होता. त्याची परिणती नंतर ज्योतिरादित्य शिंदे यांच्या काँग्रेसमधील बंडात आणि भाजपात प्रवेश करण्यात झाली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

# रामराम भारतात नाही, मग पाकिस्तानात जाऊन करायचे का?

## देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

रामराम भारतात नाही, तर मग काय पाकिस्तानात जाऊन करायचे का? असा प्रश्न उपस्थित करीत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला. तुम्ही केलेले एकतरी विकासाचे काम दाखवा, असे आव्हानदेखील फडणवीसांनी दिले.



उद्धव ठाकरे यांनी रत्नागिरीच्या जाहीर सभेत बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींना मत म्हणजे विकासाला नव्हे तर, विनाशाला मत देणे होय. त्यामुळे जनतेने जागरुक राहावे. मोदी मतांसाठी राम-राम करीत फिरत आहेत, असे विधान केले होते. या विधानाचा खरपूस समाचार घेत उपमुख्यमंत्री फडणवीसांनी सोलापुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ठाकरेंना सडेतोड उत्तर दिले.

पंतप्रधान मोदींनी केलेला विकास पूर्ण देश पाहतो. तुम्ही केलेले एकतरी विकासाचे काम दाखवा. तीन वर्षे मुख्यमंत्री राहिले, एक तरी विकासाचे काम दाखवा. आयुष्यात त्यांनी काही विकासाचे काम केले नाही. त्यांनी मोदींबद्दल बोलणे म्हणजे सूर्याकडे थोबाड करून थुंकण्यासारखे आहे, असा पलटवारही फडणवीस यांनी केला. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# लोकशाहीच्या महोत्सवातील नारीशक्तीचा सहभाग

सध्या १८ व्या लोकसभेच्या गठनासाठी निवडणूक होत आहे. मतदानाचे दोन टप्पे पार पडले आहेत. या दोन्ही टप्प्यांमध्ये महिला मतदारांनी दिलेला प्रतिसाद अभूतपूर्व असाच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या दोन्ही कार्यकाळात नारीशक्तीला दिलेले महत्त्व या निवडणुकीच्या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. मतदानाच्या प्रक्रियेतील महिलांचा सहभाग लक्षणीय दिसून येत आहे. आर्थिक-सामाजिक समानता मिळायला लागल्यापासून लोकशाहीत महिला अधिक सक्रिय झाल्याचे आनंददायी चित्र पाहायला मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने महिलांच्या उन्नतीचाच विचार देशापुढे मांडला आणि तो अंमलात आणण्याचाही कसोशीने प्रयत्न केला. त्याचाच हा परिपाक आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांनी एक पाऊल पुढे टाकत भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्याचा केलेला संकल्प आपली लोकशाही भविष्यात अधिक प्रगल्भ होणार, याचेच संकेत देत आहे. सामाजिक-आर्थिक समानता प्रस्थापित होत असेल तर महिलांची पावले आपोआप मतदान केंद्राकडे वळतात, असे जगभरातील अनेक देशांमध्ये झालेल्या सर्वेक्षणांती आढळून आले आहे. गेल्या काही वर्षांत भारतात स्त्री-पुरुष भेदभाव मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे पाहायला मिळत आहे. ज्या देशात लैंगिक भेदभाव केला जातो, त्या देशातील महिला मतदानाच्या प्रक्रियेत अपेक्षित सहभाग नोंदवत नाहीत, हे वास्तव आहे. भारत या वास्तवाला आता अपवाद ठरत आहे, ही आनंदाची बाब मानावी लागेल. आज एकही क्षेत्र असे नाही, ज्यात महिलांनी आघाडी घेतली नाही. मग, मतदानाच्या प्रक्रियेत तरी महिला मागे कशा राहतील? मोदींच्या दुसऱ्या कार्यकाळात संसदेत नारीशक्ती वंदन विधेयक पारित झाले आहे. त्यानुसार पुढच्या निवडणुकांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. ही बाबसुद्धा महिलांना मतदानाच्या प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यास प्रेरित करते आहे. महिला आत्मनिर्भर होत आहेत; आत्मसक्षमही होत आहेत. आत्मसशक्तीकरण एकदम घडून आलेले नाही. त्यासाठी स्वातंत्र्यानंतरची ७५ वर्षे खर्ची पडली आहेत. आत्मसशक्तीकरणाचा संबंध हा लैंगिक समानतेशीही आहे. भारतीय महिला सशक्त व मजबूत अशा मतपेटीच्या रूपात पुढे येतील, असे आकलन देशात झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर 'आयरिश टाईम्स'ने केल्याचे आपल्याला स्मरत असेलच. त्या काळात त्यांनी केलेले आकलन किती परिपूर्ण होते, हे आता आपल्या सर्वांच्याच अनुभवास येत आहे. इंदिरा गांधी यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे सांभाळली, त्याचवेळी जागतिक समुदायाचे डोळे विस्फारले होते. आता तर द्रौपदी मुर्मू या भारताच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती बनल्या आहेत. जगातल्या सर्वाधिक लोकसंख्येच्या देशात एक महिला सक्षमपणे राष्ट्रपतिपद सांभाळते आहे, ही बाब महिलांच्या सशक्तीकरणाची प्रक्रिया भारतात किती मजबूत झाली आहे, याचा साधार पुरावा देणारी आहे. सध्या देशाच्या अर्थमंत्रिपदी निर्मला सीतारामन् या महिलाच आहेत. त्यांनी या पदावर काम करताना देशाच्या अर्थव्यवस्थेत झालेली सुधारणा संपूर्ण जगाने पाहिली आहे. अशी सगळी परिस्थिती असताना लोकशाहीचे निवडणुकीच्या प्रक्रियेतील महिलांचा लक्षणीय सहभाग आपली लोकशाही भविष्यात जगात सर्वश्रेष्ठ ठरणार, याचेच संकेत देत आहे. भारताला लोकशाहीचे धडे देऊ पाहणाऱ्या आणि स्वतःला विकसित म्हणवणाऱ्या अनेक देशांना भविष्यात भारताकडूनच धडे घ्यावे लागणार, यात शंका नाही. महिला ग्रामीण भागातील असो की शहरी भागातील, अशिक्षित असो की सुशिक्षित, ती कमावती असो वा मग गृहिणी, त्यांना हे चांगले कळले आहे की, आपण मत कुणाला दिले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्ष आज आपल्या जाहीरनाम्यामध्ये महिलांना प्राधान्य देताना दिसतो आहे. जो राजकीय पक्ष महिलांच्या समस्या समजून घेईल, त्या सोडविण्याचा प्रयत्न करेल आणि न्याय देईल, त्या पक्षाला महिला मतदान करतात, हा अनुभव गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या निवडणुकांमधून येत आहे. त्यासाठी एक उदाहरण आपल्याला लक्षात घेता येईल. २०१५ साली बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक होती आणि सत्तेत आल्यास दारूबंदी केली जाईल, असे आश्वासन नितीशकुमार यांनी दिले होते. त्यांच्या या आश्वासनावर महिला मतदारांनी विश्वास ठेवला आणि त्यांच्या पक्षाला भरभरून मतदान केले होते. कारण नवरे दारू पीत असल्याने आणि आहारी गेल्याने असंख्य महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले होते. त्यातून सुटका व्हावी यासाठी दारू बंद होणे गरजेचे होते. या गरजेतून त्यांनी नितीशकुमार यांना निवडून दिले होते. २०१४ पासून महिला वर्ग आनंदाची अनुभूती घेत आहे. कारण त्यांच्या सगळ्या समस्या एकामागून एक सोडविण्याचा विडा उचललेली व्यक्ती देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान आहे. घर बांधण्यासाठी अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत असेल, वैद्यकीय उपचार घेण्यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत मदत देणारी आयुष्मान भारत योजना असेल, उज्ज्वला योजनेतून कोट्यवधी महिलांना मोफत गॅस सिलेंडर मिळत असेल तर महिलांचे कष्ट कमीच होणार आहेत. शिवाय, महिलांच्या उत्थानासाठी अनेकानेक योजना भारतीय जनता पार्टीकडून लागू केल्या जात आहेत. तसा उल्लेख यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यातही भाजपाने केला आहे. त्यामुळे महिलांनी भाजपाला मत द्यावे, हे त्यांना वेगळे सांगण्याची आवश्यकताही भाजपाला पडणार नाही. सांगायचा उद्देश हाच की, आता महिलांच्या कल्याणाकडे, त्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रत्येक राजकीय पक्षाला निवडणूक जिंकायची असेल तर महिलांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावेच लागेल. मध्यप्रदेशातही शिवराजसिंह मुख्यमंत्री असताना भारतीय जनता पार्टीने 'लाडली बहन योजना' लागू करण्याचे आश्वासन दिले होते. शिवराज यांची ओळख 'मामा' अशी झाली होती. त्यातूनच महिलांनी मोठ्या प्रमाणात भाजपाला मतदान केले आणि पुन्हा भाजपाची सत्ता आली. अशा प्रकारे आता प्रत्येकच पक्ष महिलांसाठीच्या योजनांवर भर देताना दिसतो आहे आणि त्याच्या परिणामी महिलांच्या मतदानाचा टक्का वाढलेला दिसतो आहे. महिला मतदारांनी भ्रामक भावनांना बळी पडण्याचे दिवस आता सरले आहेत. कुण्या एका राजकीय पक्षाच्या प्रलोभनाला बळी पडून त्याच पक्षाला महिलांनी मतदान करण्याचे दिवस संपले आहेत. एखादा राजकीय पक्ष वा नेता आपला हितैषी आहे आणि आपल्या कल्याणाची कामे करू शकतो, असा विश्वास जर महिलांच्या मनात निर्माण झाला आणि त्यांच्याशी भावनात्मक नाते निर्माण झाले तर महिला मतदार अशा पक्षाला वा नेत्याला डोळे झाकून मतदान करतात, ही बाब मात्र स्वीकारावी लागेल. आंतरराष्ट्रीय संबंध, शेअर बाजारातील चढउतार याच्याशी महिलांना फारसे देणेघेणे नसते, ही बाबही प्रकर्षाने आढळून आली असली, तरी आताशा महिला आधीपेक्षा जास्त शिक्षित झाल्या असल्याने यातही त्या लक्ष घालू लागल्या आहेत. गेल्या ५० वर्षांत झालेल्या निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले तर असे आढळून येते की, महिलांच्या मतदानाचा टक्का वाढतच चालला आहे. महिलांच्या प्रश्नांना मिळत असलेले प्राधान्य याला कारण ठरले आहे. काही ठिकाणी तर पुरुष मतदारांपेक्षा महिलांनी जास्त प्रमाणात मतदान केले आहे. अपवाद सोडले तर मतदार कधीही कुण्या एका राजकीय पक्षासोबत राहात नाही. मात्र, महिलांच्या बाबतीत असे होत नाही. महिला मतदार त्यांची निष्ठा सहजासहजी लवकर बदलत नाहीत. विशेषत: महिलांच्या सन्मानाचा, अस्मितेचा आणि सुरक्षेचा मुद्दा असतो, तेव्हा त्या त्यांच्या पसंतीच्याच उमेदवाराला आणि पक्षाला मतदान करतात आणि करायलाही पाहिजे. उत्तरप्रदेश विधानसभेची निवडणूक याचे उदाहरण आहे. उत्तरप्रदेशात योगींच्या राजवटीत जे कुख्यात गुंड मारले गेलेत, असंख्य तडीपार झालेत आणि भीतीने पळून गेलेत, त्यामुळे महिलांनी मोकळा श्वास घेतला आहे. याचा परिणाम असा झाला की, महिला मतदारांचा कल भाजपाच्या दिशेने वळला. प्रत्येक राज्यात हे असेच होणार. जो पक्ष, जो नेता महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देणार, त्यालाच नारीशक्ती पाठिंबा देणार!

---

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# हिरण्यगर्भ, बोसॉन आणि (हिग्ज बोसॉन) देव कण

**(उत्तरार्ध)**

'हिरण्यगर्भ' याचा अर्थ सोन्याच्या अंड्यात राहणारा असा आहे. विश्वाच्या निर्मितीचा स्रोत हिरण्यगर्भात आहे, असे वैदिक तत्त्वज्ञान सांगते. याने पृथ्वी, सूर्य, तारे यांची निर्मिती केली. ऋग्वेदातील हिरण्यगर्भ सूक्तात असे उल्लेख आहेत.

*हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।*
*स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम सूक्त ॥*
*ऋग्वेद-१०-१२१-१*

तेजस्वी, सर्व प्राणिमात्रांच्या अगोदर निर्माण झालेला, एकमेवाद्वितीय, जगाचा पालनकर्ता असलेला, त्यानेच पृथ्वी आणि अवकाश धारण केले आहे, अशा देवाला कोणती बरे आहुती द्यावी?

विश्वनिर्मितीचे गूढ उकलण्यासाठी आज मांडल्या गेलेल्या सिद्धांतांपैकी महास्फोटाच्या (बिगबँग) सिद्धांताला सर्वाधिक मान्यता आहे. पण महास्फोटानंतर पदार्थ/जडवस्तू (मॅटर) कशा तयार झाल्या, हे शास्त्रज्ञांच्या लक्षात येत नव्हते. जे जागा व्यापते आणि ज्याचे वजन करता येते, त्याला 'मॅटर' किंवा 'पदार्थ/जडवस्तू' असे म्हणतात. पण या जडवस्तू निर्माण कशा झाल्या, हा प्रश्न मात्र अनेक वर्षे सुटत नव्हता. परमाणूपेक्षाही लहान असलेला एक कण (सबअॅटॉमिक) इतर कणांना वस्तुमान (मास) देतो, अशी पीटर हिग्ज यांची संकल्पना होती. भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांचेही या संदर्भातील संशोधन असेच मोलाचे ठरले आहे. त्यांच्या संकल्पनेतील उपअणुकणाला त्यांच्या सन्मानार्थ 'बोसॉन' असे नावही देण्यात आले होते. या कणाचे अस्तित्व मात्र सिद्ध करता आले नव्हते.

पीटर हिग्ज यांचे एडिनबरो येथे निधन झाले. विज्ञानातील बोजड संकल्पना अगदी सोप्या भाषेत समजावून देण्यात त्यांचा हातखंडा होता. ब्रह्मांडाचे नियंत्रण करणाऱ्या मूलभूत शक्तिसंदर्भातील मानवाचे ज्ञान आणि समज यांना पीटर हिग्ज यांनी नवी दिशा दिली आहे. हिग्ज यांनी १९५४ साली एडिनबरो विद्यापीठातून डॉक्टरेटची पदवी संपादन केली. ज्याला आकारमान आहे त्याला वस्तुमान असलेच पाहिजे. असे आहे तर मग सूक्ष्मातिसूक्ष्म कणांना त्यांचे वस्तुमान कसे प्राप्त होते, हा प्रश्न त्यांना बेचैन करीत होता. त्यांनी कणांना (पार्टिकल) वस्तुमान मिळण्यासाठी मदत करणारा सूक्ष्मातिसूक्ष्म मूलकण अस्तित्वात असला पाहिजे, हे १९६४ मध्येच वर्तविले होते. पुढे २०१२ मध्ये ते कण प्रत्यक्षात सापडल्यानंतर २०१३ मध्ये त्यांना नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले.

**हिग्ज फील्ड आणि हिग्ज बोसॉन :** पीटर हिग्ज यांनी एका वेगळ्या क्षेत्राची (हिग्ज फील्ड) कल्पना सुचविली आहे. माशांसाठी जसे पाणी, तसे आपल्यासाठी हिग्ज फील्ड आवश्यक आहे, असे पीटर हिग्ज सुचवितात. तसेच त्यांनी वेगळ्या कणाचीही कल्पना मांडली आहे. हे वस्तुमानविरहित कण हिग्ज फिल्डच्या संपर्कात आल्यानंतर त्यांची फील्डशी प्रक्रिया होते आणि फील्डमधील कणांना वस्तुमान प्राप्त होते. हिग्ज बोसॉन कणांनादेखील याच क्षेत्रातून वस्तुमान मिळते आणि हे कण इतर कणांना वस्तुमान मिळण्यासाठी कारणीभूत ठरतात. २०१२ साली स्वित्झर्लंडमधील एका संशोधन संस्थेने दोन अणूंची टक्कर घडवून आणली आणि या अणूंना वस्तुमान बहाल करणाऱ्या कणाचा शोध लावला. या प्रयोगात जे कण निर्माण झाले, त्यात बोस आणि हिग्ज यांनी कल्पिलेले कण होते. म्हणून 'हिग्ज बोसॉन' असे नाव पीटर हिग्ज आणि बोस यांच्या सन्मानार्थ या कणाला देण्यात आले आहे. ५० वर्षांपूर्वी गणिताच्या मदतीने या कणाच्या अस्तित्वाचा सिद्धांत पीटर हिग्ज यांनी मांडला होता. भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांचेही या संदर्भातील संशोधन याच मोलाचे होते. याच कणांना 'देव कण' (गॉड पार्टिकल) असे नाव मिळाले आहे.

**लार्ज हॅड्रॉन कोलायडर :** २० व्या शतकाच्या उत्तरार्धात पीटर हिग्ज यांनी वर्तविलेल्या हिग्स बोसॉन कणांचा शोध घेण्याची मोहीम कणविषयक भौतिकशास्त्रज्ञांनी हाती घेतली. हा हेतू समोर ठेवून स्वित्झर्लंडमधील युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्यूक्लिअर रीसर्च (सर्न) या संस्थेने कणांना प्रचंड गती देणारे एक अजस्र यंत्र तयार केले. लार्ज हॅड्रॉन कोलायडर (एलएचसी) नावाची प्रयोगशाळा म्हणजे जमिनीखाली असलेली भल्या मोठ्या व्यासाची एक लांब नळी आहे. ही नळी सेमीकंडक्टर पदार्थांच्या कंकणाकृती चुंबकांची बनलेली असते. 'सर्न' ही एक अद्ययावत प्रयोगशाळा आहे. जिनेव्हा शहराजवळ जमिनीखाली अनेक किलोमीटर पसरलेल्या या प्रयोगशाळेत आण्विक कणांना प्रचंड वेग देऊन, त्यांच्या टकरी घडवून आणण्याची व्यवस्था आहे. यामध्ये चुंबकीय बलाच्या मदतीने कण जवळजवळ प्रकाशाच्या वेगाने फिरविले जातात व त्यांची टक्कर घडवून आणली जाते. २०१२ साली या अणूंच्या टकरीनंतर हिग्ज बोसॉन सापडला. अणूच्या मूलभूत संरचनेत त्याला वस्तुमान देणारा हिग्ज बोसॉन नसता, तर हे विश्वच निर्माण होऊ शकले नसते, असे पीटर हिग्ज म्हणत असत. बोसॉनसह एकूण १७ कण सापडले आहेत. या गटाला आणि बलाला स्टँडर्ड मॉडेल, असे म्हणतात. हे १७ कण दोन गटांत विभागता येतात. फर्मिऑन्स आणि बोसॉन्स. फर्मिऑन्स म्हणजे विटा. फर्मिऑन्स १२ असून याचेही दोन गट पडतात. ६ फर्मिऑन्सचा एक गट आणि ६ लेप्टॉन्सचा दुसरा गट. थोडक्यात फर्मिऑन्स + लेप्टॉन्स = भौतिक वस्तूचा अणू. बोसॉन्स ५ आहेत. प्रत्येक बोसान ३ पैकी १ बल वाहून नेतो. चौथे बल गुरुत्वाकर्षण आहे. याची पातळी अतिशय कमी असल्यामुळे त्याचा स्टँडर्ड मॉडेलमध्ये समावेश केला जात नाही.

**गॉडडॅम पार्टिकल :** आज जग हिग्ज बोसॉनला देव कण / 'गॉड पार्टिकल' म्हणत असले, तरी विज्ञान मात्र हे नाव मान्य करत नाही. लिऑन लेडरमन या शास्त्रज्ञाने या कणांवर 'गॉडडॅम पार्टिकल' या नावाचे पुस्तक लिहिले. पण हे नाव प्रकाशकाने बदलून 'गॉड पार्टिकल' असे केले. 'गॉडडॅम' हा शब्दप्रयोग लेखकाने सहजासहजी हाती न लागणारा (चकमा देणारा) या अर्थी केला होता. पण प्रकाशकाला गॉड आणि डॅम हे दोन शब्द जवळजवळ मांडलेले आवडत नव्हते. म्हणून त्याने 'डॅम' हा शब्द वगळून 'गॉड पार्टिकल' या शीर्षकानुसार ते पुस्तक प्रसिद्ध केले. तेच नाव आज रूढ झाले आहे. विश्वाच्या उत्पत्तीनंतर ग्रह-तारे, सजीव अथवा निर्जीव यांना प्राप्त झालेले वस्तुमान हे अणूमध्ये असलेल्या या अतिसूक्ष्म कणामुळे मिळाले आहे, असे गृहीतक पीटर हिग्ज यांनी गणिताच्या साहाय्याने मांडले होते.

**पीटर हिग्ज जवळ मोबाईल नव्हता :** पीटर हिग्ज यांना २०१३ मध्ये नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले. नोबेल समितीने त्यांना पारितोषिकाबद्दल कळविण्यासाठी फोन केला तेव्हा ते भोजनासाठी हॉटेलमध्ये गेले होते. तिथून परतत असताना एका परिचित व्यक्तीने त्यांना थांबवून नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तोपर्यंत त्यांना या गोष्टीचा पत्ताच नव्हता! त्यांच्याकडे मोबाईल नसल्यामुळे 'रॉयल स्वीडिश अॅकॅडमी' त्यांचे नाव घोषित करण्यापूर्वी त्यांच्यापर्यंत पोहोचू शकली नव्हती, म्हणून नोबेल पारितोषिक जाहीर झाल्याची बातमी सर्व जगाला त्यांच्या अगोदर कळली. ही बातमी कळणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये स्वत: पीटर हिग्ज यांचा क्रमांक बहुदा सर्वात शेवटचा असावा!.

९४२२८०४४३०

---

## वेध

**राजेंद्र मारोटकर**

# शहरी मतदार उदासीन का?

लोकसभा निवडणुकीत मतदानाची कमी होत असलेली टक्केवारी खरोखरच चिंतेची बाब आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात होणारे कमी मतदान हे तर अतिशय चिंताजनक आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ साठी मतदानाचे पहिले दोन टप्पे पार पडले. पहिला टप्पा १९ एप्रिलला तर दुसरा टप्पा २६ एप्रिलला पार पडला. पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघांत मतदान झाले. दुसऱ्या टप्प्यात, म्हणजे २६ एप्रिलला पश्चिम विदर्भातील वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ-वाशीम या मतदारसंघांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडली. विदर्भातील दोन्ही टप्प्यांतील मतदानाच्या टक्केवारीचा विचार केला असता नागपूर आणि अमरावती या दोन विभागीय कार्यालये आणि महानगरपालिका असलेल्या शहरांमधील मतदानाची टक्केवारी त्या-त्या विभागांतील ग्रामीण भागातील मतदानाच्या टक्केवारीच्या तुलनेत खूप कमी आहे.

नागपूर आणि अमरावती या विदर्भातील दोन मोठ्या शहरांमधील मतदान अनुक्रमे ५६ आणि ५७.५१ टक्के झाले तर दोन्ही महसूल विभागांच्या ग्रामीण भागांतील मतदानाची टक्केवारी ही साधारणपणे ६४ टक्क्यांच्या वरच आहे. वैशिष्ट्य म्हणजे, ज्याला आपण आदिवासी किंवा मागास म्हणून संबोधतो अशा गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघ आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या कोरकू आदिवासी असलेल्या भागात ७१ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे. असा विरोधाभास का? तसे पाहिले तर मतदानाची टक्केवारी या उलट असायला हवी होती. म्हणजे शहरी भागात जास्त तर ग्रामीण भागात कमी! कारण शहरी भागात बहुतेक करून उच्चशिक्षित, नोकरदार, व्यापारी वर्ग राहतो. सरकारी नोकरदारांना मतदानाच्या दिवशी शासनातर्फे सुटी जाहीर केली जाते तसेच खाजगी क्षेत्रातील नोकरदारांना मतदानासाठी कामाच्या वेळेतून दोन तासांची सवलत दिली असते. याउलट ग्रामीण भागातील मतदार हे कमी शिक्षित, शेतकरी, शेतमजूर आणि हातमजुरी करणारे असतात. मतदान करायला जाण्यासाठी त्यांना त्या दिवसाची रोजीरोटी बुडवावी लागते. गडचिरोली आणि मेळघाटातील गावे तर दुर्गम भागात असतात. प्रत्येक गावात मतदान केंद्र असेलच असेही नाही. त्यामुळे अशा दुर्गम भागांतील मतदारांना मतदान करण्यासाठी जंगलातून पायवाट तुडवीत दुसऱ्या गावात मतदानासाठी जावे लागते. उलट शहरात मतदान केंद्र अगदी पायीच्या अंतरावर असतात. केंद्रावर मतदानाला जाण्यासाठी गाड्या दिमतीला असतात. असे असूनही ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागांतील मतदानाची टक्केवारी कमी असते. निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, मतदारांमध्ये मतदानाबाबत जाणीव-जागृती निर्माण व्हावी यासाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर शासनातर्फे तसेच सामाजिक संघटनांतर्फे विविध माध्यमांतून जनजागृती केली जाते. उमेदवारसुद्धा प्रचाराचे भोंगे गल्लोगल्ली फिरवीत असतात. पूर्वी टांगे, रिक्षा आणि गाड्यांवर निवडणुकीचे भोंगे, उमेदवारांचे बॅनर्स लावून मोठमोठ्या आवाजात 'ताई-बाई- आक्का विचार करा पक्का आणि - चिन्हावर मारा शिक्का' अशा प्रकारचा प्रचार होत होता. त्यामुळे सर्वसामान्य मतदारांमध्ये निवडणुकीबाबत चर्चा होत होती. एक वेगळाच उत्साह मतदारांमध्ये असायचा. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत अशा प्रकारचा प्रचार काही पाहायला मिळाला नाही. जो प्रचार झाला तो अतिशय नगण्य होता. यावेळी निवडणुकीला उभे असलेल्या उमेदवारांनी प्रचारासाठी जास्त करून समाज माध्यमांवरच भर दिला.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली आहेत. देशातील मतदार पूर्वीपेक्षा अधिक सुशिक्षित आणि सजग झाला आहे. त्यामुळे लोकसभा असो वा विधानसभा, दोन्ही निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढायलाच हवी. अमरावती लोकसभा मतदारसंघात पूर्वीच्या निवडणुकांच्या तुलनेत यावेळी मतदान ४ टक्क्यांनी जास्त म्हणजे ६४ टक्के झाले आहे, ही खरोखरच कौतुकाची बाब आहे. अन्य मतदारसंघांमध्येही तसे व्हायला हवे होते. देशात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीचे अजून पाच टप्पे बाकी आहेत. यात मतदार अधिक जबाबदारीने जास्तीत जास्त मतदान करून जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारताचे हात अधिक बळकट करतील, अशी अपेक्षा करू या.


९८५०२०९७१८

---

## दखल

**अभिजित वर्तक**

# 'आत्मनिर्भर भारता'ची संरक्षण सिद्धता



एकीकडे विस्तारवादी, विश्वासघातकी व विषारी फूत्कार टाकणारा 'ड्रॅगन' तर दुसरीकडे दहशतवादाला, जिहादी कारवायांना सातत्याने खतपाणी घालणारा पाकिस्तान असे दोन 'सख्खे शेजारी' आजूबाजूला असताना भारताला आपली संरक्षण सिद्धता प्रचंड प्रमाणात वाढवावीच लागणार, हे उघड सत्य आहे. मात्र, केंद्रातील भाजपाप्रणीत मोदी सरकारने संरक्षण क्षेत्राकडे जेवढ्या गांभीर्याने लक्ष दिले तेवढे काँग्रेस सरकारच्या काळातील सरकारांनी दिले नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे. काही महिन्यांपूर्वी भारताच्या स्वदेशी हवाई क्षमतेत प्रचंड वाढ करणाऱ्या 'तेजस'मधून उड्डाण घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची संरक्षण सिद्धता जगाला दाखवून दिली आहे. भारतीय हवाई दल संरक्षण फळी अधिक मजबूत करण्यासाठी आणखी लढाऊ विमाने, हलके लढाऊ हेलिकॉप्टर्स खरेदी करणार आहे. यावर हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. कंपनी काम करणार आहे. 'मेक इन इंडिया' व 'आत्मनिर्भर भारत' योजनेंतर्गत सध्या केंद्र सरकार संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनावर भर देत आहे. तसेच स्वदेशी बनावटीची लढाऊ विमाने वायुदलात दाखल करण्यासंदर्भात करार करण्यात आला आहे. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड कंपनीचे 'लाईट कॉम्बॅट हेलिकॉप्टर तेजस' त्यापैकीच आहे. भारतीय हवाई दलाने अधिक लढाऊ विमाने आणि हलके लढाऊ हेलिकॉप्टर तेजस खरेदी करण्याची आणि सुखोई-३० श्रेणीतील विमाने अद्ययावत करण्याची योजना जाहीर केली आहे. या सर्व प्रकल्पांमुळे भारताचे आकाश अधिकाधिक सुरक्षित होणार आहे, हे निश्चित. पण, केवळ हवाई दलाचाच विचार करून चालणार नाही तर भारतीय लष्कर आणि भारतीय नौदल अर्थात तीनही सेनादलांना अधिक बळकटी देताना मोदी सरकारने 'आत्मनिर्भर भारत'ची घोषणा दिली आहे. जो देश संरक्षण साहित्याच्या, उपकरणांच्या बाबतीत सातत्याने दुसऱ्या देशांवर अवलंबून असतो त्या देशाची संरक्षण सिद्धता नेहमीच धोक्यात असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

संरक्षण क्षेत्राच्या भांडवली खर्चाची सुरू असणारी सकारात्मक वाटचाल भारताच्या 'आत्मनिर्भरता' उपक्रमाला चालना देणारी आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी संरक्षण क्षेत्रातील भांडवली खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद १.७२ लाख कोटी रुपये आहे, जी आर्थिक वर्ष २२-२३ च्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा २०.३३ टक्के जास्त आहे आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या सुधारित तरतुदीपेक्षा ९.४० टक्के जास्त आहे. ही तरतूद तीन सेवांच्या दीर्घकालीन एकात्मिक दृष्टिकोन योजनेशी सुसंगत असून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महत्त्वपूर्ण अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण करून सशस्त्र दलांच्या क्षमतांमध्ये असणारा फरक आधुनिकीकरणाद्वारे भरून काढणे, हा त्यामागचा उद्देश आहे.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेने भारताला हवाई संरक्षण व्यवस्थेसाठी अवॅक्स यंत्रणा व एफ-१६ विमाने देण्यास नकार दिला होता. त्यावेळी पाकिस्तानशी त्यांचे संबंध चांगले असल्याने अमेरिकेने पाकला मात्र ही विमाने पुरवली होती. त्यामुळे तत्कालीन भारत सरकारने तातडीने पावले उचलून संरक्षण व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी व अमेरिकेच्या तोडीस तोड विमाने खरेदी करण्यासाठी फ्रान्स व रशियाशी संरक्षण करार केला होता. मात्र, या देशांनी भारताची अडचण व गरज ओळखून भारताला लढाऊ विमानांचा तर पुरवठा केला; मात्र तंत्रज्ञानाचे हस्तांतरण केले नाही. त्यामुळे आपल्याला कायमच त्या देशांवर अवलंबून राहावे लागले तसेच यामुळे भारताचा संरक्षणविषयक खर्चही अफाट वाढत गेला. हा खर्च एवढा वाढला की, त्यामुळे एकूणच अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा यासाठी खर्ची करावा लागला. मध्यंतरी 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'चा अहवाल समोर आला होता. या अहवालानुसार, संरक्षणासाठी खर्च करणाऱ्या देशांमध्ये भारत जगात तिसऱ्या स्थानावर आहे. अमेरिका पहिल्या तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. एका अहवालानुसार, भारताने २०१९ साली संरक्षण क्षेत्रात ७१ अब्ज डॉलर्स खर्च केले होते. २०१८ च्या तुलनेत हा आकडा ६.९ टक्क्यांनी अधिक आहे. भारत संरक्षण क्षेत्रातील सर्वाधिक वस्तू रशियाकडून खरेदी करतो. त्यानंतर अमेरिका, इस्रायल आणि फ्रान्स यांचा क्रमांक लागतो.

संरक्षण क्षेत्रात भारत अधिकाधिक आत्मनिर्भर आणि स्वदेशी तंत्रज्ञानयुक्त झाला पाहिजे आणि संरक्षणविषयक जास्तीत जास्त गरज देशांतर्गत प्रकल्पांतूनच भागली पाहिजे व यासाठी आयात थांबून निर्यातीत वाढ केली पाहिजे यासाठी जी तीव्र इच्छाशक्ती व राष्ट्रीय भावना लागते, नेमका याचाच आधीच्या बहुतांश सरकारांमध्ये अभाव होता. अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारचा अपवाद सोडला तर २०१४ पूर्वीच्या बहुतांश सरकारांनी संरक्षण क्षेत्रात स्वदेशीला फारशी चालना दिली नाही. सरकारने 'आत्मनिर्भर भारत'ची घोषणा केल्यानंतर संरक्षण मंत्रालयाने त्यादृष्टीने पुढचे पाऊल टाकत शंभरहून अधिक उपकरणांची आयात थांबवून आत्निर्भर होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याच्या दृष्टीने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. याचा पहिला टप्पा म्हणून संरक्षण मंत्रालयाकडून 'निगेटिव्ह आर्म्स लिस्ट' तयार करण्यात येत आहे. या सूचीत असलेल्या संरक्षण सामग्रीच्या आयातीवर बंदी घालण्यात येईल. लष्कराला आवश्यक साधनसामग्रीचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. २०२४-२५ पर्यंत आत्मनिर्भर अर्थात देशांतर्गत साधनसामग्रीचे उत्पादन व्हावे यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे शंभराहून अधिक उपकरणे आणि साधनसामग्रीची सिद्धता झाल्यानंतर आणखी एक सूची तयार करण्यात येणार आहे. 'निगेटिव्ह लिस्ट'मधील कोणत्याही गोष्टी आयात कराव्या लागू नयेत यासाठी उत्पादन ते प्रत्यक्ष पुरवठा करणाऱ्या संबंधितांशी चर्चा करून कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. कारण आता किंवा भविष्यातही युद्धसामग्री लागल्यास ती तयार करण्यासाठी आपली किती क्षमता आहे, याचा अंदाज घेणे अत्यावश्यक होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ऑगस्ट २०१५ ते ऑगस्ट २०२० या कालावधीत २६० योजनांसाठी ३.५ लाख कोटी रुपयांचे करार करण्यात आले. पुढच्या सहा ते सात वर्षांत चार लाख कोटी रुपये देशांतर्गत सुरक्षेशी निगडित उत्पादकांना मिळू शकतील. यापैकी १ लाख ३० हजार कोटी रुपये लष्कर आणि हवाई दलासाठी तर १ लाख ४० हजार एवढी रक्कम नौदलासाठीच्या साधनसामग्रीकरिता वर्ग करण्यात आली आहे. भारतीय सेनादलांना आवश्यक उपकरणे, सोयीसुविधा यांचे उत्पादन देशातील संरक्षण क्षेत्रातील उत्पादकांनी केल्यास स्वदेशीचे उद्दिष्ट प्रत्यक्षात पूर्ण होऊ शकेल.

९४२२९२३२०१

---

## सामाजिक विषवल्लींना ठेचा

'श्रीराम' हे समस्त हिंदूंचे आराध्य दैवत आहे. नुकतीच श्रीरामनवमी भारतासह जगभरात ज्या ज्या ठिकाणी हिंदू आहेत त्या ठिकाणी उत्साहाने साजरी करण्यात आली. श्रीरामनवमीनिमित्त दरवर्षी श्रीरामाच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जाते. यासाठी पोलिस प्रशासन तसेच रस्ते वाहतूक विभागाची रीतसर परवानगीही घेतली जाते. या मिरवणुकांत श्रीरामभक्त उत्साहाने सहभागी होतात. रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबतही खबरदारी घेतली जाते. असे असताना दरवर्षी श्रीरामनवमीच्या दिवशी मिरवणुकांवर कुठे ना कुठे समाजकंटकांकडून आक्रमण केले जाते. यंदाही बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगा शहरातील शक्तिपूर येथे मशिदीजवळ रामनवमीची मिरवणूक आल्यानंतर समाजकंटकांकडून मिरवणुकीवर हल्ला करण्यात आला. छतांवरून दगडफेक करण्यात आली. गावठी बॉम्ब फोडण्यात आले. माणिक्याहार आणि मेदिनीपूरच्या इग्रा येथेही श्रीरामनवमी मिरवणुकीवर आक्रमण करण्यात आले. तिन्ही ठिकाणी झालेल्या हिंसाचारात १८ जण जखमी झाले. त्यात दोन अल्पवयीन मुले, एक महिला आणि काही पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. माणिक्याहार परिसरात काही हिंदूंच्या घरांना लक्ष्य करून आगी लावण्यात आल्या. या परिसरात हिंदूंच्या उत्सवांवर आणि मिरवणुकांवर दरवर्षी अडथळे आणले जातात. असे असताना पोलिस प्रशासन पुरेशी खबरदारी का घेत नाही? हिंदूंचे उत्सव आले की बंगालमध्ये कुठे ना कुठे हिंसाचार झाल्याच्या बातम्या वाचनात येतात. ही स्थिती पाहिल्यावर पश्चिम बंगाल नक्की भारताचा भाग आहे की बांगलादेशचा, असा प्रश्न पडतो. भारतात पंथनिरपेक्ष लोकशाही राजवट आहे. त्यामुळे इथे समस्त पंथांचे लोक गुण्यागोविंदाने आणि आनंदाने नांदतात. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. देशाच्या काही ठरावीक भागांत मात्र दरवर्षी हिंदूंच्या सणांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून जातीय सलोखा बिघडवण्याचे काम काही समाजद्रोही मंडळींकडून केले जाते. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या अशा विषवल्लींना वेळीच ठेचायला हवे.

**जगन घाणेकर**/मुंबई

## वाचक पत्रे

### सणसणीत चपराक

सर्वोच्च न्यायालयाचा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या बाबतीत निर्णय म्हणजे विरोधी पक्ष आणि त्यांच्या समर्थकांना सणसणीत चपराक होय. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर जितक्या काही निवडणुका झाल्या, त्यात भाजपाला यश मिळाले. विरोधकांनी निराश व चिडून निकाल भाजपाने केलेल्या घोळामुळे आला, असा आरोप सातत्याने लावण्यात आला. विरोधकांनी ईव्हीएम हॅक केले जाऊ शकते. भाजपाला पाहिजे तसे मतदान झाल्याचे दाखविले जाऊ शकते यासाठी वाटेल तसा अपप्रचार सुरू केला. सामाजिक माध्यमात तर कहरच केला होता. या सर्व प्रकरणात त्यांच्यात जोश भरपूर, पण विश्वास शून्य होता. लगेचच ईव्हीएम हटाव अशी ओरड सुरू केली होती. उत्तरप्रदेशात भाजपाला कधी नव्हे ते घवघवीत यश मिळाल्यावर सर्व विरोधकांनी ईव्हीएमविरुद्ध मोठे आंदोलन करायचे ठरविले. मात्र, त्या काळाचे मुख्य निवडणूक आयुक्तांनी विरोधी पक्षांना खुले आव्हान दिले होते की, ईव्हीएममध्ये कसा घोटाळा होऊ शकतो, ते करून दाखवावे. पण एकाही राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीने हे आव्हान स्वीकारले नाही; मात्र ओरड चालूच ठेवली. गंमत अशी की, एखाद्या राज्यात विधानसभेत निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला तर मात्र ईव्हीएमविरुद्ध एकही अक्षर बोलत नव्हते. काही पक्ष व त्यांचे समर्थक मागणी करायचे की आता मतदान बॅलेट पेपरवरच झाले पाहिजे. विरोधी नेते ईव्हीएम घोटाळ्याबद्दल इतके ठाम होते तर त्यांनी निर्वाचन आयोग कार्यालयासमोर आमरण उपोषण तरी करायला हवे होते. मात्र, काही महाभागांनी तथाकथित ईव्हीएम घोटाळासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि काल ती याचिका फेटाळण्यात आली. विरोधकांची ओरड म्हणजे 'नाचता येई ना अंगण वाकडं,' असे ठरले. आता ईव्हीएमवर अजिबात शंका नको.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

### मोबाईलचा अतिरेकी वापर

सध्या रस्त्यांवरील अपघात वाढले आहेत. वाहने चालवताना मोबाईलवर बोलण्याचे प्रमाण सध्याच्या काळात वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे अपघात होतात याकडे लोकांचे साफ दुर्लक्ष झालेले दिसून येते. असे लोक स्वत:सोबतच इतरांचाही जीव धोक्यात घालतात. वाहने चालवताना मोबाईलवर बोलणे धोक्याचे आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. या सवयीमुळे अपघात घडल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. चालकाने मोबाईलवर बोलताना वाहन बाजूला थांबवून बोलावे, हेही यांच्या लक्षात येत नाही. पोलिसांनी या वाहनचालकांविरोधात मोहीम हाती घेतली पाहिजे. शासनाने प्रसार माध्यमाद्वारे लोकांमध्ये जागृती करणे काळाची गरज आहे. यासाठी जनजागृती आणि शासनाचा धाक आवश्यक आहे.

**सुनील पुजारी**/९९२३०२६२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

## नीरा उजवा कालव्याचे पाणी

# गिरणी मायनर फाट्यास सोडा

### शेतकऱ्यांचा टाहो; पिण्याबरोबरच जनावरांचा चारा, पाण्याचा प्रश्न गंभीर, अधिकारी जुमानेनात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ एप्रिल-**

नीरा उजवा कालव्यातून गिरणी मायनर या फाट्यास नोव्हेंबर २३ नंतर अद्याप पाणी आले नाही. दोन दिवसांपूर्वी कॅनल ओला करण्यासाठी पाणी सोडले आणि लगेच बंद केले. तत्काळ पाणी सोडण्याची मागणी नागरिक करत आहेत.

या फाट्यावर आनंदनगर, कोंढबावी, बागेचीवाडी, गिरझणी या गावांतील सुमारे ६०० हेक्टर क्षेत्र भिजते. परंतु केवळ अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे या फाट्यावरील शेतकऱ्यांना अन्याय सहन करावा लागत आहे. आनंदनगर, कोंडबावी, बागेचेवाडी या ठिकाणी जनावरांना पिण्याचे पाणी नाही. जनावरांसाठी केलेल्या पिकाचे करपून राख झाली आहे. या भागात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर असून दुग्ध व्यवसायावर याचा परिणाम झाला आहे. कॅनॉलचे पाणी आल्यावर कसेतरी बोअर, विहिरींना पाणी येऊन तसेच जनावरांच्या चाऱ्याची सोय होऊ शकते.



परंतु या फाट्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकरी संतप्त झाला आहे. गेल्या आठवड्यात शेतकरी अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी माळशिरस येथील पाटबंधारे कार्यालयात गेले होते. परंतु अधिकारी निवडणुकीच्या कामात गेल्याने ऑफिसमध्ये कोणीही नव्हते. शेतकरी मुख्य ऑफिस फलटण येथे जाऊन आले. तेथही त्यांना आश्वासन देण्यात आले. गिरझणी मायनरच्या वरच्या बाजूचे ६१ फाट्याचे तसेच खालच्या बाजूचे नऊ चारीचे सर्व (भरणी) पाणीपुरवठा मागच्या पंधरा-वीस दिवसांत झाली आहे. परंतु गिरझणी मायनरला पाण्याचा पत्ता नाही. मुद्दामहून पाठीमागे ठेवण्यात आहे, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. मुख्य कॅनॉल लवकरच बंद होणार असल्याचीही सध्या जोरात सुरु आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी मिळावे. शेवटपर्यंत पाणी जावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

> आम्ही शेवटच्या टोकाला असल्याने आमच्यापर्यंत पाणी पोहोचतच नाही. सध्या आनंदनगरची परिस्थिती अतिशय कठीण असून पिके करपून गेली आहेत. कॅनॉचे पाणी आले तर शेतकऱ्यांचे बोअर, विहिरींना पाणी वाढते. त्यामुळे जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न काही दिवस तरी निश्चित सुटेल. सध्या गावात टँकर चालू आहे.
>
> **-गंगाराम चव्हाण, उपसरपंच, आनंदनगर**

> अधिकाऱ्यांनी रब्बीची एक पाळी बुडवली. गेल्या वर्षीही उन्हाळ्यात पाणी पाळी दिली नाही. यावर्षी पाऊस कमी आहे. अशा परिस्थितीत जनावरांचे व पिकांचे मोठे हाल होत आहे.
>
> **-विष्णू घाडगे, उपसरपंच, कोंडबावी**

> अधिकाऱ्यांनी एक तारखेला पाणी देण्याचे कबूल केले आहे. परंतु मुख्य कॅनल बंद होणार असल्याचे समजते. आम्हाला आमचे पाणी मिळावे व तेही पूर्ण क्षमतेने मिळावे.
>
> **-कृष्णराज माने-पाटील, सरपंच, बागेचेवाडी**

#### १ मेला पाणी सोडणार

याबाबत उपअभियंता मस्कर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु ते नॉटरिचेबल लागतात. उपअभियंता मिसळ यांनी १ मेला पाणी सोडू असे असे सांगितले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महादेव कोगनुरे यांच्यात बंद दाराआड चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्यात सोलापूर येथे बंद दाराआड बराचवेळ राजकीय चर्चा झाली. यामुळे महादेव कोगनुरे हे भाजपात प्रवेश करणार की काय? अशी चर्चा रंगली असल्याने महादेव कोगनुरे यांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह मात्र अधिकच वाढला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीरसभा असल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर येथे आले असता महादेव कोगनुरे व फडणवीस यांच्यात बंद दाराआड बराचवेळ राजकीय चर्चा झाली. मागच्याच आठवड्यात सोलापूर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार आ. प्रणितीताई शिंदे व महायुतीचे उमेदवार आ. रामभाऊ सातपुते या दोघांनीही महादेव कोगनुरे यांच्या घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली होती. यामुळे महादेव कोगनुरे हे काय भूमिका घेणार याची उत्सुकता कार्यकर्त्यांना लागून राहिली होती. आज पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महादेव कोगनुरे यांच्यात बंद दाराआड राजकीय चर्चेने एम. के. फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांचा उत्साह पुन्हा एकदा शिगेला पोहचला आहे.

## मंद्रुपमध्ये काँग्रेसचा होम टू होम प्रचार

**मंद्रुप, दि. ३० एप्रिल-**

मंद्रुप दक्षिण तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या व मतदारसंख्या अधिक असणारा गाव आहे. या गावातील मताधिक्यावरून इतर गावातील मतदानाविषयी अंदाज बांधला जातो म्हणून सर्वच पक्षाकडून निवडणुकीदरम्यान मंद्रुपला विशेष महत्व आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी युवक काँग्रेसकडून प्रचार सुरु आहे. युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव अनंत म्हेत्रे व एनएसएसयुआयचे जिल्हाध्यक्ष वाघेश म्हेत्रे यांनी कार्यकर्त्यांसमवेत जाऊन होम टू होम प्रचार करून काँग्रेसला निवडून देण्याचे आवाहन करीत आहेत.



# दूध, दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनात घट

### सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर : स्वेरीत जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त तांत्रिक परिसंवाद, पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२९ एप्रिल-**

सध्याच्या भारताची लोकसंख्या विचारात घेतली असता दूध, दुग्धजन्य पदार्थ, अंडी व मांस अशी उत्पादने कमी पडत आहेत. भविष्यात या गोष्टींची कमतरता भासू लागेल. यासाठी सध्या उत्पादन क्षेत्रांमध्ये क्षमता वाढवण्याची गरज असून यामध्ये विकास करून पशु-प्राण्यांमधील आजार कमी करणे हे आपल्यापुढे आव्हान उभे आहे, असे प्रतिपादन पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धनचे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर यांनी केले.

जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान व स्वेरीज् कॉलेजच्या वतीने तांत्रिक परिसंवाद तसेच स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार, स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. समीर बोरकर

प्रास्तविक ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वास मोरे यांनी केले. पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रियांका जाधव-कोळेकर यांनी स्वागत केले.माजी सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नितिन मार्कंडे यांनी वंध्यत्व निवारण व व्यवस्थापन, प्रा. डॉ. विठ्ठल धायगुडे, डॉ. दिलीप घोरपडे, डॉ. महेश बनसोडे, डॉ.भास्कर पराडे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, महाव्हेटचे अध्यक्ष डॉ. रामदास गाडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. दिलीप घोरपडे व डॉ. महेश बनसोडे यांना स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव तर डॉ.भाग्यश्री राठोड, डॉ. विष्णू होळकर, डॉ. सचिन कंपने, डॉ. ओम सोनाळे, डॉ. कैलास कच्छवे, डॉ. आर.एन. होळकर, डॉ. पी. टी. मांजरे, डॉ. रवींद्र बंडगर, डॉ. श्रीकांत सुर्वे, डॉ.अतुल चुकेवार, डॉ. शामराव वायबसे, डॉ. लक्ष्मण गाढवे या पशुधन विकास अधिकाऱ्यांचा स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार तर डॉ. रविंद्र वर्धमान यांना पशुधन अधिकारी व योगाबाबत जनजागृती केल्याबद्धल विशेष सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. नंदकुमार सरदेशमुख, तालुका पंचायत समितीचे प्र.सह आयुक्त डॉ. राजेंद्र सावळकर, पशुधन विकास अधिकारी डॉ. सुहास सलगर, डॉ. शिवराज पवार, संगीता निंबाळकर, प्रिया देशपांडे, चैतन्य देशपांडे, वृषाली मोरे, सहआयुक्त डॉ. शेखर बागल, डॉ. शिवकुमार खळगे उपस्थित होते. साताऱ्याचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे व पुणेचे उपायुक्त डॉ. अंकुश परिहार यांच्यासह इतर सहकाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. प्रा. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर संघटनेचे कोषाध्यक्ष डॉ. नंदकुमार होनराव यांनी आभार मानले.




#### स्वत: अपटेड राहणे गरजेचे : डॉ. पंचपोर

भविष्यात पशुपालनाचा फायदा होण्यासाठी आत्ताच त्यांमधील आजार ओळखून ते जलद उपचार करून कमी करावे लागतील. शासन यासाठी सर्वोतोपरी मदत करत आहे. परंतु आपल्याला कामाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे. उद्योगात प्रगती होण्यासाठी भविष्यकाळात चांगले पशु, चांगले उद्योजक निर्माण होतील. यासाठी ग्रामीण भागात, उद्योजक व शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मार्गदर्शन केले पाहिजे. यातून कसा फायदा होईल हेही पटवून दिले पाहिजे, असे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर यांनी सांगितले.

#### मॅनकाइंड फार्माकडून टोपी भेट

पशु-प्राणी तपासणीच्या हेतूने पशुधन विकास अधिकारी ग्रामीण भागात उन्हा-तान्हात रानोमाळ भटकंती करत असतात. त्यांचा उन्हापासून बचाव करून पशुवर व्यवस्थित उपचार करण्याच्या हेतूने पशु चिकित्सेसाठी प्रसिद्ध असलेल्या 'मॅनकाइंड फार्मा' या कंपनीकडून या परिसंवादासाठी उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांना पांढऱ्या रंगाची आकर्षक टोपी मोफत देण्यात आली.

## क्रीडा वृत्त

## गुरुवर्य गजानन पाटील क्रीडा प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय खेळाडू सय्यद यांचा पुण्यात सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

गुरुवर्य गजानन पाटील क्रीडा प्रतिष्ठान तर्फे पुण्यात झालेल्या सोहळ्यात हातोडा फेकमधील राष्ट्रीय खेळाडू व मध्य रेल्वेत टी.सी. पदावर कार्यरत असलेला येथील आजम सय्यद यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सत्कार झाला. यावेळी आझम यांच्याबरोबरच प्रांजल बच्चे, ऐश्वर्या हिंगे, सोमती कोडक यांचा सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडू, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक यांना हा पुरस्कार दिला जातो. याप्रसंगी सी.जी. एस.टी.चे उपायुक्त व ओलंपियान हॉकी खेळाडू राहुल सिंग प्रमुख पाहुणे तसेच श्रीकांत जाधव, कृष्णकुमार राणे, दत्ता झोडगे, डॉ. गौरी पाटील, अजिंक्य जाधव, ऋचा जाधव पाटील आदी उपस्थित होते. क्रीडा मार्गदर्शक रामदास फरकते (सांगली), खेळाडू रोहन कांबळे, सानिका रुपनर (पुणे) यांना क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ,

पार्थ देशमुख यांनी स्वागत गीत आणि समारोप वेळी पसायदान सादर केले .ऋचा जाधव पाटील हिने आभार मानले, डॉ. दिपाली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले.



#### डॉ.गौरी पाटील चालवतात प्रतिष्ठान

सोलापूरचे माजी प्रशिक्षक, शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित मार्गदर्शक, माजी क्रीडा अधिकारी गुरुवर्य गजानन मारुती पाटील यांच्या ६२ व्या जयंतीनिमित्त एस एम जोशी सभागृहात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल क्रीडा प्रशिक्षक खेळाडू त्याचबरोबर कठीण परिस्थितीत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंना सन्मानित केले. डॉ गौरी पाटील यांनी पाटील सरांच्या स्मरणार्थ या क्रीडा प्रतिष्ठानची स्थापना केली असून या अंतर्गत क्रीडा क्षेत्राशी संबंधित उपक्रम राबवले जातात पुरस्काराचे यंदा तिसरे वर्ष होते.

### बास्केटबॉल प्रशिक्षण शिबीर २ मे पासून होम मैदानावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

सोलापुर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन च्या वतीने वय वर्ष ८ ते १४ या वयोगटातील मुले व मुली २ में २०२४ ते १६ में २०२४ पर्यंत होम मैदानच्या बास्केटबॉल कोर्ट वर सायंकाळी ५.३० ते ७.३० पर्यंत बास्केटबॉल प्रशिक्षण शिबीर होईल. या शिबिरास राष्ट्रीय खेळाडू प्रदीप लोणावत, तसेच दिनेश सारंगी, नावेद मुन्शी, मुकीम खान, ताबीश जमाल, यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. ईच्छुकांनी २ में २०२४ रोजी होम मैदानावर सायंकाळी ५.३० वाजता हजर रहावे. अधिक माहितीसाठी ३५९४४४८५६,९२२६९३४८८० या मोबाईलवर संपर्क साधावा असे सोलापुर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मा.के.डी पाटील सर यांनी कळविले.

## शालेय विभागस्तरीय योंगमुडो स्पर्धेत रूद्रशक्ती गुरूकुलला १० पदके



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

शालेय विभागस्तरीय योंगमुडो स्पर्धेत रूद्रशक्ती गुरूकुलच्या विद्यार्थ्यांनी २ सुवर्ण, ५ रौप्य व ३ कांस्य अशी १० पदकांची कमाई केली.

पुणे येथे झालेल्या या स्पर्धेत तन्वी जगनकर, योगिता सरवदे यांनी सुवर्ण, अमृता शिंदे, रितिका दंडगळ, राजवर्धन टोणपे, यशवर्धन टोणपे, प्रथमेश बिळीअंगडी यांनी रौप्य तर श्रद्धा सरवदे, सोनाक्षी माडे, प्राची मिस्कीन यांनी कास्य पदक पटकाविले. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्किन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो असोसिएशन ऑफ सोलापूरचे सचिव नागेश शेट्टीकर रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करूत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## निधन वृत्त...

### शिला मुरुगकर



**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

जुळे सोलापूर परिसरातील रहिवासी शिला भालचंद्र मुरुगकर (वय ७२ वर्षे) यांचे रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास अल्पशा आजाराने हैदराबाद येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. वडाळा येथील माऊली मतिमंद निवासी विद्यालयातील कर्मचारी निरंजन मुरुगकर यांच्या त्या मातोश्री होत.

### जयश्री कामतकर



**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

जयश्री (प्रभा) मनोहर कामतकर (वय ८४) यांचे अल्प आजाराने पुणे येथे निधन झाले. वैकुंठ स्मशनभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे एक मुलगी, एक मुलगा, सून, जावई, नातवंड असा परिवार आहे. उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सतीश कामतकर यांच्या त्या मातो:श्री होत.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे गौडगांव खुर्द गावातील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे गौडगांव खुर्द, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर येथील गट नं.५४ यांसी एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ०६ आर, पो.ख.0.0२ आर, असे एकूण ०१ हेक्टर ०८ आर या जमीनीपैकी पश्चिम दिशेकडील 0 हेक्टर ५३ आर पो.ख. 0 हेक्टर ०१ आर एकूण ५४ आर क्षेत्राची शेतजमीन यांसी आकार ०१ रुपये ५६ पैसे यांसी चतुःसिमा पुर्वेस-गट नं.५४ पैकीची जमीन, पश्चिमेस गट नं.२८ पैकी, दक्षिणेस-गट नं.५५, उत्तरेस-गट लं.५३ ही शेतजमीन आशा मधु राठोड यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असून, सदर शेतजमीन ही त्यांनी विक्रीस काढली असता, आमचे अशिल यांनी सदर शेतजमीन बाजारभावाने खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. वरील आशा मधु राठोड यांनी वर नमुद शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचे आमचे अशिलांना हमी दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचेही हरकत व कायदेशीर हक्क लिज, गहाण, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, टाच, जप्ती अथवा अन्य तऱ्हेचा हक्क व अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकती कागदोपत्रानिशी खालील नमुद पत्यावर कळविण्यात यावे. सदर मुदतीत हरकती न आल्यास आमचे अशिल वर नमुद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे गृहीत धरुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी. मग त्यानंतर येणारी हरकत आमच्या अशिलांवर व वर नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे, तारीख २९/०४/२०२४.

**सही/-**
**ॲड.व्ही.बी.पाटील**
**उत्कर्षनगर, अक्कलकोट, जि. सोलापूर.**
**मो.नं.:- ७५८८०४७५६२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर निवेदन जाहीर निवेदन जाहीर निवेदन



जाहीर निवेदन देतो की मी **सोभोमल भानोमल माखिजा, भानोमल** यांचा पुत्र, **रा.१००बी, अंत्रोळीकर नगर-१, सोलापूर-४१३००३ (महाराष्ट्र)** येथे निवास करत असून माननीय सचिव, गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांना नागरिकत्व मंजूर करण्यासाठी निवेदन करीत आहे. जर कोणास हे नागरिकत्व मंजूर होऊ नये असे वाटत असल्यास योग्य कारणांसहित लिखित स्वरुपात स्वाक्षरीसह वर उल्लेखित सचिवांस कळवावे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that, 1 **Sobhomal Banhomal Makhija** SON OF **Banhomal** Resident of **100B, Antrolikar Nagar 1, Solapur-413003** (Maharashtra) is applying to The Secretary Government of India. Ministry of Home affairs, NEW DELHI, for naturalization and that any person who knows any reason why naturalization should not be granted, send written signed statement of facts to said Secretary

**Sobhomal Banhomal Makhija**

### जाहीर प्रसिद्धीकरण
### जागा/जमिनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी शहर माढा म्यु.पल हद्दीतील व माढा तालुक्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी शहर माढा म्यु.पल हद्दीतील सि.स.नं. ८६९ याचे क्षेत्रफळ ७९.७० चौ.मी. व सि.स.नं. ८७०/२ याचे क्षेत्रफळ ५७.१० चौ.मी. आहे. याबाबत खरेदीखताचा दस्त श्री. पोपट यशवंत पवार यांनी आमचे अशिल रायबा पोपट पवार यांना दि. ३१/०१/२०२१ रोजी दस्त क्र. ५८९/२०११ हे रजिस्टर खरेदीखताचा दस्त लिहून, नोंदवून दिलेला होता. परंतु सदरचा दस्त आमचे अशिलाकडून अनावधानाने गहाळ होऊन हरविलेला आहे. तो अद्यापपर्यंत आढळून आलेला नाही.

आमचे अशिलांनी सदर खरेदीखत हरविण्यापूर्वी मिळकती संदर्भाने दि. १५/११/२०१८ रोजी रजिस्टर दस्त क्र. ५५४६/२०१८ द्वारे श्री. निळकंठ महादेव भाजीभाकरे यांना सकरची मिळकत जागा ही हस्तांतरीत केलेली आहे. तद्नंतर सदर मिळकती संदर्भाने मिळकती हस्तांतरणाचे कोणतेही व्यवहार केलेले नव्हते व नाहीत अथवा व्यवहाराबाबत कोणाकडूनही इसार म्हणून रक्कम देखील स्वीकारलेली नाही. तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतलेले नाही.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीचा खरेदीदस्त मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये. सदरचा दस्त मिळाल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावा. सदर दस्ताचे अनुषंगाने कोणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, सदर मिळकतीबाबत पूर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये. कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास या जाहीर प्रसिद्धीकरणापासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरचे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. तारीख : २९/०४/२०२४

सही/-
**ॲडव्होकेट शेखर एस. गुंड-पाटील,**
धर्माधिकारी प्लॉट, गाडेगांव रोड, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर मो.नं. ९८५०७८०१०५
अशिल श्री. रायबा पोपट पवार यांचेतर्फे ॲड.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# क्रीडा

## महत्त्वाचे

### भारतीय गोल्फर दीक्षा डागर अव्वल १० मध्ये



**केपटाऊन :** भारतीय गोल्फर दीक्षा डागरने इन्व्हेटेक दक्षिण आफ्रिका महिला ओपनमध्ये आणखी एका चांगल्या कामगिरीनंतर महिला युरोपियन टूर (एलईटी) ऑर्डर ऑफ मेरिटच्या टॉप-१० मध्ये प्रवेश केला. दीक्षा आता एलईटीमध्ये ४५५ गुणांसह नवव्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा ब्रॉन्टे कायदा अव्वल आहे. प्रणवी उर्स तिच्या पहिल्या वर्षी २५ व्या क्रमांकासह पुढील सर्वोत्तम भारतीय आहे. दीक्षा आगामी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचे जवळपास निश्चित आहे. ती तिसऱ्या ऑलिम्पिकमध्ये खेळणाऱ्या अदिती अशोकसोबत खेळणार आहे.

### ब्रिजेश, सागर, सुमितची पदके निश्चित

**कझाकिस्तान :** भारताच्या ब्रिजेश टमटा, सागर जाखर आणि सुमित यांनी आशियाई २२ वर्षांखालील आणि युवा मुष्टियुद्ध अजिंक्यपदाच्या उपांत्य फेरीत प्रवेश करून पदकांची कमाई केली. ब्रिजेशने (४८ किलो) उझबेकिस्तानच्या साबिरोव सैफिदिनचा पराभव केला. दोन्ही मुष्टीपटूंनी प्रत्येकी एक फेरी जिंकली पण तिसऱ्या फेरीत भारतीय मुष्टीपटूने ४-३ गुणांनी विजय मिळविला. सागर (६० किलो) आणि सुमित (६७ किलो) यांनी अनुक्रमे थायलंडच्या कलासीराम टी आणि कोरियाच्या हॉँग सेओ जिन यांचा ५-० ने पराभव केला. जितेशला ५४ किलो गटात कझाकिस्तानच्या टी नुरसिलने पराभूत केले. अन्नू (४८ किलो), पार्थवी ग्रेवाल (६६ किलो), निकिता चंद (६० किलो), खुशी पुनिया (८१ किलो) आणि निर्झर बाना (+८१ किलो) या पाच महिला मुष्टीपटूंनी युवा गटात आठ पदके निश्चित केली आहेत. उपांत्य फेरीपासून त्यांच्या मोहिमेची सुरुवात होईल. पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेली आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती (५४ किलो) उद्या उझबेकिस्तानच्या उख्तामोवा निगीनाशी झुंज देणार आहे.

### टी-२० साठी निवडकर्त्यांची आज बैठक

**नवी दिल्ली :** अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय निवड समितीने आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाला अंतिम रूप देण्यासाठी मंगळवारी अहमदाबादमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांची भेट घेणार आहेत. पण संघाची अधिकृत घोषणा एक दिवसानंतर होण्याची शक्यता आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह हे वरिष्ठ निवड समितीचे (पुरुष) निमंत्रक आहेत. त्यांच्या व्यस्त कार्यक्रमांमुळे ही बैठक अहमदाबादमध्ये होणार असल्याचे समजते. संघातील दुसऱ्या यष्टिरक्षकाची जागा आणि अष्टपैलू हार्दिक पंड्याला संघात स्थान हे दोन महत्त्वाचे मुद्दे निवड बैठकीत चर्चेचे ठरणार आहेत. केएल राहुल आणि संजू सॅमसन यांच्यात दुसऱ्या यष्टिरक्षकाच्या जागेसाठी अजूनही चुरस सुरू असल्याचे समजते. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार सॅमसनने आपल्या आयपीएल संघासाठी दशकाहून अधिक काळ प्रथमच सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे परंतु तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीच्या आधारे त्याला भारतीय संघात स्थान मिळू शकत नाही.

### ऑलिम्पिकमध्ये सात भारतीय बॅडमिंटनपटूंचा सहभाग

**नवी दिल्ली :** माजी विश्वविजेत्या पी. व्ही. सिंधूसह सात भारतीय बॅडमिंटनपटूंनी ऑलिम्पिक खेळांच्या पात्रता क्रमवारीच्या आधारे चार प्रकारांमध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी अधिकृतपणे पात्रता मिळवली. सिंधू आणि अव्वल पुरुष एकेरी खेळाडू एच. एस. प्रणॉय आणि लक्ष्य सेन यांनी ऑलिम्पिकसाठी शिक्कामोर्तब केले होते आणि बॅडमिंटन इंटरनॅशनल फेडरेशनने निश्चित केलेल्या कट-ऑफ तारखेला सोमवारी औपचारिकता पूर्ण झाली. माजी विश्व विजेती आणि ऑलिम्पिक रौप्य आणि कांस्यपदक विजेती सिंधू १२ व्या तर पुरुष एकेरीत प्रणॉय आणि लक्ष्य अनुक्रमे नवव्या आणि १३व्या स्थानावर आहेत. सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष दुहेरी जोडीने ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या शेवटी तिसरे स्थान पटकावले आणि बॅडमिंटनमध्ये देशासाठी सर्वोत्तम पदकाच्या आशा असलेल्या ऑलिम्पिकमध्ये प्रवेश केला. महिला दुहेरीत तनिषा क्रास्टो आणि अश्विनी पोनप्पा या भारतीय जोडी पात्रता फेरीअखेर १३ व्या स्थानावर राहून पात्र ठरल्या.

# टी-२० विश्वचषकासाठी केएल राहुलकडे नजर

### ऋषभ पंत, सॅमसनही शर्यतीत
### मुंबई इंडियन्सला विजय आवश्यक

◆ **लखनौ, २९ एप्रिल**

टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाच्या निवडीपूर्वी, केएल राहुलला दुसरा यष्टिरक्षक म्हणून निवड करण्याचा दावा मजबूत करण्याची आणखी एक संधी राहणार आहे. त्याच्या नेतृत्वाखाली लखनऊ सुपर जायंट्स संघ आयपीएलमध्ये मंगळवारी मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळणार आहे.

मंगळवारी गुणतालिकेत पाचव्या क्रमांकावर असणारा लखनौ सुपर जायंट्स संघ अगदी तळाशी म्हणजे नवव्या स्थानावर असलेल्या मुंबईशी झुंज देईल. मुंबईला गोलंदाजांची उणीव भासणार आहे. एलएसजीने ९ पैकी ५ जिंकले, तर मुंबईने ९ पैकी ३ सामने जिंकले आहेत.

केएल राहुलचा स्ट्राईक रेट टी-२० क्रिकेटमध्ये चिंतेचा विषय ठरला आहे. पॉवरप्लेमध्ये क्षेत्ररक्षणावर बंधने असूनही, राहुलने आयपीएलमध्ये संथ सुरुवात केली आहे. मात्र, या मोसमात त्याने बदल केला. २०२४ च्या मोसमात तो आता १४४ धावांवर आहे. २७ च्या सरासरीने ३७८ धावा केल्या आहेत. तसे, ऋषभ पंतचा स्ट्राईक रेट १६० आहे.

यष्टिरक्षण आणि फलंदाजी या दोन्ही क्षेत्रांत चमकदार कामगिरी केल्यामुळे पंतचे टी-२० विश्वचषक संघातील स्थान जवळपास निश्चित झाले आहे. संजूनेही राजस्थान रॉयल्ससाठी आक्रमक खेळी करत आपला दावा भक्कम केला आहे. अशा स्थितीत आपल्या संघाला मोठी धावसंख्या उभारता यावी आणि आपला दावा मजबूत करता यावा यासाठी राहुलला अधिक आक्रमकपणे खेळावे लागेल.

गेल्या सामन्यात लखनौचा राजस्थान रॉयल्सने सात गडी राखून पराभव केला होता. आता वेगवान धावा करण्याची जबाबदारी क्विंटन डी कॉक, मार्कस स्टॉइनिस आणि निकोलस पूरन यांच्यावर असेल. त्यांच्यासमोर मुंबईचे गोलंदाजी आक्रमण आहे.

मुंबईचा संघ गुणतालिकेत नवव्या स्थानावर असून प्लेऑफच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी त्यांना सर्व सामने जिंकावे लागतील. भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि टी-२० मध्ये नंबर वन फलंदाज सूर्यकुमार यादव यांच्याकडून चांगल्या खेळीची अपेक्षा असेल. या मोसमात बॅट आणि बॉल या दोन्ही बाबतीत अपयशी ठरलेल्या हार्दिकला विश्वचषक संघात स्थान मिळवण्यासाठी चांगली कामगिरी करावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ :** श्री अटलबिहारी वाजपेयी क्रिकेट स्टेडियम, लखनौ
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्‌वर




# भारताकडून इंग्लंडचा ५-० ने धुव्वा



एच. एस. प्रणॉय



थॉमस कप अंतिम फेरीच्या दुसऱ्या सामन्यात भारताचा सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी (उजवीकडे) आणि चिराग शेट्टी इंग्लंडच्या खेळाडूचा शॉट परतवताना

### उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश
### थॉमस, उबेर चषक बॅडमिंटन

◆ **चेंगडू, २९ एप्रिल**

गतविजेत्या भारताने थॉमस आणि उबेर चषक बॅडमिंटन २०२४ मध्ये पुरुष गटाच्या लढतीत इंग्लंडवर ५-० असा सहज विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

भारतीय पुरुष संघ, ज्याने त्यांच्या स्पर्धेच्या सलामीच्या लढतीत थायलंडला पराभूत केले होते, ते आता गट विजेते ठरवण्यासाठी इंडोनेशियाशी भिडतील. भारतीय महिलांनीही सलग दोन विजयांसह शेवटच्या आठमध्ये स्थान मिळवले आहे आणि मंगळवारी अ गटातील शेवटच्या लढतीत त्यांचा सामना चीनशी होणार आहे.

पुरुषांच्या गट क गटात जागतिक क्रमवारीत ९व्या स्थानावर असलेल्या एच. एस. प्रणॉयने हॅरी हुआंगवर २१-१५, २१-१५ असा विजय मिळवून संघाला विजयी सुरुवात केली.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्यावर बेन लेन आणि सीन वेंडी या इंग्लंडच्या जोडीने दबाव टाकला होता पण जागतिक क्रमवारीत नं. ३ संयोजनांनी त्यांच्या मोठ्या सामन्यातील अनुभवाच्या जोरावर एक तास पाच मिनिटांत २१-१७, १९-२१, २१-१५ असा विजय मिळवला.

या टायसाठी संघ व्यवस्थापनाने लक्ष्य सेनला विश्रांती देण्याचा निर्णय घेतल्याने, किदाम्बी श्रीकांतने नदीम दळवीवर २१-१६, २१-११ असा विजय मिळवून भारतीयांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आणि भारताला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला.

आणखी एका आव्हानात्मक विजयाबद्दल बोलताना, सात्त्विकसाईराज आणि शेट्टी यांनी सांगितले की, परिस्थिती खूपच कठीण आहे आणि त्यांना आनंद आहे की त्यांनी आतापर्यंतचे दोन्ही सामने जिंकण्याचा मार्ग शोधला आहे.


एम. आर. अर्जुन आणि ध्रुव कपिला यांचे दुहेरीचे दुसरे संयोजन आणि जागतिक क्र. ३६ किरण जॉर्ज, तिसरा एकेरी खेळत गुणसंख्या पूर्ण करण्यासाठी त्यांचे संबंधित सामने सहज जिंकले. (वृत्तसंस्था)

# तिरंदाज दीपिका कुमारी पुन्हा अव्वल स्थानी

### विश्वचषक स्पर्धेत रौप्य पदकाची कमाई

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

शांघाय येथे नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेत रौप्य पदक जिंकणारी माजी जागतिक क्रमवारीत तिरंदाज दीपिका कुमारीला पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी लक्ष्य ऑलिम्पिक पोडियम योजनेत (अव्वल) पुन्हा समाविष्ट करण्यात आले आहे. डिसेंबर २०२२ मध्ये आई झाल्यानंतर गेल्या वर्षी संपूर्ण हंगामातून बाहेर पडलेल्या दीपिकाने नुकतेच पुनरागमन केले आहे. ती देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली खेळत आहे. तीन वेळा ऑलिम्पियन रिकर्व्ह तिरंदाज दीपिकानेही यंदाच्या आशिया चषकामध्ये पदक जिंकले.



पुरुषांच्या वैयक्तिक गटात आतापर्यंत केवळ धीरज बोम्मादेवरा ऑलिम्पिकसाठी पात्र ठरू शकला आहे. अंतिम पात्रता स्पर्धा १५ आणि १६ जून रोजी तुर्कीतील अंतल्या येथे होणार आहे. क्रीडा मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार तिरंदाज मृणाल चौहानचाही अव्वल गटात समावेश करण्यात आला आहे तर प्रवीण जाधवचाही याच गटात समावेश करण्यात आला आहे. पॅरा पॉवरलिफ्टर अशोकलाही कोअर ग्रुपमध्ये ठेवण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

**२०२८ ऑलिम्पिकची तयारी**

मिशन ऑलिम्पिक सेल ने आपल्या १३३ व्या बैठकीत स्क्वॉशपटू अनाहत सिंग, अभय सिंग आणि वेलवान सेंथिल कुमार यांना टॉप्स डेव्हलपमेंट ग्रुपमध्ये ठेवले आहे जेणेकरून ते २०२८ च्या लॉस एंजेलिस गेम्सची तयारी करू शकतील. भारताच्या वेलावन सेंथिल कुमारने बॅश ओपन चॅलेंजर स्पर्धा जिंकली आहे. व्यावसायिक स्क्वॉश असोसिएशन टूरमधील तिचे हे आठवे विजेतेपद होते. जागतिक क्रमवारीत ५८व्या स्थानावर असलेल्या सेंथिल कुमारने फ्रान्सच्या मेलविल सायनिमानिकोचा पराभव केला.

# चॅम्पियन्स चषकासाठी पीसीबीने सुचवली तीन शहरांची नावे

◆ **लाहोर, २९ एप्रिल**

पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) ने चॅम्पियन्स चषक २०२५ साठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) कडे तीन स्थळांचा प्रस्ताव ठेवला आहे. लाहोर, कराची आणि रावळपिंडी ही तीन ठिकाणे आहेत. चॅम्पियन्स चषक २०२५ चे यजमानपद पाकिस्तानला मिळाले आहे. मात्र, भारत या स्पर्धेसाठी पाकिस्तानला जाणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

अहवालानुसार, पीसीबीने तीन ठिकाणांचा मसुदा आयसीसीकडे सादर केला आहे. पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये ही स्पर्धा होणार आहे. १९९६ च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर पहिल्यांदाच पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी देण्यात आली आहे.

पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी लाहोर येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, आम्ही चॅम्पियन्स चषकासाठी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या सामन्यांचे वेळापत्रक पाठवले आहे. आयसीसीचे सुरक्षा तपासणी पथक आले आणि आमची खूप चांगली बैठक झाली. आम्ही आयसीसीच्या सतत संपर्कात आहोत. चांगल्या स्पर्धेचे आयोजन करण्याचा आमचा प्रयत्न आहे. (वृत्तसंस्था)

**भारतीय संघाबाबत संभ्रम**

गेल्या महिन्यात सूत्राने असा दावा केला होता की, आयसीसी हे आशिया चषकाप्रमाणे 'हायब्रिड मॉडेल'वर आयोजित करू शकते. आयसीसी कार्यकारी मंडळातील एका सूत्राने सांगितले की, जर भारत सरकार भारतीय संघाला पाकिस्तानला पाठवू इच्छित नसेल, तर आयसीसी बीसीसीआयवर दबाव आणू शकत नाही. त्यांना पर्याय शोधावा लागेल.

# टी-२० विश्वचषकासाठी न्यूझीलंडचा संघ जाहीर

### विल्यमसनकडे कर्णधारपद

◆ **वेलिंग्टन, २९ एप्रिल**

२०२४ मध्ये वेस्ट इंडीज आणि अमेरिकेत खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी न्यूझीलंड संघाची घोषणा करण्यात आली आहे. न्यूझीलंड क्रिकेट मंडळाने सोमवारी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली.

स्टार खेळाडू केन विल्यमसनकडे कर्णधारपदाची धुरा सोपविण्यात आली आहे. एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये शानदार फलंदाजी करणाऱ्या रचिन रवींद्रचाही संघात समावेश करण्यात आला आहे. रचिन आणि मॅट हेन्री पहिल्यांदाच टी-२० विश्वचषक स्पर्धेत खेळणार आहेत. बेन सीअर्सचा १६वा राखीव खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे. यावेळी टी-२० विश्वचषकात एकूण २० संघ सहभागी होत आहेत. न्यूझीलंडने या स्पर्धेसाठी प्रथम संघ जाहीर केला आहे.

**न्यूझीलंड संघ**

केन विल्यमसन (कर्णधार), फिन ॲलन, ट्रेंट बोल्ट, मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉनवे, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, डॅरिल मिशेल, जिमी नीशम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, ईश सोढी आणि टीम साउदी. (वृत्तसंस्था)


# दिल्लीचा कोलकाताकडून दुसऱ्यांदा पराभव

### फिल सॉल्टचे अर्धशतक, चक्रवर्तीचे ३ बळी

**वृत्तसंस्था, कोलकाता, दि. २९ एप्रिल-**

आयपीएल-२०२४च्या ४७व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सचा ७ गडी राखून पराभव केला. कोलकाताने या मोसमात दिल्लीचा दुसऱ्यांदा पराभव केला आहे.

इडन गार्डन्स स्टेडियमवर कोलकताने १५४ धावांचे विजयी लक्ष्य १६.३ षटकात ३ गडी गमावून पूर्ण केले. कोलकताकडून फिल सॉल्टने शानदार अर्धशतकी खेळी केली. त्याने ३३ चेंडूत ६८ धावा फटकाविल्या. त्याने या मोसमातील चौथे अर्धशतक झळकावले. सुनील नारायणने १५ आणि रिंकू सिंगने ११ धावांचे योगदान दिले. दिल्लीकडून अक्षर पटेलने २ बळी घेतले. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने निर्धारित २० षटकांत ९ बाद १५३ धावा केल्या.दिल्लीच्या कुलदीप यादवने २६ चेंडूत नाबाद ३५ धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंतने २७ धावांची खेळी केली. वरुण चक्रवर्तीने ३, तर वैभव अरोरा आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. मिचेल स्टार्क आणि सुनील नारायण यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.



# महेंद्रसिंग धोनीच्या नावे आयपीएलमध्ये नवा विक्रम

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

महेंद्रसिंग धोनी चेन्नई संघाचा कर्णधार नसला तरी त्याची मैदानावरील उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधून घेते. तो मैदानावर असला तर प्रेक्षक त्याच्या नावाचा घोष करतात. याच धोनीने रविवारी आयपीएलमध्ये आणखी एका विक्रमाची नोंद केली. हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात धोनी एक खेळाडू म्हणून १५० व्या आयपीएल विजयाचा एक भाग बनला.

चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्जने सनरायझर्स हैदराबादचा ७८ धावांनी पराभव केला. चेन्नईने फलंदाजीमध्ये शक्तिशाली असलेल्या संघाला केवळ १३४ धावांत गुंडाळले.

आयपीएल सुरू झाल्यापासून धोनी टी-२० लीगचा भाग आहे. ४२ वर्षीय धोनी हा आयपीएलमध्ये पाच विजेतेपद मिळवून देणारा यशस्वी कर्णधार आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएल हंगामापूर्वी धोनीने चेन्नई सुपर किंग्जची धुरा ऋतुराज गायकवाडकडे सोपवली होती. महेंद्रसिंह धोनीच्या नावावर १३३ विजयांसह आयपीएलमधील सर्वात यशस्वी कर्णधाराचा विक्रम आहे. (वृत्तसंस्था)

**आयपीएलमधील खेळाडूने जिंकलेले सामने**

| | |
|---|---|
| एम. एस. धोनी- | १५० |
| रवींद्र जडेजा- | १३३ |
| रोहित शर्मा- | १३३ |
| दिनेश कार्तिक- | १२५ |
| सुरेश रैना- | १२२ |

# मंधाना पुणे संघाची कर्णधार


### नाशिककडून अनुजा पाटील

◆ **पुणे, २९ एप्रिल**

सध्या आयपीएलचा हंगाम सुरू आहे. स्पर्धेत चुरस निर्माण झाली आहे. अशातच महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या महिला प्रीमियर लीगसाठी चार संघांची मालकी घेण्यासाठी झालेल्या लिलाव प्रक्रियेत विक्रमी रुपयांची बोली लागली. भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना पुणे संघाकडून खेळणार आहे. ती पुण्याची कर्णधार असेल, तर अनुजा पाटील ही नाशिकमधून खेळताना दिसणार आहे.

चार संघांसाठी संघ मालकांनी तब्बल १५.९ कोटी रुपये खर्च केले. सर्व राज्य संघटनांमध्ये महिला संघाच्या मालकीसाठी मिळालेला हा विक्रमी महसूल ठरला. महिलांसाठी स्वतंत्र टी-२० लीग आयोजित करणारी महाराष्ट्र क्रिकेट लीग ही एकमेव राज्य संघटना असून, लीगला २४ जूनपासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेत एकूण १३ सामने खेळले जातील.

एमपीएलमधील पुणेरी बाप्पा संघाचे मालक असलेल्या सह्याद्री सुजनिल्स ४ एस समूहाने महिला प्रीमियर लीगमध्येदेखील पुणे संघासाठी सर्वाधिक ५.१ कोटी रुपयाची बोली लावली. महिला संघदेखील पुणे बाप्पा संघाने ओळखला जाईल.



फ्रँचाईजीने भारताची उपकर्णधार स्मृती मंधानाची आपल्या संघाची आयकॉन खेळाडू म्हणून निवड केली.

वाई एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेडने नाशिक संघासाठी ३.८ कोटी रुपयांची दुसरी सर्वोत्तम बोली लावली. त्यांनी भारताची आंतरराष्ट्रीय खेळाडू अनुजा पाटीलची आयकॉन खेळाडू म्हणून निवड केली. सोलापूर रॉयल्सची मालकी असलेल्या कपिल सन्स समूहाने या वेळी रत्नागिरी संघासाठी ३.६ कोटी रुपयांची बोली लावली. कंपनीने पुढे आपल्या शहर आणि जिल्ह्यातील बदलाचा निर्णय घेत रायगड सोबत जाण्याचा निर्णय घेतला. या संघाचे नाव रायगड रॉयल्स असे असेल. या संघाने आक्रमक फलंदाज आंतरराष्ट्रीय खेळाडू किरण नवगिरे आपली आयकॉन खेळाडू म्हणून निवडले. (वृत्तसंस्था)

### महेश्वरी चौहान पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र

**नवी दिल्ली :** भारताची नेमबाज महेश्वरी चौहान हिने महिलांच्या स्कीट प्रकारात रौप्यपदकाची कमाई करीत भारताला पॅरिस ऑलिंपिकसाठीचा कोटा मिळवून दिला. हा भारताचा २१ वा ऑलिम्पिक कोटा ठरला. दोहा येथे पॅरिस ऑलिम्पिकची पात्रता फेरी आयोजित करण्यात आली होती.

महेश्वरी चौहान हिने रौप्यपदक मिळवत ऑलिम्पिकसाठी पात्र ठरल्यानंतर आनंद व्यक्त केला. गेल्या काही वर्षांमध्ये प्रचंड मेहनत केली आहे. त्यामुळे साहजिकच आनंद होत आहे. शूट ऑफमध्ये थोडीशी बिथरली. मात्र, माझ्या कामगिरीने समाधानी आहे, असे विजयानंतर महेश्वरी म्हणाली. भारताची महेश्वरी चौहान व चिलीची फ्रान्सिस्का चाडीड यांच्यामध्ये ६० शूटनंतर ५४-५४ अशी बरोबरी झाली. शूटऑफचा अवलंब करण्यात आला.

यामध्ये फ्रान्सिस्काने महेश्वरीला ४-३ असे पराभूत केले. महेश्वरीला रौप्यपदक मिळाले. ती पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचली होती.

# इस्तंबूलमधील ऑलिम्पिक पात्रता संघ कायम

### भारतीय कुस्ती महासंघाचा निर्णय


◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

भारतीय कुस्ती महासंघाने नवीन चाचण्यांसाठी वेळेअभावी पुढील महिन्यात इस्तंबूल येथे होणाऱ्या अंतिम ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेसाठी बिश्केकमधील आशियाई पात्रता स्पर्धेत भाग घेतलेल्या जवळपास त्याच संघाची निवड केली आहे.

इस्तंबूल येथे ९ ते १३ मे या कालावधीत होणाऱ्या जागतिक ऑलिम्पिक खेळांच्या पात्रता फेरीतील आशियाई पात्रता फेरीतील तीन कुस्तीपटूंचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती विनेश फोगट (५० किलो), अंशू मलिक (५७ किलो) आणि २३ वर्षांखालील जागतिक चॅम्पियन ऋतिकाचा समावेश करण्यात आलेला नाही कारण त्यांनी गेल्या महिन्यात बिश्केकमध्ये पात्रता सिद्ध केली आहे.

भारतीय कुस्ती महासंघ (डब्ल्यूएफआय) बिश्केकमधील भारतीय पुरुष संघाच्या खराब कामगिरीवर नाखूष होता आणि अंतिम ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेसाठी संघ निवडण्यासाठी नवीन चाचण्या घेण्याची योजना आखत होता. परंतु डब्ल्यूएफआयच्या एका सूत्राने सांगितले की, बिश्केकमधील आशियाई ऑलिम्पिक पात्रता आणि इस्तंबूल स्पर्धा यांच्यातील अत्यंत मर्यादित कालावधीमुळे नवीन चाचण्या घेण्याचा विचार टाळणे भाग पडले.

सूत्राने सांगितले की, जरी महासंघाला आशियाई खेळ आणि इस्तंबूलमधील आगामी जागतिक ऑलिम्पिक स्पर्धेच्या पात्रता फेरीदरम्यान एक महिन्याचा कालावधी असला तरीही पॅरिस ऑलिम्पिकसाठी अंतिम पात्रता फेरीसाठी त्यांनी नव्या चाचण्या घेतल्या असत्या. भारतीय कुस्तीपटूंना इस्तंबूलमधील पॅरिस ऑलिम्पिकसाठी आणखी काही कोटा मिळवण्याची चांगली संधी आहे. निवेदनानुसार, ग्रीको-रोमन स्पर्धा ९ मे रोजी सुरू होईल, त्यानंतर महिला कुस्ती आणि फ्रीस्टाइल श्रेणींमध्ये स्पर्धा होतील. ही स्पर्धा १३ मे रोजी संपणार आहे. (वृत्तसंस्था)



**भारतीय संघ**

**फ्रीस्टाईल :** अमन (५७ किलो), सुजित (६५ किलो), जयदीप (७४ किलो), दीपक पुनिया (८६ किलो), दीपक (९७ किलो), सुमित (१२५ किलो).

**ग्रीको रोमन :** सुमित (६० किलो), आशु (६७ किलो), विकास (७७ किलो), सुनील कुमार (८७ किलो), नितेश (९७ किलो), नवीन (१३० किलो).

**महिला कुस्ती :** मानसी (६२ किलो), निशा (६८ किलो).

## संक्षिप्त वृत्त



### पुण्यातील डी. फार्म मेगा जॉब फेअरला बार्शीच्या सोजर फार्मसीचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी, दि. २९ एप्रिल-**

डी. फार्मसी क्षेत्रात करियर करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विविध औषध निर्माण कंपन्यांना एकत्र आणून नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन पुणे यांनी प्रथमच आयोजित केलेल्या डी. फार्म मेगा जॉब फेयरला संपूर्ण महाराष्ट्रातून उत्स्फूत प्रतिसाद लाभला. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचादेखील यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद होता. पुणे शहर आणि जिल्ह्यातील एकूण ४६ पदविका औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये आणि २५ फार्मास्युटिकल कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवला. पुणे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे हा जॉब फेअर पार पडला. महाराष्ट्रातून एकूण दोन हजार विद्यार्थ्यांनी या जॉब फेअरमध्ये नोंदणी केली होती. स्पॉट रजिस्ट्रेशन करुनही विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. औषध निर्माण क्षेत्रातील २५ कंपन्या जॉब फेअरमध्ये सहभागी झाले होते. यावेळी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे मान्यता समिती सल्लागार डॉ. नरेंद्र गोवेकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास व रोजगार पुणे विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, तंत्रशिक्षण संचलनालयाच्या पुणे विभागीय कार्यालयाचे सहाय्यक संचालक मारुती जाधव, महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलचे अध्यक्ष अतुल अहिरे उपस्थित होते. सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमधील तब्बल १४ विद्यार्थ्यांनी यामध्ये नावनोंदणी केली होती तर आठ विद्यार्थ्यांची ऑप्टिवल हेल्थ सोल्युशन प्रायव्हेट लि; या कंपनीमध्ये रिटेल फार्मासिस्ट या पदासाठी निवड करण्यात आली. यासाठी प्रा. पी. ए. जाधव, डॉ. आर. व्ही.शेटे, डॉ. व्ही. एन. जगताप, डॉ. सचिन कोतवाल, प्रा. प्रविण जावळे, प्रा. प्रशांत हंबर, डॉ. प्रवीण साबळे, डॉ. बी. व्ही. मथादेवरु, डॉ. अमोल शहा, डॉ. जी. एम. स्वामी, प्रा. एन. ए. पाटील, प्रा. सुजित करपे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक अनिरुद्ध दडके आणि प्रा. प्रियंका बोरुडे यांनी केले, आभार प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल यांनी मानले.



### खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकरांच्या प्रचारार्थ सांगोल्यात होम टू होम प्रचार

**सांगोला, दि. २९ एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, मणेरी गल्ली, परीट गल्ली, भाजी मंडई परिसर, कुंभार गल्ली, मेन रोड या ठिकाणी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी होम टू होम प्रचार केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. सांगोला तालुक्यातील सिंचनाच्या योजना खा. नाईक-निंबाळकर यांच्या प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात मार्गी लागल्या. शेतीच्या, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. भविष्यात उर्वरित विकासकामे पूर्ण करण्यासाठी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांना पुनश्च एकदा सेवा करण्याची संधी देण्यासाठी त्यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करा असे आवाहन महायुतीच्या पदाधिकारी करत आहेत. यावेळी माजी नगराध्यक्षा राणी माने, माजी नगरसेवक आनंदा माने, माऊली तेली, माजी नगरसेविका छाया मेटकरी, आनंद घोंगडे, लता मोटे, संग्रामसिंह जाधवराव, सतीश वाघ, सूर्यकांत मेटकरी, आयुब जमादार, काशिलिंग गावडे, सुनील पवार, जय बनसोडे, अशपाक मुलाणी, शिवाजी गावडे, प्रमोद जाधव, ऋषी जानकर, मानस कमलापूरकर, काशलिंग गाडेकर, भारत माळी, प्रवीण जानकर, हरिदास कारंडे, किशोर शेंडगे, किरण ढवळे, सुमित कोल्हे, राहुल दिवटे, सागर पवार, निलेश भोसले, मोहन घाडगे, वसंत चंदनशिवे, रेश्मा मुजावर, अनुराधा माने, सुवर्णा जाधव, अश्विनी दोलतडे, सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे, फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर उपस्थित होते.

### नशेत कार चालकाने दुचाकीस्वारास ठोकरले; कार चालकाविरुद्ध मंगळवेढ्यात गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि. २९ एप्रिल-**

ढाब्यावर जेवण करुन घराकडे परतत असताना पंढरपूर-मंगळवेढा मार्गावरील घाडगे कलेक्शनजवळ एका स्कुटीस्वाराला मद्यधुंद अवस्थेत असलेल्या कार चालकाने भरधाव वेगात येऊन समोरुन धडक दिल्याने स्कुटी चालकाला गंभीर जखमी केल्याप्रकरणी रमेश बंकट दत्तू (रा. दत्तूगल्ली, मंगळवेढा) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी, यातील जखमी प्रशांत नीलकंठेश्वर चिंचकर हा दि.२६ रोजी रात्री १०.३० वाजता (क्र. एम. एच.१३/ डी. आर. ७३९३) या स्कुटी गाडीवरुन ढाब्यावरुन जेवण करुन मंगळवेढा शहरात घराकडे परतत असताना मंगळवेढा-पंढरपूर मार्गावर असलेल्या घाडगे कलेक्शनसमोर भरधाव वेगात आलेल्या मद्यधुंद अवस्थेत असलेल्या चालकाने (क्र. एम. एच. १०/ए. १०९५) कारने समोरुन स्कुटीला धडक दिल्याने प्रशांत हा गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान त्याची आई मनिषा चिंचकर (वय ५५, रा. शनिवार पेठ) यांनी फिर्याद दाखल केल्यानंतर कार चालक रमेश दत्तू याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

### आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांचा महिला आघाडी प्रमुख रवीना राठोड यांच्या हस्ते सत्कार

**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी शुक्रवारी अक्कलकोट नगरीत येऊन श्री स्वामी समर्थ मंदिरात दर्शन घेतले. आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांचे स्वागत शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख रवीना राठोड यांनी केले. आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांचा शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख रवीना राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका उपप्रमुख उमेश पांढरे व शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी डॉ. तानाजीराव सावंत यांनी श्री स्वामी समर्थ समाधी मठात जाऊन दर्शन घेतले.

# चिंचणीतील हिरवी वनराई, स्वच्छ रस्ते अन् सुंदर इमारती पाहून भारावले प्रशिक्षणार्थी

**पाणी फाउंडेशन प्रशिक्षणादरम्यान गावाची पाहणी; ग्राम विकसित करण्याचा सगळ्यांनी घेतला ध्यास**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

चिंचणीतील हिरवी वनराई, स्वच्छ रस्ते, सुंदर इमारती पाहून पाणी फाऊंडेशनच्या प्रशिक्षणासाठी आलेले सदस्य भारावून गेले.

सातारा जिल्हातील कन्हेर धरणामुळे बाधित झालेल्या धरणग्रस्तांना माढा व पंढरपूर तालुक्याच्या मधोमध राहण्यासाठी शासनाने प्रत्येक कुंटुबास चार गुंठे जागा व दोन एकर शेती देऊन स्थलांरित करण्यात आले. सारं बिराड घेऊन ही माणसं नवख्या जागेत माळरानावर राहण्यास आली. मात्र डोळ्यात एक स्वप्न घेऊन अन् पोटापाण्याचा प्रश्न हाताळत गाव डेव्हलप करण्याची जिद्द घेतली. मोहन अनपट यांची संकल्पना व दूरदृष्टीतून आज पर्यटण स्थळ म्हणून महाराष्ट्रात लौकिक ठरलेलं चिंचणी हे गाव..

पाणी फौऊडेशन प्रशिक्षणासाठी भागाईवाडी, वांगी, दारफळ गा, दारफळ बीबी, बाणेगाव येथील ६० शेतकरी चिंचणी येथील प्रशिक्षण केद्रात आले. त्यांना भेटून प्रोत्साहित करण्यासाठी व गाव पहाण्यासाठी आवर्जून आलो. ६५ कुंटुबीय ३५० लोकसंख्या असलेलं. नुकतीच स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून मान्यता मिळालेल चिंचणी गाव पाहून मानसिक समाधान वाटलं. दृष्टी देणारे नेतृत्व आणि अमंलबजावणी करणाऱ्यांचा सुर, ताल, लय,



जमला की चिंचणीसारखी गाव निश्चित उभा राहतातच. गावातील अंतर्गत सिमेंट रस्ते, रस्त्यालगत झाडे, निसर्गरम्य गार्डन, त्यामध्ये बसण्यासाठी बाजा, सिमेंट बाकडे, जिल्हा परिषद ज्ञानमंदिर पहिले ते चौथीपर्यंत. शाळेचे अंतरंग व बाह्यरंग पाहून कौतुक वाटलं. इंग्रजी माध्यमाला लाजवतील अशा सोयी, सुविधा, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवण्यासाठी वस्तूसंग्रालय, यामध्ये शेती औजारे, धान्य साठवण्यासाठी कणगी, विहीर, ग्राऊंड, घनकचरा व्यवस्थापन, जेवणासाठी महिलांच्या व्यवस्थापनाखाली हॉटेल. पंचतारांकित हॉटेलपेक्षा, घोंगडीवर बसून चौरंगाच्या पाटावर, गावरान भोजनाचा आस्वाद अवीट ठरतो. यावेळी काही पर्यटकांच्या बच्चे कंपनीशी संवाद साधला तर आम्हाला लय भारी वाटतंय. नुसतं फिरायचं अन् बागडायच असं सांगत होती. लोकसभा झाल्यावर या ग्रामपंचायतची स्थापनेनंतर पहिली सार्वत्रिक निवडणूक होईल. तत्पूर्वी ग्रामपंचायत कार्यालयातील सजावट, फर्निचर, काम सुरु आहे. या कार्यालयात येणारा नवीन सरपंच भाग्यवान ठरणार आहे. पाणी व्यवस्थापन, सोलर प्लांट, नव्याने दृष्टीक्षेपात असलेले ॲम्पी थिएटर, पर्यटकांसाठी रो-हाऊस बंगलोज, संकल्पना घेऊन सर्व ग्रामस्थ एकविचाराने, एकमताने झटतात.

> स्थलांतरित झालो असलो तरी डोळ्यात विकासाचे, आदर्शवत गाव उभा करण्याची जिद्द घेऊन सातारा येथील आलेले मोहन अनपट यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांनी एकीने उभ्या केलेल्या निसर्गरम्य चिंचणी गावात पाणी फाऊंडेशन प्रशिक्षण केंद्र प्रशिक्षितांना मेजवानी ठरली. पाणी फाऊंडेशनचे उत्तर सोलापूर तालुका समन्वयक आतिश शिरगिरे यांच्यामुळे प्रशिक्षणात सहभागी होण्याचा व त्यानिमित्ताने एक सुंदर गाव पहाण्याचं भाग्य लाभलं.
>
> **-कविता घोडके-पाटील,**
> **महिला जिल्हाध्यक्षा, सरपंच परिषद, सोलापूर**

## धर्मसंकीर्तनात ‘ही स्वामींची इच्छा’ नाट्यप्रयोगाचे सादरीकरण

**बालकलाकारांनी जिंकली भाविकांची मने**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात चौथे पुष्प ‘ही स्वामींची इच्छा’ या सजीव नाट्य प्रयोगाच्या सादरीकरणाने गुंफले.

प्रारंभी सर्व नाट्य कलाकारांचा मंदिर समितीच्या वतीने सचिव आत्माराम घाटगे, महेश गोगी, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून अक्कलकोटच्या इतिहासात प्रथमच महाराजांच्या सभामंडपात नाटक सादर झालं. या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून आताच्या आधुनिक युगात चिमुकल्या मुलांना अध्यात्माची ओढ लावण्याचा मुंबईचे सादरकर्ते रमेश वारंग मानस आहे. या नाट्य प्रयोगात स्वामींच्या प्रमुख भुमिकेत के. राघवकुमार हा होता. रश्मी नाईक, मनीषा ठाकूर, आनंदी पितळे, अजिंक्य पितळे, सुहास तावडे, मौलिक भट, आकाश टेंभुर्णीकर, गौरवी पवार, मान्यता पवार, अथर्व पवार, प्रणवी निकम, आरुष रणखांबे, आराध्या रणखांबे, सोहम खराटे, स्वरा मिस्त्री, करण पवार, मंथन चव्हाण, आरंभ पितळे, आनंदी पितळे, दिव्यांका चव्हाण, रमेश वारंग आदी कलाकारांनी सहभाग नोंदवून श्री स्वामी समर्थांच्या जीवन चरित्रावर आधारित विविध चमत्कारांचे सजीव नाट्य सादरीकरण केले. यातून स्वामी समर्थांचा सहवास भाविकांसोबत असल्याची अनुभूती भाविकांनी अनुभवली. सूत्रसंचालन ओंकार पाठक यांनी केले.

यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, ओंकार पाठक, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, ज्ञानेश्वर भोसले, प्रसाद किलजे, दत्तात्रय नाडगौडा, दर्शन घाटगे, अमर पाटील, मोहन जाधव, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, निंगूताई हिंडोळे, सुरेखा तेली, सुवर्णा जाधव, लखन गवळी, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, रवीराव महिंद्रकर उपस्थित होते.

## अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ मंदिरात नामवीणा सप्ताहाला भक्तिभावात सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थानच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त अखंड नामवीणा सप्ताहाची सुरुवात सोमवारी पहाटे ६ वाजता झाली. नामवीणा सप्ताहाचा शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी वटवृक्ष मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात वीणापूजन मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते होऊन सत्संग महिला भजनी मंडळाचे भजन झाले. मंदार महाराजांच्या हस्ते प्रथमेश इंगळे यांच्या हाती वीणा दिली. सतत ७ रात्र आणि दिवस हा वीणा खाली न ठेवता मुखाने स्वामी नाम घेत अखंड चालू




ठेवतात. भाविकांना १ तास वीणा देण्यात येते. इंगळे परिवाराची ही चौथी पिढी आहे. सात दिवस या नामवीणा सप्ताहात अनेक भाविक सहभागी होतात. श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी रोजी सकाळी ७ वा. या वीणा सप्ताहाची समाप्ती होते. याप्रसंगी मंदिर समिती सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वलाताई सरदेशमुख, श्रीशैल गवंडी, इरप्पा हिंडोळे, कौशल्या जाजू, प्रदीप हिंडोळे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, अमर पाटील, बाबा सुरवसे, दर्शन घाटगे, राजू हिप्परगी, अक्षय सरदेशमुख, बाबर, निर्मलाताई हिंडोळे, सुरेखा तेली, स्वाती गंभीरे, भंडारे, प्रसाद सोनार, बाळासाहेब घाटगे, प्रसन्न हत्ते, नागनाथ गुंजले, गिरीश पवार, संजय पवार, संतोष पराणे, ऋषिकेश लोणारी, विश्वास शिंदे, सचिन हन्नुरे, सागर गोंडाळ, ज्ञानेश्वर भोसले यांच्यासह भाविक उपस्थित होते.

## पिलीव परिसरात प्रथमच तापमानात प्रचंड वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २९ एप्रिल-**

पिलीव परीसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. सूर्य आग ओकत असल्याने ऊन व उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

सोलापूरनंतर पिलीव परिसरात प्रथमच तापमान ४१ अंशापर्यंत पोहचले आहे. यामुळे सर्वसामान्य जनता, पशू-पक्षी अक्षरशः हैराण झाले आहेत. या वाढणाऱ्या तापमानाचा शरीरावर प्रतिकुल परिणाम जाणवत आहे. लहान बालके, वयोवृद्धांना याचा प्रचंड त्रास होत आहे. दुपारी सर्वसामान्य नैसर्गिक झाडाच्या सावलीचा आधार घेत आहेत. थंड पेये, सरबत, लस्सी,



ताक, उसाचा रस, ज्युस पिण्याकडे नागरिकांचा मोठा कल आहे. दिवस त्रासात घालविल्यानंतर रात्री झोपण्यासाठी घराच्या गच्चीचा किंवा घरासमोरील अंगणाचा वापर केल्याचे दिसत आहे. त्यातच एक-दोन अवकाळी पाऊस झाल्यामुळे तापमानात वाढ झाल्याचे बोलले जात आहे. अजून किमान महिनाभर हा त्रास नागरिकांना सहन करावा लागणार असल्याचे चित्र आहे. मात्र वाढलेल्या तापमानामुळे जीवनमाननावर विपरित परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

## भाजपामुळे लोकशाहीला दृष्ट लागली : आ. प्रणिती शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

भाजपमध्ये लोकशाहीला दृष्टी लागली. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा हे बिघडवायला निघाले आहेत म्हणून हे लोक आपली संस्कृती परंपरा आपली एकी बिघडवत असतील आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचा अंत पाहत असतील. आरक्षणासाठी हे बोलायला तयार नाहीत. ही खरी लोकशाहीची परीक्षा असल्याचे प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांनी केले आहे.

हुलजंती येथील सभेत त्या बोलत होत्या. प्रणिती शिंदे यांनी बोराळे, मरवडे, हुलजंती सलगर बुद्रुक पंचायत समिती गण दौरा केला. यावेळी कार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, रतनचंद शहा बँकेचे अध्यक्ष राहुल शहा, दिलीप जाधव, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कोंडुभैरी, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रा. येताळा भगत, प्रथमेश पाटील, हणमंत दुधाळ, साहेबराव पवार, पांडुरंग चौगुले, पांडुरंग जावळे, दौलत माने, दादा पवार, साहेबराव पवार, पै. दामोदर घुले, मनोज माळी रविकरण कोळेकर, राजाराम जगताप, तुकाराम भोजने, अजय अदाटे, पांडुरंग निराळे, बापू अवघडे, नाथा ऐवळे, सुनीता अवघडे आदींसह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

प्रणिती शिंदे म्हणाल्या, मी सोलापूर शब्द दिला आहे. पहिला आवाज लोकसभेमध्ये शेतकऱ्यांसाठी असेल. पहिला आवाज पाण्यासाठी आणि आरक्षणासाठी असेल. मी कामाची पक्के आहे. मी राजकारणात सत्तेसाठी आणि टक्केवारीसाठी आले नाही. मी तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी आली आहे.



> **सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणार**
>
> मी प्रतिज्ञापत्र तयार केले असून हे प्रतिज्ञापत्र दोन दिवसात तुमच्यासमोर जाहीर करणार आहे. दरम्यान, मी सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणारच. सोलापूर जिल्हा लोडशेडिंगमुक्त करणार. शेतकऱ्यांना एमएसपी मिळवून देणार आणि कर्जमुक्त करणार. प्रत्येक गावात येणारा रस्ता मी करणार,. सोलापुरात युवकांसाठी आयटी पार्क आणि नोकरीसाठी उद्योग आणणार, असे आश्वासन यावेळी आ. प्रणिती शिंदे यांनी दिले आहे. दरम्यान मी हे काम नाही केले तर, कान धरून खाली बसवण्याचा अधिकारदेखील तुम्हाला असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

# मोहोळमधील दुष्काळी जनतेला राजू खरेंचा आधार...!

**पाच टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा; ‘मागेल त्याला पिण्याचे पाणी’ देण्याच्या मोहिमेला उत्साहात सुरुवात**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ एप्रिल-**

मोहोळ विधानसभा राखीव मतदारसंघाचे उमेदवार उद्योजक आणि समाजसेवक राजू खरे यांनी पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता, नागरिकांच्या मागणीनुसार पहिल्या टप्प्यात पाच टँकरच्या माध्यमातून रविवार दि. २९ एप्रिलपासून २४ तास पिण्यासाठी मोफत पाणीपुरवठा सुरू केला आहे.

राजू खरे यांनी मागील अनेक वर्षांपासून मोहोळ विधानसभा लढविण्यासाठी मोठी तयारी ठेवली आहे. यामुळे मागेल त्याला रस्ता आणि मागेल त्याला पाणी देण्याची हिम्मत ठेवली आहे. मागील काही दिवसांपूर्वी अनेक गावांतील लोकांसाठी बोअर पाडून दिले होते. काही काळ हे बोअरमधून पाणीपुरवठा केला गेला. सध्या ऐन उन्हाळा आणि दुष्काळाची मोठी छाया पडली आहे. यामुळे




बोअरमधील पाणीपुरवठा बंद पडला आहे. यातूनही माझ्या मतदारसंघातील लोकांना पाणी मिळाले पाहिजे हीच भूमिका पार पाडण्यासाठी राजू खरे यांनी मोहोळ मतदारसंघातील लोकांसाठी खास टँकर सुरू केले आहेत. मोहोळ शहरातील लोकांसाठी २, मोहोळ ग्रामीण भागासाठी दोन आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील लोकांसाठी मोठा एक टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे. आगामी काळात पाण्याची मागणी वाढतच जाणार आहेत. त्यासाठी आणखी टँकर वाढविण्याची तयारी खरे यांनी ठेवली असून आपण मोहोळ विधानसभा मतदारसंघातील लोकांना पाणी कमी पडू देणार नसल्याचेही सांगितले आहे.

खरे यांनी आजवर अनेक गावांतील रस्ते, आरोग्यासाठी मदत, शिक्षण संस्थांना मोठी मदत याबरोबरच गरिबांना लग्न कार्यासाठी आर्थिक मदत, विविध जयंती उत्सव यासाठी आपला हात कायम सढळ ठेवला आहे. त्यामुळे मोहोळ मतदारसंघातील नागरिकांनी आपल्याला पाणी देणारा एकच नेता आहे. त्याचे नाव राजू खरे असून यांच्याकडे मागणी केली होती. याची तात्काळ दाखल घेत पहिल्या टप्प्यात पाच टँकरच्या माध्यमातून अनेक खेपा करून गावोगावी पाणीपुरवठा सुरू केला आहे. यामुळे अडचणीच्या काळात मदतीला धावून येणाऱ्या या राजू खरे यांचे विशेष आभार मानले जात आहे.

> **जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही**
>
> सध्या लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत पालकमंत्री, मंत्री यासह प्रशासन गुंतले आहे. यामध्ये पाणी टंचाईबाबत कोणीही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. यामुळे आपण अशा या लोकसभा निवडणुकीत अलिप्त राहू. पण माझ्या मतदारसंघातील जनतेला पाणी देऊ अशी प्रतिक्रिया राजू खरे यांनी व्यक्त केली आहे. पंढरपूर तालुक्यातील जी गावे या मोहोळ मतदारसंघात येत आहेत. त्यांच्यासाठीही लवकरच दुसऱ्या टप्प्यात मागणीनुसार आपण पाहिजे तेवढे टँकर उपलब्ध करून देणार असल्याचे जाहीर केले आहे.

## क्राईम वृत्त

### जुळे सोलापुर सहयोग नगरातील महिलेची गळफास घेऊन आत्महत्या




**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

जुळे सोलापुरातील सहयोग नगरात राहणाऱ्या महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. भाग्यश्री धोंडीबा श्रेणी (वय ३०) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. २८ एप्रिल रोजी रात्री राहत्या घरी सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आल्याने नातेवाईकांनी खाली उतरवून बेशुध्दावस्थेत भाग्यश्री यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. ध्रुव गायकवाड यांनी भाग्यश्री यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शांती चौकातील स्मशानभूमीत कुत्रा चावल्याने तरूण जखमी



**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

शांती चौकातील स्मशानभूमीत दोन महिलांची भांडणे बघणाऱ्या तरूणाच्या अंगावर सोडलेल्या कुत्र्याने तरूणाचा चावा घेऊन त्यास जखमी केले. ही घटना रविवारी सायंकाळी घडली. नागेश यलप्पा मंठाळकर (वय २३, रा. रविवार पेठ, सोलापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. रविवारी सायंकाळी शांती चौक येथील स्मशानभूमी येथे भांडण चालू असताना बघत थांबला होता. त्यावेळी तु कशाला थांबला म्हणून रेणुका शिंदे व संगीता मंजेली यांनी अंगावर पाळीव कुत्रा सोडला. या कुत्र्याने नागेश यास दोन ठिकाणी चावा घेऊन जखमी केले. जखमी अवस्थेत नागेशवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दारुच्या नशेत हातावर ब्लेडने मारून घेणाऱ्या दारूड्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

दारूच्या नशेत ब्लेडने हातावर मारून घेतल्याने जखमी झालेल्याचा उपचारावेळी मृत्यू झाला. इरफान यासीन शेख (वय ३२, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, बाशा पेठ, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. इरफान शेख याने २७ एप्रिल रोजी रात्री पद्मशाली चौकामध्ये दारूच्या नशेत ब्लेडने हातावर मारून घेतले होते. त्यामुळे त्याला जखमी अवस्थेत त्याची बहिण समिना शेख यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरु असताना २९ एप्रिल रोजी दुपारी इरफानचा मृत्यू झाला. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात अली आहे.

### हद्दपार झालेल्या पंचवीस जणांना मतदानाला परवानगी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

हद्दपार झाले तरी पंचवीस जणांना मतदानाला परवानगी देण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी दिलीय. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शांतता सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी शहर पोलिसांकडून कलम १४४ अन्वये निवडणुकीच्या कालावधीत पाच दिवसांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. संबंधितांना मतदानासाठी येता येणार आहे. आचारसंहिता जाहीर झाल्यापासून शहर-जिल्ह्यात पोलिस यंत्रणेकडून रेकार्डवरील गुन्हेगारांची यादी करून संबंधितांवर विविध कलमान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. मोका, एमपीडीए, हद्दपार, कलम १४४ अन्वये कारवाई करण्यात आलेल्या आहेत. नागरिकांनीही अवतीभोवती घडणाऱ्या बाबींवर नजर ठेवून यंत्रणेला माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस आयुक्त एम. राज. कुमार यांनी केले आहे.

# मोदींबद्दल बोलणे म्हणजे सूर्याकडे थोबाड करून थुंकण्याचा प्रकार

## राम-राम भारतात नाही तर पाकिस्तानात करायचे का?; फडणवीसांचा ठाकरेंना सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर देण्याची आम्हाला गरज नाही. कारण देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला विकास पाहत आहेत. उद्धव ठाकरे यांनी केलेले विकासाचे एक काम तरी सांगावे. संपूर्ण जीवनात उद्धव ठाकरे यांनी एक तरी विकास काम केलेले दाखवावे, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांनी मोदींबद्दल बोलणे म्हणजे सूर्याकडे थोबाड करून थुंकण्याचा प्रकार असल्याचा टोला देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंना लगावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापुरात सभा होत आहे. महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी नरेंद्र मोदी सभा घेत आहेत. या निमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील सोलापुरात दाखल झाले आहेत. सोलापुरात दाखल होताच त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी संपूर्ण जीवनात एक तरी विकास काम केलेले आहे का? ते मला दाखवा. अडीच वर्षे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदी होते. मात्र, त्यांनी विकासाचे कुठलाच काम केले नसल्याचा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. संजय राऊत ही व्यक्ती कोण आहे? ते मला माहिती नाही. पण ठाकरेंनी मी म्हणजेच महाराष्ट्र आहे, या माणसिकतेतून बाहेर यायला हवे, अशी टीका त्यांनी केली आहे. संजय राऊत यांच्या बद्दल विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले कोण राऊत मला माहिती नाही.

### आमच्या राम-रामचा शिवसेनाला का राग?



भारतीय जनता पक्ष धार्मिक प्रचारात गुंतला असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांच्या वतीने करण्यात आला होता. त्यांना आजही राम नाव वापरावे लागत असल्याचे ते म्हणाले होते. याला देखील देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आम्ही राम - राम करतो याचा शिवसेनेला इतका राग का येतो? भारतामध्ये राम राम नाही म्हणायचे तर पाकिस्तानात म्हणायचे का? असा प्रतिप्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केलाय. आम्ही राम राम म्हणणारच, असे देखील फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

# ३६० कोळसा पोती जप्त; सांगोला वनविभागाची कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ एप्रिल-**

सांगोल्याच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी विनापरवाना कोळसा वाहतूक करणारा टेंपो (क्र. एम. एच. ४५/ ए-८२७५) मधून ३६० कोळसा पोती मुद्देमालासह जप्त करून कारवाई केली, अशी माहिती सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी दिली.

वन परिक्षेत्र अधिकारी सांगोला क्षेत्रामध्ये दिवसा गस्त घालत असताना वाढेगाव ते पुणे रस्त्यावर वाहनाची तपासणी केली. टेंपोमध्ये काळ्या ताडपत्रीने बांधून कोळसाची वाहतूक होत होती. वाहनचालकांना वनपालांनी कोळसा वाहतूक पास परवाना विचारला असता कोळसा वाहतूक करण्यासाठी माझ्याकडे वनविभागाचा वाहतूक पास नाही असे सांगितले. ३६० कोळसा पोती वाढेगाव येथून पुणे येथे अवैध वाहतूक होत होती. मुद्देमाल जप्त करुन पंचनामा करून वाहन ताब्यात घेतले. ९ हजार कि.ग्रॉ. कोळसा पोत्याची बाजार भावप्रमाणे २ लाख रु. किंमत आहे. ही कारवाई मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रविण, उपनवसंरक्षक धैर्यशील पाटील, सहाय्यक वनसंरक्षक बी. जी. हाके यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर, वनपाल एस. एल. मुंढे, वनरक्षक कटफळ, आर. व्ही. कवठाळे व हंगामी वाहन चालक संकेत बाबर यांनी केली.

# गवळी वस्ती तालीम संघाच्यावतीने जरांगे पाटील यांचा जंगी सत्कार

## आमदार प्रणिती शिंदे सत्कार न करता आल्या पावली माघारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

येथील गवळी वस्ती तालीम संघाच्या वतीने मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना जेसीबीद्वारे मोठा हार घालण्यात आला आणि जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, जय भवानी ऽऽ जय शिवाजी आदी घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी सोलापूर लोकसभेच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे या मनोज जरांगे पाटील यांचा सत्कार करण्यासाठी कार्यक्रम स्थळी दाखल झाल्या. मात्र मनोज जरांगे पाटील कोणत्याही नेत्यांचा सत्कार स्वीकारणार नाहीत, असे सांगण्यात आल्यावर त्या आल्या पावली माघारी परतल्या.

यावेळी सकल मराठा समाज समन्वयक माऊली पवार, प्रा. गणेश देशमुख, राजनभाऊ जाधव, औदुंबर जगताप, महादेव गवळी, दादा सुरवसे, हेमंत पिंगळे, सुर्या भोसले, सुनील हुंबे, लहू गायकवाड, देविदास घुले, शाम गांगर्डे, बजरंग जाधव, शोभना सागर व इतर अनेक महिला उपस्थित होत्या.

जरांगे पाटील हे जाहीर सभेसाठी सांगली मार्गे बेळगावला रवाना झाले असून यावेळी युवकांनी दिलेल्या घोषणांनी अवघा परिसर दणाणून गेला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही आज सोलापुरात आले होते. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ते प्रचारसभा घेत आहेत. महाराष्ट्रातल्या भाजपा नेत्यांमध्ये मराठा समाजाविषयी द्वेष आहे त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदींना या सभा घ्याव्या लागत असून, त्यांनी त्यांचं काम करावं आम्ही आमचं काम करतो, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. मराठा बांधवांमध्ये समज-गैरसमज असण्याचं काही कारण नाही कारण मी राजकारण करत नाही. मी महायुतीलाही पाठिंबा दिलेला नाही आणि महाविकास आघाडीलाही पाठिंबा दिला नाही. त्यामुळे समज गैरसमज बाळगू नका असंही आवाहन त्यांनी केले आहे. सत्कार स्वीकारून ते सांगली मार्गे बेळगावला रवाना झाले.



# सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीत ८७ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीत चुरशीचे मतदान झाले असून कोणाचं पॅनल निवडून येणार आणि कोण अध्यक्ष होणार याकडे वकील बांधवांचे लक्ष लागले आहे.

सोमवारी २९ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायं ७ पर्यंत मतदान पार पडले. १८३१ पैकी १५९७ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. एकूण ८७.१७% मतदान नोंदवले गेले. अमित आळंगे, राजेंद्र फताटे व एस.व्ही उजळंबे यांच्यात प्रमुख लढत होती. मतदारांची संख्या १८३१ इतकी असलेने दोन बुथ वरून १० मतदान केंद्रावर मतदान करण्याची सोय करण्यात आली होती. सकाळी पहिल्या टप्प्यात आमदार प्रणिती शिंदे व माजी केंद्रिय गृहमंत्री सुशिलकमार शिंदे यांच्या सह वयाची पंचाहत्तरी पार केलेले जेष्ठ विधीज्ञ ॲड.ए.डी. वसगडेकर, ॲड.धनंजय माने ॲड.मंगला जोशी, ॲड.एस.आर. पाटील ॲड.एस.बी.इनामदार यांनी मतदानाचा हक्क बजावला. संपूर्ण मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत पार पडली.

विशेष म्हणजे ७ मे ला सोलापूर लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होत आहे. त्यामुळे पुढील मतदानावर त्याचा परिणाम होऊ नये या करिता उजव्या हाताच्या करंगळीला शाई लावून मतदान नोंदवले जात होते. सर्व बाबींचा विचार यावेळी निवडणूक प्रक्रिया विभागाने केला होता. प्रत्येक टप्प्यावर मतदानाचे अपडेट दिले जात होते. मतदान अत्यंत चुरशीने घडवुन आणले गेले.

ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी ॲड सुरेश गायकवाड, ॲड.करण भोसले, ॲड .अविनाश काळे, ॲड अनिता रणशृंगारे, ॲड व्हि.सी.दरगड, ॲड प्रथमेश शिंदे, ॲड.दादासाहेब जाधव, ॲड अजय रणशृंगारे, ॲड. रविराज सरवदे, ॲड शताब्दी कुमार दोड्यांनूवर, ॲड मोहन कुरापाटी, ॲड सुनील क्षीरसागर, ॲड सिद्धाराम म्हेत्रे, ॲड अविनाश बिराजदार, ॲड शिवाजी कांबळे, ॲड अमोल दरवट, ॲड योगराज कलबुर्मे, ॲड रफिक शेख, ॲड सहदेव भडकुंबे, ॲड आसिफ शेख, ॲड.युवराज अवताडे, ॲड. विकास कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

# पैलवान रविराज सरवदे यांचा भाजपात प्रवेश



## कोठे यांना ८ दिवसात दुसरा राजकीय धक्का

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर लोकसभा मतदार संघाचे भाजप मित्र पक्षाचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचार सभेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज सोलापुरात होते. या निमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हेही सोलापुरात आले होते, यावेळी शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निवासस्थानी देवेंद्र फडवणीस यांनी सदिच्छा भेट असताना पैलवान रविराज सरवदे यांनी भाजपात प्रवेश केला.

या भेटी दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष पैलवान रविराज सरवदे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मागील काही दिवसांपूर्वीच महेश कोठे यांचे पुतणे माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला होता केवळ आठ दिवसातच कोठे यांना हा दुसरा धक्का बसला आहे.

पैलवान रविराज सरवदे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते तथा माजी महापौर महेश कोठे यांच्या माध्यमातून शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात युवकांची मोठी फळी तयार केली होती. यापूर्वी त्यांनी शहर उत्तरमध्ये युवकांचे अनेक मिळावे घेतले परंतु भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांच्यावर विश्वास ठेवून त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करत कोठे यांना धक्का दिला आहे.

# नकली सेना म्हणणाऱ्यांना मी सोडणार नाही?

## सोलापुरात उद्धव ठाकरेंचा पंतप्रधानांवर हल्लाबोल

## बाहेरचा उमेदवार म्हणून सातपुतेंवरही निशाणा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

उद्धव ठाकरे म्हणाले, नकली सेना बोलल्यानंतर मी त्यांना सोडतो असे वाटले का? ४८ पैकी ४२ खासदार निवडून देण्याची गंमत आहे का? आता शिवसेना तुमच्या सोबत नाही. त्या तक्तापर्यंत तुम्हाला पोहोचू देणार नाही. मोदीजी तुम्हाला देशाभिमानी हिंदुत्ववादी शिवसेना नकोय.

सोलापूरच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ठाकरेंनी पुन्हा एका मोदी-शहांवर निशाणा साधला तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना देखील पुन्हा टरबूज म्हणून हिनवले. तर मोदींवर सेक्स स्कँडलमधील आरोपीचा प्रचार करण्याची वेळ आल्याचा हल्लाबोल देखील ठाकरेंनी केला. मतदान अस्सल सोलापूरकराला निवडून आणण्यासाठी द्या, बाहेरून आलेल्या उमेदवाराची निर्यात करा, असे आवाहन करत उद्धव ठाकरे यांनी सोलापूरचे भाजप उमेदवार राम सातपुते यांच्यावर निशाणा साधला.

रवीश कुमार यांचा एक व्हिडिओ पाहा, बाजूच्या राज्यात घडलेले सेक्स स्कँडल त्यांनी उघड केले. त्याच्यासाठी आज मोदी मत मागू लागले आहेत. प्रज्वलचे हात बळकट करा, हे असले हात बळकट करायचे का तुम्हाला?, असा सवाल देखील उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, अटलजींचा आत्मा तिकडे रडत असेल. कोणाकडे आज भारतीय जनता पार्टी गेली, म्हणत असतील. मराठा आरक्षण बाबतीत तुम्ही निर्णय का घेतला नाही हे तुम्ही उद्याच्या सभेत सांगा. लोकांच्या मनात हीच भीती आहे की तुम्ही घटना बदलणार आहात. महाराष्ट्राच्या साध्या माणसाने लिहिलेली घटना मोदीजी तुम्ही बदलायला निघालेला आहात. भाजपात हिंमत असेल तर ज्या घटनेवर तुम्ही हा ठेवून शपथ घेतला. घटनेवरती हात ठेवून पाहा पूर्ण देश पेटल्याशिवाय राहणार नाही. यांना घटना का बदलायचे आहे ? कारण यांच्या मनामध्ये महाराष्ट्राबद्दल आकास आहे. म्हणून महाराष्ट्रात शिवसेना संपवण्याचा प्रयत्न केला. मी तुळजाभवानीची शपथ घेऊन सांगितलेले बाळासाहेबांना वचन दिले होते की शिवसैनिकाला मुख्यमंत्री करतो. पण अमित शहा यांनी वचन मोडले. मागील वेळी खासदार कोण होते? ते आता कुठे आहेत ? त्यांच्या भक्तांचा वापर केला आणि सोडून दिले. प्रमाणपत्र प्रश्न असेल तर अमरावतीचा काय झाले? यांचाही प्रश्न सोडवायचा होता. स्वामीजी आता तुम्हीच यांना श्राप देऊन टाका, असेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. कर्णिक नगर परिसरात झालेल्या सभेला मोठी गर्दी झाली होती.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : सोलापुरी चादर सर्वदूर प्रसिध्द आहे. मोदींच्या प्रतिमेतून विणलेली ही चादर देवून पंतप्रधान मोदी यांचा सत्कार केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते, खासदार महास्वामी, आमदार विजयकुमार देशमुख, ज्योती वाघमारे, शोभा बनशेट्टी आदी.



# 'जय श्रीराम'च्या घोषणांनी दुमदुमले होम मैदान





## २०१९ प्रमाणेच आजही मोदींचे दमदार भाषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

रखरखत्या उन्हात सोलापुरातील होम मैदानावर जमलेल्या लाखोंच्या समुदायाने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत जय श्रीरामच्या घोषणेने तर केलेच पण सातत्याने दुमदुमलेल्या जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता तर अवघे सोलापूर श्रीराममय झाल्याचे चित्र होते. २०१४ आणि २०१९ साली राजकीय हवा पालटवणारे मोदींचे भाषण झाले होते, तसेच भाषण करताना यंदाही मोदींनी महायुतीचा विजय सुकर केल्याची चर्चा रंगली होती.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्या महाविजय संकल्प सभेमध्ये पंतप्रधान मोदी बोलत होते. प्रारंभी सोलापूरी चादर (मोदींच्या प्रतिमेतून विणलेली) देवून विचारपीठावरील मान्यवरांनी पंतप्रधान मोदी यांचा जंगी सत्कार केला. या जाहीर सभेच्या विचारमंचावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गुलाबराव पाटील, लोकसभेचे उमेदवार राम सातपुते, खासदार शिवाचार्य महास्वामी, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. यशवंत माने, माजी आ. नरसिंग मेंगजी, माजी आ. प्रशांत परिचारक, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, शिवसेनेचे नेते शिवाजी सावंत, जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, राष्ट्रवादी नेते आनंद चंदनशिवे, रिपाइंचे राजाभाऊ सरवदे, रोहिणी तडवळकर, नरेंद्र काळे, विक्रम देशमुख, शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे व इतर मान्यवर उपस्थित होते.





पुढे बोलताना मोदी यांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, काँग्रेसने आंबेडकरांची राज्य घटना जम्मू काश्मीरमध्ये लागू होऊ दिली नाही. आम्ही ३७० कलम हटवून ती त्या ठिकाणी लागू केली. देशाच्या इतिहासात पहिल्यांदा एससी, एसटी, ओबीसीचे आमदार आणि खासदार भाजपमधून झाले आहेत. इंडिया आघाडीचे लोक ओबीसी आरक्षणाच्या नावाखाली धूळफेक करीत आहेत. इंडिया आघाडीचे लोक मला रोज शिव्या देतात. त्यांच्याकडे देशाला प्रगतीपथावर घेवून जाण्याचे व्हिजनच नाही. आमच्याकडे ते व्हिजन आहे. काँग्रेसवाल्यांनी एससी एसटी आणि ओबीसी वर्गाची फसवणूक केली आहे, असा आरोपही मोदी यांनी केला. मला एवढी ताकद द्या की, काँग्रेसकडून जे षडयंत्र रचले जात आहे, ते आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. कर्नाटकात अल्पसंख्याकांबाबत आरक्षणाचा जो खेळ खेळण्यात आला आहे. पण आम्ही एससी, एसटी कुटुंबांना समोर ठेवून योजना बनविल्या आहेत. देशातील विविध समाजातील सर्व वर्गासाठी आम्ही या योजना बनविल्या आहेत. देशातील पिछाडीवर असलेल्या वर्गाचा संपत्तीवर पहिला हक्क असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमच्या १० वर्षांच्या काळात २५ कोटींहून अधिक गरीब गरिबीतून बाहेर आले. 'नियत सही होती है, तो नतिजे भी सही मिलते है,' अशा शब्दात काँग्रेसचा त्यांनी समाचार घेतला. आदिवासींसाठी आम्ही विशेष योजना बनवली. विश्वकर्मा योजना आणली नसती. काँग्रेसने सर्वसामान्यांसाठी कल्याणकारी योजना आणल्या नाहीत. या योजनांचा सर्वाधिक लाभ एससी, एसटी आणि ओबीसींना झाला आहे. मोदींची नजर काँग्रेससारखी असती तर आज गावं बदलली नसती, असा दावाही मोदी यांनी केला. मोदी पुढे म्हणाले, खादी ही स्वातंत्र संग्रामाची ओळख आहे. काँग्रेसने खादीला बरबाद केले होते. आम्ही खादी पुनरुज्जीवित केली आहे. पंढरपूरच्या रेल्वे मार्गासाठी शेकडो रुपये खर्च केले आहेत. महामार्गांनी सोलापूर शहर जोडले आहे. सोलापूर शहरातील गोरगरिब कामगारांना हजारो घरे देण्यासाठी आम्हीही पुढाकार घेतला. वंदे भारत ट्रेन आणली, शक्तीपिठांना महामार्ग जोडण्याचे काम चालू आहे. एकंदरीत, आम्ही सामाजिक न्याय देण्यासाठी कायम कटिबध्द राहणार असल्याचा निर्वाळाही त्यांनी शेवटी दिला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकसभा उमेदवार राम सातपुते, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, ज्योती वाघमारे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, रोहिणी तडवळकर, आनंद चंदनशीवे आदींनी आपले विचार मुद्देसूद मांडले.

### फिर एक बार मोदी सरकार

सोमवारी दुपारी मोदी २ वाजून ८ मिनिटांनी विचारमंचावर आले. अवघ्या ४१ मिनिटांच्या भाषणात शहर-जिल्ह्यातील जवळपास २०-२५ मुद्यांवर ते बोलले. नेहमीप्रमाणे मराठीतून भाषणाला सुरूवात करताना त्यांनी सर्वांना अतिशय मनापासून नमस्कार घातला. स्थानिक देवदेवतांना वंदन केले आणि जय श्रीरामाचा जयघोष करीत करीत 'फिर एक बार मोदी सरकार' असा नाराही उपस्थित नागरिकांकडून वदवून घेत भाजपला साथ देण्याचे आवाहनही शेवटी मोदींनी केले.

### इंडिया आघाडीवरही जोरदार टिकास्त्र

इंडिया आघाडीवर भाष्य करताना त्यांनी उध्दव ठाकरे शिवसेनेचा नकली शिवसेना असा उल्लेख केला. तर या इंडिया आघाडीच्या अजेंड्यात निवडणुका झाल्यावर प्रत्येक वर्षाला पंतप्रधान बदलण्याचे धोरण ठरले आहे. केवळ भ्रष्टाचाराची मलाई खाण्यासाठीच हे काम करतील, असेही संकेत त्यांनी यावेळी दिले. इतकेच नाहीतर काँग्रेसच्या ६० वर्षांच्या आणि आम च्या केवळ १० वर्षाच्या कामाची टॅली करुन पाहा. मग आमचा आणि त्यांचा विकासकामांचा आलेख समजून येईल, असेही आवाहन मोदी यांनी केले.

### ही निवडणूक मोदी अन् गांधी यांच्यातच : उपमुख्यमंत्री फडणवीस

सोलापूर लोकसभा निवडणूक ही केवळ आ. राम सातपुते आणि आ. प्रणिती शिंदे यांची नाहीतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहूल गांधी यांच्यात आहे. कोविड महामारी, भ्रष्टाचार संपवून आतंकवाद नष्ट करण्यासाठी सर्जिकल स्ट्राईक केलेल्या मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. यामुळे 'देवभूमी' असलेल्या सोलापूरकरांनी सोन्याचा चमचा तोंडात घेवून जन्मलेल्या उमेदवारापेक्षा ऊसतोड कामगार उमेदवाराला आपले मत द्यावे. कारण त्यांना सामान्य घटकांच्या परिस्थितीची परिपूर्ण जाणीव असल्याचे विचार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले.

# विठ्ठल कारखाना वाचविण्यासाठी वाटेल ती किंमत मोजायला तयार

## राष्ट्रवादी श.प. पक्षाला केव्हा देणार सोडचिठ्ठी याकडे जिल्ह्याचे लक्ष

### चेअरमन अभिजीत पाटील यांची माहिती

### फडणवीसांच्या भेटीत नेमके ठरले काय?

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २९ एप्रिल-**

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सोलापूर येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विठ्ठल कारखान्याच्या अडचणी सांगितल्या. दरम्यान उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यातून मार्ग काढू, असा शब्द दिल्याची माहिती श्री. पाटील यांनी जरी दिली असली तरी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीस आणि पाटील यांच्या भेटीत नेमके काय ठरले, राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षाला पाटील रामराम कधी करणार आणि भाजपाचे कमळ हाती केव्हा घेणार याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले आहे.

दोन दिवसांपूर्वीच शिखर बँकेने विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या गोडाऊनचा ताबा घेऊन गोडाऊनमध्ये असलेली सुमारे एक लाख पोती साखर जप्त केली होती. मागील संचालक मंडळाने शिखर बँकेकडून सुमारे ४३० कोटी रुपये ऐवढे कर्ज घेतलेले आहे. दोन ते अडीच वर्षांपूर्वी विठ्ठल कारखान्याची निवडणूक झाली. यामध्ये तत्कालीन चेअरमन भगीरथ भालके यांना सभासदांनी डावलून कारखान्याची सत्ता अभिजीत पाटील यांच्या ताब्यात दिली होती. त्यानंतर श्री. पाटील यांनी कारखान्याची विस्कटलेली घडी व्यवस्थित बसविण्यास प्रयत्न सुरु केले आहे. सभासद, शेतकऱ्यांचे उसाचे थकीत बिलेदेखील त्यांनी देऊ केली आहे. कारखान्याचे गळीत हंगामदेखील व्यवस्थित पार पाडले. यंदाच्या गळीत हंगामातदेखील विक्रमी उसाचे गाळप करुन सभासदांना मोठा दिलासा दिला.

शिखर बँकेकडून थकीत कर्जप्रकरणी कारखान्याचे चेअरमन व सर्व संचालक मंडळांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. त्या अगोदरच श्री. पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वळचणीला गेलेले होते. त्यामुळे राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारकडून मुद्दाम ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर शिखर बँकेकडून करण्यात आलेल्या कारवाई विरोधात चेअरमन पाटील व कारखान्याच्या अन्य संचालकांनी कोर्टात याचिका दाखल केलेली होती. त्यामुळे शिखर बँकेच्या कारवाईला स्टे आलेला होता. न्यायालयाने स्टे उठविताच शिखर बँकेच्या अधिकाऱ्यांनी पोलिस बंदोबस्तात येथील विठ्ठल कारखाना कार्यस्थळावर येऊन कारखान्याची साखरेच्या पोत्यांनी भरलेली तीनही गोडाऊन सील करुन त्यावर ताबा नोटीस लावलेली होती. त्यावेळी श्री. पाटील हे करमाळा येथे शरद पवार यांच्या समवेत माजी आ. नारायण पाटील यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षात होणाऱ्या प्रवेश कार्यक्रमात सहभागी झालेले होते. कारवाईची माहिती मिळताच ते करमाळा येथून आपल्या विठ्ठल कारखान्यावर आले. लगेचच संध्याकाळी पंढरपुरातील शिवाजी चौकामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्षाचे माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांच्या प्रचारसभेचे पाटील यांनी आयोजन केले होते. या सभेलादेखील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. मात्र सभेत शरद पवार यांनी कारखान्यावरील कारवाईबाबत कोणतेही सुतोवाच केलेले नव्हते.



### सभासदांचा भाजपामध्ये जाण्याचा सल्ला

विठ्ठल कारखान्यावरील संचालक मंडळाच्या बैठकीत भाजपामध्ये गेल्याशिवाय कारखाना वाचणार नाही असे सुतोवाच सर्व संचालकांनी केले होते. त्यामुळे अभिजीत पाटील हे भाजपामध्ये दाखल होणार या चर्चेला उधाण आले होते. त्यामुळे पाटील यांनी आज सोलापूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. विठ्ठल कारखाना वाचवण्यासाठी अभिजीत पाटील वाटेल ती किंमत मोजण्यासाठी तयार आहेत असे फडणवीस यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सोलापूर येथे अभिजीत पाटील यांनी सांगितले. शेतकरी सभासद जगला पाहिजे व सभासदांच्या संसाराशी राजकारण जोडून चालणार नाही अशी अभिजीत पाटील यांनी भावना व्यक्त करुन फडणवीस यांनी लवकरच यातून मार्ग काढू असा शब्द दिल्याची माहिती देखील दिली.





# शहर जिल्ह्यातून मोदींच्या प्रतिमा, भगवे झेंडे घेऊन जत्थेच्या जत्थे सभास्थळी

### मोदींचे मुखवटे घालून कार्यकर्ते सहभागी

### रखरखत्या उन्हातही मोदीप्रेमी कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल**

सोलापूर लोकसभा राखीव मतदार संघातील महायुती अंतर्गत भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ सोलापुरातील होम मैदानावरील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी मोदींचे मुखवटे घालून कार्यकर्ते सहभागी झाले होते. हातात भगवे झेंडे आणि मोदींची प्रतिमा घेऊन जत्थेच्या जत्थे सभास्थळी आले. रखरखत्या उन्हातही मोदी प्रेमी कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उधाण आले होते.

होम मैदानावर पंतप्रधान मोदी यांच्या महासभेची जय्यत तयारी करण्यात आली होती. सुमारे एक लाख कार्यकर्त्यांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली होती. मंडपात सावलीत बसून सर्वांना ही सभा ऐकता आली. या परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची नेटकी व्यवस्था करण्यात आली. भाजयुमोचे पदाधिकारी व कार्यकर्ते हलगी व ढोल ताशाच्या निनादात सभा सभास्थळी येत होते. आमदार विजयकुमार देशमुख यांचे डिजिटल कार्यकर्त्यांच्या हाती झळकल्याचे दिसून आले. भाजपचे पदाधिकारी आपापल्यापरीने शक्ती प्रदर्शन करीत असल्याचे दिसून आले.



**श्रीराम व छत्रपती शिवरायांच्या वेशभूषेत मुलांनी वेधले लक्ष**

श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत मुले सहभागी झाल्याचे दिसून आले. यावेळी कार्यकर्त्यांनी 'जय श्रीराम'चा नारा दिला. घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

## संक्षिप्त वृत्त




### मतदान करा; सह्याद्री संस्थेचे आवाहन

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था आणि आम्ही करदाता आम्ही मतदाते, यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहरासह देशभरात होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतदान करा, असे आवाहन करण्यात आले आहे. मागील दोन टप्प्यातील महाराष्ट्रातील मतदानाची घसरती टक्केवारी चिंताजनक आहे. देशाला दिशा देण्याचे सामर्थ्य महाराष्ट्र राज्यातील जनतेमध्ये आहे. मतदान करणे हा आपला हक्क आहे आणि लोकशाहीतील कर्तव्य ही. मतदारांनी मतदानाचे दिवशी मोठ्या संख्येने मतदान करावे असे जाहीर आवाहन या दोन संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. मत कोणाला द्यायचे हा तुमचा अधिकार आहे. तो तुम्ही बजावला पाहिजे अशी आग्रहाची विनंती या दोन संस्थांच्या वतीने करण्यात येत आहे. यावेळी सह्याद्री सहकारी गृह निर्माण संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पंचमीया, सचिव उदय भाटे, सदस्य गुरुराज जोशी, प्रवीण कुलकर्णी, डॉ. दिलीप दामले आणि श्रीनिवास वैद्य आदी उपस्थित होते.



### सहकार भारतीच्या पापड महोत्सवाचे उद्घाटन

**सांगली, दि.२९ एप्रिल-**

सहकार भारती सांगली महानगर शाखेतर्फे आयोजित पापड महोत्सवाचे उद्घाटन सहकार भारतीच्या राष्ट्रीय महिला सहकारी संस्था प्रकोष्ट प्रमुख वैशाली स्वप्निल आवाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी सहकार भारतीचे प्रदेश संघटन प्रमुख संजय परमणे, महानगर अध्यक्ष शशिकांत राजोबा, महानगर उपाध्यक्ष एन.जे पाटील, शैलेश पवार, उत्कर्षा लाडे, संपदा आरवाडे, स्वाती सावळवाडे, संदीप कुलकर्णी, बाळासाहेब खुडे,अण्णासाहेब पाटील, श्रुती जोशी आदी उपस्थित होते.

### पाणी अंगावर उडाल्याने युवकास बेदम मारहाण

**सोलापूर, दि. २९ एप्रिल**

सायकलचे चाक खड्ड्यातून गेल्यानंतर पाणी अंगावर उडाल्याने तिघांनी युवकास बेदम मारहाण केली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात यश विजयकुमार घोडके (वय १९, रा. न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल रेड्डी व त्याच्या दोन साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ एप्रिल रोजी सायंकाळी यश घोडके हा दोन नंबर एस टी स्टॅन्डजवळ सायकलीवरून कुमठा नाका येथील क्रिडा संकुल येथे जात होता. त्यावेळी सायकलचे चाक खड्ड्यातून गेल्याने खड्ड्यातील पाणी राहुल रेड्डी याच्या अंगावर उडाले. त्यामुळे चिडीने राहुल रेड्डी व त्याच्या दोन साथीदारांनी यश घोडके यास दोरीने व लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले व ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### चारचाकीच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ एप्रिल**

चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली.भगवान केरप्पा वाघमारे (वय ५४, रा. वाघोली, ता. मोहोळ) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. सोमवारी सकाळी भगवान वाघमारे हे त्यांच्या दुचाकीवरून वाघोली ते कामती जाणाऱ्या रोडने जात असताना एमएच ०४ जेएम ०२२५ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने वाघमारे यांच्या दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये वाघमारे हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सात अनधिकृत वेंडरला अटक; आयकार्ड कार्ड नसल्यामुळे दंड

## सोलापूर रेल्वे स्थानकावर विशेष निरीक्षणात कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर रेल्वे स्थानकावर वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील आणि विभागीय सुरक्षा आयुक्त आदित्य आणि सहायक वाणिज्य व्यवस्थापक कल्पना बनसोडे आणि सुदर्शन देशपांडे यांनी संयुक्तरित्या, सोलापूर रेल्वे स्थानकावर विशेष तपासणी केली.



सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म नं. १ ते ५ वरील अनाधिकृत वेंडरवर कारवाई केली. त्यामध्ये सात अनधिकृत वेंडरला अटक करण्यात आली. रेल्वे स्थानकवावरील सर्व कॅटरिंग स्टॉलची कसून तपासणी करण्यात आली. त्यात तीन वेंडरचे आय.डी कार्ड नसल्यामुळे त्यांच्या कडून दंड वसूल करण्यात आला.

अनधिकृत वेंडर स्थानक प्रवेश करतात त्या जागेची अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. सर्व कॅटरिंग स्टॉल आणि जन आहारच्या फूडची गुणवत्तेची विशेष तपासणी करण्यात आली. सर्व खानपानाचे स्टॉल, ट्रेन मधील स्वच्छतेचे निरीक्षण करण्यात आले आहे. पार्किंग क्षेत्राचीही पाहणी करण्यात आली. अधिकाऱ्यांनकडून अधिकृत वेंडर आणि सर्व खानपानाचे स्टॉलचे कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड आणि अधिकृत आय डी कार्ड घालूनच फूडची विक्री करावी, अशी सूचना देण्यात आली.

### विनातिकिट प्रवाशांवर २२ हजारांचा दंड वसूल

१२ मेल एक्सप्रेस ट्रेनची विशेष तपासणी करण्यात आली त्यात ४८ विना तिकिट प्रवाशांवर कारवाई करून २१,७०० रुपयाचे दंड वसूल करण्यात आले. सामान्य डब्या जवळ प्रवाशांसाठी मोफत पिण्याच्या पाण्याचे स्टॉल लावण्यात आले. सर्व प्रवासी क्राउड मॅनेजमेंट ची शुद्धता पाहणी करण्यात आली. हया विशेष तपासणीत वाणिज्य विभागाचे २१ कर्मचारी होते. त्यात मुख्य वाणिज्य निरीक्षक जी. जी. कांबळे, उमाशंकर पांडा आणि अतुल लोहोकरे आणि १५ रेल्वे सुरक्षा बल रेल्वे सुरक्षा बालाचे निरीक्षक सतीश विधाते यांचा सहभाग होता. रेल्वे प्रशासनाकडून आवाहन करण्यात येते की, तिकीट काढूनच रेल्वेचा प्रवास करावा. रेल्वे लायसन्सी अधिकृत वेंडरकडूनच फूड आणि बाटलीबंद पिण्याचे पाणी खरेदी करावे.



## विज्ञान प्रदर्शनात श्रीदत्त प्रशालेच्या उपकरणाची राष्ट्रीय स्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

रविकिरण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री दत्तप्रशाला ज्युनियर कॉलेज श्रीशैल नगर सोलापूर येथील इयत्ता दहावी शिकणाऱ्या भंडारी याने तयार केलेल्या बेस्ट मल्टी क्लीनर या उपकरणास कराड येथे विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकारच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय प्रदर्शनात वरील विद्यार्थ्यांच्या उपकरणाची राष्ट्रीय पातळीवर निवड करण्यात आली आहे. त्यास तसे प्रमाणपत्र समारोप प्रसंगी देण्यात आले. भंडारीची उपकरणाची विज्ञान प्रदर्शनामध्ये राज्यस्तरावर निवड झाली होती. या उपकरणासाठी मार्गदर्शक म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद सुरवसे व विज्ञान शिक्षिका सुवर्णा जाधव यांनी मार्गदर्शन केले या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष नागनाथ सुरवसे, सचिव संजीवनी पडवळकर सदस्य सागर सुरवसे, चैताली जुगदार, सारिकाताई सुरवसे व खजिनदार सौथ दिपाली शिंदे, दत्तप्रशालेचे मुख्याध्यापक सातलिंग षटकार यांच्यासह संस्थेत कार्यरत असलेले सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

### कुमठा नाका येथून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

शहरातील कुमठा नाका येथील कॅन्टीनजवळून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत महंमद शरीफ ईस्माईल शेख (वय ५८, रा. सिध्देश्वर नगर भाग २, रिगल हॉटेलसमोर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख यांनी त्यांची एमएच १३ एई ५७२८ क्रमांकाची दुचाकी ही २४ एप्रिल रोजी कुमठा नाकाजवळ असलेल्या कॅन्टीनजवळ पार्क केली होती.

## सरकार घालण्यासाठी माकपचा इंडिया आघाडीला पाठिंबा

### प्रणिती शिंदे यांना दिल्लीत पाठवण्याचा केला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची रणधुमाळी आता रंगात आली आहे. या मतदारसंघात दिवसेंदिवस इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांची ताकद वाढताना दिसून येत आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने यापूर्वीच शिंदे यांच्या पाठीशी आपली ताकद उभी केली आहे. आता भारतीय कम्युनिस्ट पार्टीने देखील आपला पाठिंबा जाहीर केला आहे. देशातील धर्मांध शक्तीला पराभूत करण्यासाठी माकपने इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देवून



मतदान करण्याची भूमिका शनिवारी स्पष्ट केली.

सोलापूर शहर काँग्रेस कमिटी सोबत चर्चा करून इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रणिती यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी भाकप कार्यकारणी सदस्य तानाजी ठोंबरे, जिल्हा सेक्रेटरी डॉ. प्रवीण मस्तुद, शहर सेक्रेटरी अंबादास तडकापल्ली, कॉ. मधुकर मडुर, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, आयटकचे अनिरुद्ध नकाते, जिल्हा कौन्सिल सदस्य नरसय्या कंदुल, तिरुपती परकीपंडला, शेखर बीनगुंडी, श्रीनिवास वड्डेपल्ली, सोमनाथ आडम, विक्रम तडकापल्ली उपस्थित होते.

### प्रणिती शिंदे यांचे बळ वाढले

महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. सुरुवातीला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने प्रणिती यांना आपला जाहीर पाठिंबा दिला. त्यानंतर संविधान बचावाच्या या लढ्याचा आपण उमेदवार देणार नसल्याचे एम आयएमकडून स्पष्ट करण्यात आले. तर दुसरीकडे वंचितचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी देखील संविधानाच्या लढ्यासाठी आपला उमेदवारी अर्ज माघार घेत असल्याचे स्पष्ट करत निवडणूक रिंगणातून माघार घेतली. तसेच आम आदमी पार्टी, समाजवादी पक्ष हे देखील इंडिया आघाडी सोबत आहेत. त्यामुळे प्रणिती यांचे बळ अधिक वाढले होते.

### मंगळवार पेठेत तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २९ एप्रिल**

मित्राला लघूशंका करण्यासाठी दुसरीकडे पाठविल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रथमेश महादेव गवळी (वय ३४, रा. पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सनि जवळे (रा. शुक्रवार पेठ, कालिका मंदीर बोळात) व त्याचे तीन साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास मंगळवार पेठेत गवळी यांच्या घरासमोरील बाजूस एक व्यक्ती मंडळाच्या बोर्डाजवळ लघवी करण्यासाठी थांबला असताना त्यास लघवी करू नको जवळच मुतारी आहे तेथे जा असे गवळी यांनी सांगितले. त्यानंतर काही वेळाने सनि जवळे याने गवळी यांना हाक मारून घराबाहेर बोलावून घेऊन तु काय गल्लीचा दादा आहे का, म्हणून गवळी यांना शिवीगाळ करून लाथाबुक्कयाने व दगडाने मारहाण करून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विद्याभारतीच्या वतीने प्रांतस्तरीय आचार्य प्रशिक्षण वर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**नांदेड, दि. २९ एप्रिल-**

विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थानच्या वतीने दि.२ मे ते १२ मे दरम्यान नांदेड येथे देवगिरी प्रांताचा आचार्य प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे.

या दहा दिवसीय प्रशिक्षण वर्गादरम्यान दहा दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण आणि वैदिक गणित, संस्कृती ज्ञान परीक्षा, विमर्श या विषयांचे प्रत्येकी दोन दिवसीय मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्यातील आठ आणि खानदेशातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव अशा ११ जिल्ह्यातील शिक्षक या प्रशिक्षण वर्गात सहभागी होणार आहेत. विष्णुपुरी नांदेड येथील इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, सहयोग कॅम्पस येथे हे प्रशिक्षण वर्ग होणार आहेत. बालकांच्या समग्र विकासात जीवनाचा घनिष्ठ अनुभव, संस्कार, चरित्र निर्माण, क्षमतांचा विकास घडवून आणण्यासाठी शिक्षकांना (आचार्य) प्रशिक्षित करण्यासाठी विद्याभारती गेल्या २२ वर्षांपासून अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करते. शिक्षक, प्राधानाचार्य, पालक व शिक्षण प्रक्रियेतील सर्व महत्वाच्या घटकांसाठी या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले असून निवास व भोजनव्यवस्थेसह पूर्णवेळ स्वरुपाचे हे वर्ग आहेत.

गणित विषय अधिकाधिक सोपा करून शिकविण्यासाठी विद्याभारतीने वर्गशः वैदिक गणिताचा अभ्यासक्रम तयार केला आहे. यातून गणिताचे उत्तर सोप्या पद्धीने काढण्याच्या क्लृप्त्या गणित शिक्षकाचा उत्साह नक्कीच वाढवतील. संस्कृती ज्ञान परीक्षा दरवर्षी विद्याभारती देवगिरी प्रांतातर्फे घेतली जाते. या प्रशिक्षण वर्गाच्या व्यवस्थेची बैठक नुकतीच नांदेड येथे प्रांत सहमंत्री दिनेश देशपांडे यांच्या उपस्थितीत पार पडली. विद्याभारतीच्या श्रीमती वनमाला कुलकर्णी (प्रांत शिशु वाटिका प्रमुख), विजय (बाळूकाका) जोशी, रमेश मस्के, देवदत्त देशपांडे, सौ. कल्पना ना. कांबळे, आदित्य तुगनवार आदि या वर्गाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

## अंध बांधवांना मोफत प्रवेश; एनएबी निवासी शाळेचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल -**

गेल्या ३५ वर्षापासून अंध प्रौढांना शिक्षण देवून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी कार्यरत असलेल्या नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड जिल्हा शाखा संचलित एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळा ही सन १९८९ मध्ये स्थापन झाली. या कार्यशाळेस सन शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५साठी मोफत प्रवेश देण्यात येत आहे. या कार्यशाळेत सोलापूर शहर व जिल्ह्यातील १८ ते ४५ वर्षापर्यंत अंध प्रौढ बांधवांना प्रवेश देण्यात येत आहे.

इच्छुक पालकांनी आपल्या प्रौढ अंध पाल्यास मोफत प्रवेशासाठी नॅब संचलित एन. ए. बी. निवासी अंधकार्यशाळा सिटी सर्व्हे नं. १०४२७, अंतिम भूखंड २८ अ, स्वातंत्र्य सैनिक नगर जवळ, कर्णिक नगर, सोलापूर येथे अंधकार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी (मो. नं. ९९६०७०७३९३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी केले आहे.

या कार्यशाळेत प्रौढ अंध मुले निवासी पद्धतीने शिक्षण घेतात. प्रौढ अंधांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांना विविध प्रशिक्षण या कार्यशाळेत दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने खडू, फाईल्स, मेणबत्ती इ. वस्तू तयार करणे तसेच केनिंग, बुकबायडींग करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. यासाठी संस्थेकडे अद्यावत असे खडू बनविण्याचे साचे, फाईल मेकिंग मशीन, मेणबत्ती बनविण्याचे साचे उपलब्ध आहेत. अंध प्रशिक्षणार्थीना संगणकाचे ज्ञान देण्यासाठी कार्यशाळेमध्ये बोलका संगणकदेखील उपलब्ध करुण देण्यात आले आहे तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास उद्योजकता विभाग मुंबई या कार्यालयाकडून शासन मान्य सी. सी. इन कॉम्प्यूटर बेसिक व ॲक्यूप्रेशर व मसाज थेरेपी इ. प्रकारचे प्रशि, क्षण या कार्यशाळेत दिली जाते तसेच स्वलेखन प्रशिक्षण, स्पर्धा परिक्षा व रोजगार व स्वयंरोजगार या विषयी मार्गदर्शन, आरोग्य तपासणी, क्षेत्रभेटीचे नियोजन असे विविध उपक्रम व खेळाच्या स्पर्धेचे आयोजन अंधकार्यशाळेमार्फत केले जाते. अंध प्रौढ विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची वेद्यकीय, युनिफॉर्म व इतर सर्व सुविधा संस्थेमार्फत मोफत दिले जाते.

## बीजारोपण कार्यानुभव शिबिर उत्साहात

### परसबाग, गांधी नाथा रंगजी विद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

संस्कारातून पर्यावरणाचे संवर्धन या संकल्पनेतंर्गत परसबाग सोलापूर या पर्यावरणीय व्यासपीठ आणि गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठीचे तीन दिवसीय बीजारोपण कार्यानुभव शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले.



परसबाग सोलापूरचे संस्थापक नारायण पाटील व शुभदा पाटील आणि गांधी नाथा रंगजी विद्यालयाचे संस्थाध्यक्ष संजीव गांधी यांनी संयुक्तपणे या शिबीराचे आयोजन केले होते. परसबाग सोलापूरचे बीजारोपण उपक्रम प्रमुख योगेश जक्कल यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. प्रारंभी त्यांनी बीज आणि वृक्ष परिचय करुन देऊन औषधी आणि पर्यावरणीय स्थान समजाऊन सांगितले. देशी वृक्षच का लावावेत याबद्दल मार्गदर्शन केले. सोलापूरच्या पर्यावरण संवर्धनामध्ये देशी वृक्षांचा महत्वपूर्ण सहभाग असल्याचे सांगितले. श्री.गांधी यांनी या उपक्रमाला पाठबळ देत अशा रचनात्मक पर्यावरणीय उपक्रमांची व्याप्ती वाढवणार असल्याचे सांगितले. अभिषेक गांधी, मुख्याध्यापक संजीव संसारे, मुख्याध्यापिका ज्योती दुर्गे, अमोल कांबळे, ज्योती हेलकर, विद्या चव्हाण, सजदा जोसेफ, मेहरुन शेख, कविता पात्रे, विद्या चव्हाण, मीरा गायकवाड आदींनी शिबीर यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

### बीजारोपण कार्यानुभव शिबिरेची वैशिष्ट्ये ...

- दुर्मिळ देशी वृक्ष प्रजातीच्या बीजाचे ५०० पिशव्यामध्ये रोपण.
- २०० विद्यार्थी,२५ शिक्षक-कर्मचा-यांसह भावी डॉक्टरांचाही सहभाग.
- शालेय विद्यार्थ्यांना बीजारोपणाचा थेट कार्यानुभव देणारा सोलापूरातील पहिलाच उपक्रम.
- सीता अशोक, रिठा, गोड सांबार चिंच, चिलारी, कांचन,छत्री बाभुळ,बकुळ वगैरे फक्त देशी प्रजातीच्या वृक्षांच्या बियांचे रोपण
- रोपांची वाढ रोपण योग्य झाल्यावर पालकत्व पध्दतीने या रोपांचे शहरामध्ये पुनर्रोपण करणार

### कोट्यवधी वृक्षारोपणे झाली परंतु ही झाडे कुठे गेली?

गेल्या ५० वर्षांमध्ये सोलापूर शहरामध्ये कोट्यवधी वृक्षारोपणे झाली परंतु ही झाडे कुठे गेली? असा प्रतिप्रश्न नारायण पाटील यांनी याप्रसंगी बोलताना केला. आपण पर्यावरणीय संस्कारक्षम अशी एक तरी पिढी घडवल्या शिवाय सोलापूरच्या पर्यावरणात उचित असे बदल घडणार नाहीत. त्यामुळे असे संस्कारक्षम आणि दिशादर्शक उपक्रम राबवणे ही सोलापूरसाठी काळाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. हे कार्यानुभव शिबीर हा त्याच्याच रचनात्मक प्रारंभाचा एक भाग आहे असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या झाडाचा वाढदिवस या उपक्रमाची संकल्पना व गरज श्री.पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.




## पतसंस्थाच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटन आवश्यक

### दिलीप पतंगे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ३२ सहकारी पतसंस्थांकडून वसूल न झालेल्या ३ कोटी ९४ लाख रुपयांची कर्ज फेडरेशनच्या पुढाकारातून वसूल झाली. न्यायप्रविष्ट बाबीतून तसेच कायदेशीर बाबी आणि कर्जदाराची मानसिकता यातून मार्ग काढत कर्जदारांना काही सवलती देऊन या रकमांची वसूली झाली आहे. त्यामुळे पतसंस्थापुढील समस्या सोडवायच्या असतील तर संघटन आवश्यक असून त्यासाठी सोलापुर जिल्ह्यातील सर्व पतसंस्थांनी फेडरेशनचे सभासदत्व स्वीकारण्याचे आवाहन पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी केले.

सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन पंचवटी पतसंस्थेच्या ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन प्रसंगी ते बोलत होते. सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित ही जिल्ह्यातील सर्व नागरी, ग्रामीण बिगरशेती, सेवक व पगारदार तसेच महिला सहकारी पतसंस्थांची फेडरल संस्था म्हणून कार्यरत आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पतसंस्थांची संख्या सुमारे १ हजार आहे. पतसंस्थांचे सभासद, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, वसूली अधिकारी, पिग्मी एजंट, लेखा परीक्षक यांना त्या त्या विषयांवर प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविणे, वेळोवेळी चर्चासत्रे, सभा संमेलने, सहकार मेळाचे आयोजित करून तज्ञामार्फत मार्गदर्शन देणे आदी ध्येय-धोरणाच्या पूर्तीसाठी फेडरेशनचे कामकाज चालू असल्याचेही पतंगे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी- ७५८

**तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार ।**
**तेव्हां आप पर बोळविले ।।**

पंचतत्वातून निर्माण झालेला हा मानवी देह एके दिवशी पंचतत्वात विलिन होणारच आहे. अर्थात, निर्माण झालेला हा देह एके दिवशी नाश पावणारच आहे. हे सत्य असले तरी या नाशवंत देहाबद्दल माणूस अकारण अहंकार बाळगतो. आपण कोण आहोत? याची खरी जाणीव न झाल्याने माणूस या देहालाच मी समजून बसतो. हे खोटारडे मीपण अहंकाराला जन्म देते. जेथे अहंकार आहे तेथे ईर्षा, अहंकार, द्वेष, मत्सर, मोह, लोभ सर्व कांही असतात. अहंकाराची निर्मिती द्वैताला जन्म देते. जेथे द्वैत आहे, तेथे आप-पर आपोआप जन्म घेतात. आप-पर हा भेद मानवाला स्वत:पासून व इतरांपासून दूर नेत असतो. जोपर्यंत माणूस या नाशवंत देहाचा अहंकार बाळगतो, तोपर्यंत तो खऱ्या अर्थाने सुखी राहात नाही. मीपणामुळे निर्माण झालेला हा अहंकार सहजा-सहजी नष्ट होत नाही. समाजात असे अनेक लोक पाहायला मिळतात की, जे मरेपर्यंत अहंकार सोडत नाहीत. मी म्हणेल तेच खरे असे म्हणणाऱ्यांची संख्या कमी नाही. अहंकार हा एक प्रकारचा महाभयंकर रोग आहे. हा रोग अहंकारी व्यक्तीला एके दिवशी नष्ट करतोच. पण त्याच्या अगोदर अनेकांच्या जीवनात अडचणी निर्माण करतो. या रोगावर रामबाण औषध म्हणजे संतांचा सहवास होय. मी म्हणजे मूळात कांही नाही, याचा परिचय माणसाला होत नाही. त्याचबरोबर मीमुळे मानवाला वरकरणी अघोरी आनंद प्राप्त होतो. म्हणून माणूस मी चा खरा शोध घेण्याचा प्रयत्न करीत नाही. जोपर्यंत मानवाला मीचा खरा परिचय होत नाही. तोपर्यंत त्याच्याकडे द्वैत भाव शिल्लक राहातो. म्हणजेच जेव्हा अहंकार जातो, तेव्हा आप-पर या भेदाची आपोआप बोळवण होते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे जेव्हा गेला अहंकार ।**
**तेव्हां आप पर बोळविले ।।**

हा देह नाशवंत असून त्याला एके दिवशी काळ गिळंकृत करणारच आहे. असे संतांनी सांगुनसुध्दा माणूस या संतोक्तीवर गांभीर्याने विचार करीत नाही. असा एकही मानव नसावा की ज्याने मृत्यू पाहिला नाही. मृत्यू पाहूनही माणूस या नाशवंत देहाला अमर समजून अहंकाराने वागत असतो. हे एक फार मोठे आश्चर्य आहे. मी, माझा, माझी यांपैकी कालांतराने का होईना काळ कांहीच शिल्लक ठेवत नाही. हे सत्य असतांनाही मानव आयुष्यभर आप-पर हा भेद करीतच राहातो. जन्म दिलेली ती मुलगी आणि घरात नांदायला आलेली ती सून हा भेद माणूस सोडतच नाही. असे अनेक प्रकारचे भेद माणूस आयुष्यभर करीत राहतो. या भेदामुळे तो खऱ्या सुखापासून आणि स्वत:च्या परिचयापासून दुरावला जातो. मानव हा बुध्दीवादी प्राणी आहे. बुध्दी असूनही तो केव्हा-केव्हा हिंस्र पशूपेक्षा क्रूर वागून जातो. त्याचे प्रमुख कारण म्हणजे अहंकार होय. सर्व वाईट गोष्टीला अहंकारच जर कारणीभूत आहे, तर मग या अहंकाराला बाळगायचेच का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा माणूस प्रयत्न का करीत नाही? हा प्रश्नावर पडलेला प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या प्रश्नांच्या उत्तरापर्यंत नेऊन पोहचविण्याचे व योग्य ते उत्तर गळी उतरविण्याचे कार्य संत महात्म्यांनी केले आहे. माऊलींची ज्ञानेश्वरी, तुकोब्बारायांची, शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांची, नामदेवांची गाथा, समर्थांचा दासबोध, सेनाजींची अभंगवाणी आदी अहंकार नष्ट करण्याचे अत्यंत साधे-सरळ मार्ग आहेत. म्हणून आपण या ग्रंथाचे वाचन करुन आचरण करण्याचा प्रयत्न करु या.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती |
| दि. ३० एप्रिल २०२४ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०, | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| मास - चैत्र | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. षष्ठी (०७.०५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र- उत्तराषाढा (२८.०८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - साध्य (२२.२३) | |
| करण - विष्टि (१८.२८) | |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा. सकारात्मक विचार कराल.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# भाजी मंडईचा रहदारी, व्यापाऱ्यांना अडथळा

### कट्टे नसल्याने रस्त्यावरच बैठक व्यवस्था

### कृष्णाचा हौद परिसरातील मंडईच्या स्थलांतराची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ एप्रिल-**

शहरातील कृष्णाचा हौद परिसरातील भाजीमंडईचे स्वरुप दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ही मंडई बाजारपेठेतील रहदारीच्या दृष्टीने महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रस्त्यांवर देखील भरु लागल्याचे दिसत आहे. या रस्त्यावरील मंडई मुळे ग्राहकांची, विक्रेत्यांची तसेच या भागातील कायमस्वरुपी दुकानदारांची देखील मोठी गैरसोय होवू लागलेली आहे. त्यामुळे या मंडईचे स्थलांतर पालिकेने शहरातील अन्यत्र ठिकाणी करावे अशी मागणी शहरातील सुज्ञ नागरिकांकडून केली जात आहे.



पंढरपूर शहरात इंदिरागांधी भाजी मंडई व कृष्णाच्या हौदापाशी भरणारी भाजी मंडई या नागरिकांच्या दृष्टीने सोयीच्या समजल्या जात होत्या. मात्र कृष्णाच्या हौदाच्या परिसरातील मंडईचे दिवसेंदिवस स्वरुप चाललेले दिसत आहे. येथील मंडईचा परिसर हा शहरातील बाजारपेठेचा परिसर म्हणून देखील ओळखला जात असतो. या मंडई मध्ये ग्रामीण भागातून आलेल्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मंडईसाठीची जागा सध्या अपुरी पडू लागलेली आहे. त्यामुळे भाजीविक्रेते अगदी बोहरी पेट्रोलपंपा पर्यंत भाजी विक्रेते बसू लागल्याचे दिसत आहे.

या मंडईमध्ये कुठेही भाजी विक्रेत्यासाठी दगडी कट्टे बांधण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रस्त्यावरच बसून भाजी विक्री करावी लागत आहे. परिणामी रस्त्यावरील धुळ अक्षरश: भाजीवर बसत असते. त्याच प्रमाणे पावसाळ्यामध्ये थोडा जरी पाऊस झाला तरी चिखलात बसुन विक्रेत्यांना भाजी विक्री करावी लागते. त्यामुळे विक्रीसाठीचा भाजीपाला देखील खराब होत असतो. या बरोबरच या भागात ज्या कायमस्वरुपी दुकानदारांची मोठी दुकाने आहेत त्यांच्या दुकाना समोरच हे भाजी विक्रेते बसत असल्यामुळे कायमस्वरुपी दुकानदार मंडळींना देखील अडचणीचे होते. त्यामुळे व्यापारी आणि भाजीविक्रेते यांच्या मध्ये दररोज तु तु मै मै च्या घटना घडताना दिसेन येतात.

बाजारपेठेचा भाग असल्यामुळे विविध सण आणि उत्सवाच्या दिवशी तर येथील भाजी मंडई मध्ये खरेदीदार तसेच विक्रेत्यांची तोबा गर्दी असते. गर्दीमुळे अनेक वेळा येथील मंडईत चोरट्यांकडून ग्राहकांचे मोबाईल, पैसे,पाकिटे चोरीच्या अनेक घटना घडतात. शहरातील जुन्या एसटी स्टँण्ड समोरील पार्किंगसाठी आरक्षीत असलेली जागा, भक्ती मार्गावरील खादी ग्रामोद्योगाची जागा, जिजामाता उद्यानाची पिछाडी, टिळकस्मारक मंदिराच्या मैदानाची जागा तसेच चंद्रभागा बसस्थानकाच्या बाजुची मोकळ्या जागेवर,महावीर नगर पाण्याच्या टाकीपरिसरातील खुली जाग आदीं ठिकाणी कृष्णाचा हौद परिसरातील मंडईचे स्थलांतर करता येऊ शकेल का या बाबतदेखील पालिकेने विचार करावा, अशी मागणी होत आहे.

### भाजी मंडईमुळे वाहतुकीची कोंडी

कृष्णाचा हौद परिसर हा संपुर्ण मुख्य बाजारपेठेचा महत्वाचा समजला जाणारा परिसर आहे. त्यामुळे भाजी विक्रेते,फळविक्रेत्यांचे हातगाडे रस्त्यावरच ठाण मांडुन उभे असल्यामुळे दररोज या ठिकाणच्या शिवाजी महाराज चौक ते अर्बन बँक, अर्बन बँक ते कर्नल भोसलेचौक, भादुलेचौक ते बोहरी पेट्रोलपंप, प्रिन्स गांधी दुकान समोरील रस्ता अशा वाहतूकीच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांवर वाहतूकीची कोंडी होण्याचे प्रकार सातत्याने घडताना दिसतात.

### दुकानदारांचा नेहमीच विरोध

कृष्णाचा हौद परिसरातील भाजी मंडईचे ठिकाण पालिकेने बदलुन दुसऱ्या पर्यायी जागेवर ती भरविण्याची व्यवस्था करावी अशी मागणी त्या भागातील कायम स्वरुपी असलेल्या दुकानदार मंडळींकडून सातत्याने पालिकेकडे केली जात आहे.

# निवडणुकीमुळे रोहयोवरील मजुरांच्या संख्येत घट

### साडेचार हजार मजूर येईना कामावर

### निवडणुकीचे पर्यायी काम मिळाल्याने मालामाल

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यात लोकसभा निवडणूक प्रचारासाठी एका मजुराला ५०० रुपये मजुरी मिळत आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावर भर उन्हात काम करूनही मजुरांना फक्त २९० रू मिळत आहेत. त्यापेक्षा निवडणुकीत जास्त मजुरी त्यांना मिळत आहे. यामुळे रोजगार हमी योजना कामावर ४ हजार ४१० मजूर कमी झाल्याचे चित्र समोर आले आहे.



अक्कलकोट तालुक्यात मार्च महिन्यात ८,१९० मजूर रोजगर हमी योजना कामावर होते. २४ एप्रिलपर्यंत ही संख्या ३ हजार ७८० वर आली. यामुळे एप्रिल महिन्यात ४ हजार ४१० मजूर कमी झाल्याचे चित्र समोर आले आहे. आता निवडणूक सुरु असल्याने राजकीय पुढारी निवडणुकीतील कामांसाठी ५०० रुपये मजुरी देत आहेत. पण हेच नेते सत्तेवर आल्यावर रोजगार हमी योजनेवरील मजुरांना दिवसाकाठी फक्त २९० रू. मजूर ठरवितात हे किती विदारक चित्र आहे.

लोकसभा निवडणुकीत दररोज सर्वच पक्षांच्या उमेदवारांच्या गावोगावी सभा होत आहेत. उमेदवारी अर्ज माघारीनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. आता खऱ्या अर्थाने प्रचाराने वेग घेतला असून मोठमोठ्या नेत्यांच्या सभादेखील होत आहेत. या सभांना गर्दी जमविण्याचे नियोजन राजकीय पक्षाकडून सुरू आहे. दुसरीकडे आपल्या पक्षाचा जाहीरनामा घरोघरी पोहच करणे, केलेली कामे प्रत्येकाला सांगणे, गावागावात पोस्टर चिकटवणे अशी कामे सध्या युद्धपातळीवर सुरू आहेत. त्यामुळे प्रत्येक गावातील अनेक तरुणांना, बेरोजगारांच्या हाताला काम मिळू लागले आहे. एका महिन्यात अक्कलकोट तालुक्यातील रोहयोच्या कामांवर ४,४१० मजूर कमी झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### ही करावी लागतात कामे

उमेदवारांची सभा असेल तेव्हा त्याठिकाणी गर्दी दिसावी म्हणून आवर्जून उपस्थित राहणे, वरिष्ठ नेत्यांच्या सभांना तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी हजर राहणे, यासाठी दिवसाला अंदाजे ५०० रुपये मजूर मिळतात अशी चर्चा आहे. दुसरीकडे रोहयोच्या कामांवरील मजुरांना भर उन्हात काम करूनही दिवसाकाठी अवघी २९७ रुपयांची मजुरी मिळते.



# तीर्थच्या श्री रामलिंगेश्वर यात्रेला भक्तिभावात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

श्री क्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रेला सोमवारी भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. पालखीची मिरवणूक, नंदीध्वज मिरवणूक अतिशय उत्साहात झाली.

दंडवत घालणे, गूळ, खोबरे प्रसाद वाटप करणे, सायंकाळी पाच वाजता महाप्रसाद सेवा भाविक लक्ष्मण सिद्धप्पा रोडगे यांनी श्री चरणी अर्पण केली. रात्री कन्नड बैलाट झाले. देवस्थान पंच कमिटीचे पंच अहमद मुल्ला, विश्वनाथ पावले, सिद्धाराम उदंडे, प्रभूलिंग शेळगे, करबसप्पा पाटील यांनी नियोजन सुरेखपणे केले आहे. पालखी मिरवणुकीत प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, रामलिंग चितले, भीमाशंकर रोडगे, श्रीशैल चितले, डॉ. सुभाष गुरव, विठ्ठल कोरे, सुभाष फताटे, रेवप्पा कोरे, संगप्पा उदंडे, परमेश्वर पाटील, कल्याणी मेंथे, राजेंद्र जाधव, शांतप्पा चितले, सुनील कलशेट्टी, महादेव घोंगडे, सिध्दाराम बिराजदार सहभागी झाले होते.

# अमोलराजे भोसलेंच्या वाढदिनी सेवेकऱ्यांच्या मुलांना सायकल भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांचा वाढदिवस कोणताही डामडौल न करता अन्नछत्र मंडळात साधेपणाने साजरा करण्यात आला. यावेळी सेवेकऱ्यांच्या मुलांना सायकल भेट देण्यात आले.



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास हे उत्तमरित्या सुरु आहे. अन्नदान सेवेचा लाभ देश- परदेशातून येणारे स्वामीभक्त नित्य घेत आहेत. गुरूपौर्णिमेला महारक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू लोकांना मदत केली जात आहे. याबरोबरच अमोलराजे भोसले यांच्याबरोबर हजारो युवावर्ग एकत्रित येऊन श्री क्षेत्र अक्कलकोट येथे जुना राजवाडा परिसरात शिवजन्मोत्सोव सोहळ्याबरोबर अन्य उपक्रमही ते राबवतात.

# अक्कलकोटमध्ये महाविकास आघाडी, महायुतीकडून होम टू होम प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर लोकसभा निवडणुकीतील प्रचाराचा जोर वाढला असून आता महाविकास आघाडी व महायुतीकडून अक्कलकोट शहरात होम टू होम प्रचार सुरू आहे.



आ. प्रणिती शिंदे व महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्यात लढत होत आहे. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या उपस्थितीमध्ये होम टू होम प्रचार सुरू केला आहे. घरोघरी जाऊन मतदारांना काँग्रेस-महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे करत आहेत. भाजपा महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारासाठी भाजपा महायुतीचे नेते मंडळी हे होम टू होम प्रचारावर भर देत आहेत. प्रत्यक्ष मतदारांना भेटून भाजपा महायुतीस मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागात भाजपा महायुतीचे नेते प्रचार करत आहेत.

# आक्रमक प्रहार शांत... भूमिका अद्याप गुलदस्त्यात...

### राज्यातील सत्तेला पाठिंबा

### लोकसभा निवडणुकीत हालचाल दिसेना, युवक जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सामाजिक विषयावर आक्रमक होत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नेहमीच अग्रेसर असलेली प्रहार संघटना लोकसभा निवडणुकीत अद्याप शांत असून, भूमिकाही गुलदस्त्यातच आहे. राज्याच्या सत्तेला पाठिंबा देणारे प्रहारचे प्रमुख बच्चू कडू अद्याप कार्यकर्त्यांना आदेश न दिल्याने प्रहारचे पदाधिकारी प्रचारापासून दोन हात लांब आहेत. आता युवक जिल्हाध्यक्ष काय भूमिका घेतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

राजकीय अस्तित्व, सामाजिक विचार प्रहार जनशक्ती पक्ष

सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघामध्ये प्रहार संघटनेचे पदाधिकारी आहेत. सामाजिक प्रश्नांबरोबरच दिव्यांग, अन्यायग्रस्तांच्या मदतीसाठी धावून जाणे, कर्जमाफी, जबरदस्तीने कर्जाची वसुली, निकृष्ट कामे, टोल बंदी, पाणीपुरवठा, रस्ते या मूलभूत सोयी-सुविधांबरोबरच महत्त्वाच्या प्रश्नांवर आक्रमक पवित्रा घेत आंदोलन करण्यात प्रहारचे पदाधिकारी पटाईत आहेत. मात्र त्यांचा आक्रमकपणा लोकसभा निवडणूक प्रचारात दिसत नसल्याने त्यांची भूमिका काय असा सवाल सध्या उपस्थित होत आहे. राज्याच्या सत्तेत सहभागी असलेले बच्चू कडू मात्र यावेळी वेगळीच भूमिका आपल्या मतदारसंघात मांडत आहेत. शिवाय राज्यातील आपल्या पदाधिकाऱ्यांना त्यांनी अद्याप कोणताच आदेश दिला नाही. यामुळे पदाधिकारीही शांत आहेत. ऐन निवडणूक टप्प्यात आल्यानंतर अलर्ट करण्याची भूमिका तर त्यांची नसावी ना असा प्रश्न सध्या उपस्थित करण्यात येत आहे.



प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा जिल्हा पातळीवर सर्वच राजकीय पक्षांबरोबरच संबंध आहेत. असे असूनही ते लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात का आघाडी घेत नाहीत. त्याचे नेमके कारण काय, याबाबत कार्यकर्ते संभ्रमात आहेत. प्रहार संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष मोहसीन तांबोळी हे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे निकटवर्तीय मानले जातात. सगळ्याच निवडणुकीत नेहमीच पुढे पुढे असणारे तांबोळी आता कुठेच दिसत नाहीत. यामुळे त्यांच्याही हालचालीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. वेट अँड वॉचच्या भूमिकेत असलेले मोहसीन तांबोळी आणि त्यांचे कार्यकर्ते ऐनवेळी काय निर्णय घेतील हे अद्याप अस्पष्ट आहे. नेहमीच विकासाला आमचा पाठिंबा असतो. यंदाही विकासाबरोबरच आमची युती असेल असे तांबोळी सांगत आहेत. मात्र उघड उघड प्रचारात येणे टाळत आहेत. बाहेरुन शांत असणारी प्रहार संघटना मात्र आतून वेगळीच रणनिती तर आखत नाही ना असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित होत आहे. प्रहारच्या ताकदीचा विजय आणि पराभवावर परिणाम होऊ शकतो असा अंदाजही मोहसीन तांबोळी यांनी वर्तविला आहे.

### आता फक्त संघटना वाढीचे धोरण

प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांचे नेहमीच विकासाला पाठबळ राहिले आहे. विकास, स्थानिक पातळीवरील गणित आणि सहकार्य यावरच बरेच काही अवलंबून आहे. पक्ष व संघटनेचा अद्याप आदेश नाही. आम्ही आमच्या पद्धतीने रणनिती आखात भविष्यात पक्षाला फायदा होईल या पद्धतीने काम करत आहोत. आताच्या निवडणुकीत अंदाज घेऊन पक्ष, संघटना वाढविण्याचे धोरण आहे. आगामी विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपरिषद निवडणुकीत आम्ही ताकद दाखविणार आहोत, असे प्रहार संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष मोहसीन तांबोळी यांनी सांगितले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## जळोली जि.प. शाळेचे पाच विद्यार्थी एटीएस परीक्षेत गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २९ एप्रिल-**



जळोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवून यशाची परंपरा कायम राखली. यामध्ये उंबरे केंद्रात उपासना अमोल नरसाळे केंद्रात प्रथम, पूजा पोपट पवार केंद्रात प्रथम, शुभम शिवाजी नरसाळे केंद्रात तृतीय, रुद्र ज्ञानेश्वर नरसाळे केंद्रात तृतीय, श्रृती शहाजी नरसाळे केंद्रात सहावा क्रमांक पटकाविला आहे. त्यांना मुख्याध्यापक गणपत मोरे, सहशिक्षक जयवंत कापसे, शिवाजी गोरे, रमेश खारे, कैलास नरसाळे, सोमनाथ पवार, शिक्षिका देवकी कलढोणे, दुधाणे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमातही यशस्वी सहभाग असल्याने जळोली शाळेने पंढरपूर तालुक्यात आपला आगळावेगळा ठसा उमटवला आहे. पुढील काळात आपली मुले जिल्हा परिषद शाळेतच दाखल करुन आपल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधावा, असे आवाहन मुख्याध्यापक गणपत मोरे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### नॅशनल फेडरेशन रोलर म्युझिकल चेअर चॅम्पियनशिपमध्ये बार्शीच्या मुलांचे यश

**बार्शी, दि. २९ एप्रिल-**

द म्युझिकल चेअर अँड स्केटिंग स्पोर्ट्स असोसिएशन गुजरातच्या वतीने आयोजित नॅशनल फेडरेशन रोलर म्युझिकल चेअर चॅम्पियनशिप- २०२४ मध्ये बार्शीतील मुलांनी मोठे यश संपादन केले. २७ व २८ एप्रिल रोजी या स्पर्धा अहमदाबाद येथे पार पडल्या. स्केटिंगसह संगीत खुर्ची, स्केटिंगशिवाय संगीत खुर्ची व स्केटिंगसह फ्री स्टाईल या तीन प्रकारांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रियंका येडलवार यांच्या श्रीशा स्केटिंग क्लब बार्शीमार्फत मुलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. वेद अमेय सिंदोल सुवर्ण १, रौप्य १ आणि कांस्य १, वेदांत समाधान बर्डे सुवर्ण १, रौप्य २, अर्णव मंदार कुलकर्णी सुवर्ण २, रौप्य १, सर्वेश शिवशंकर उदबाळे सुवर्ण १, रौप्य २, अथर्व अनंत केसकर रौप्य २, कांस्य १, रामराजे गणेश बारंगुळे सुवर्ण १, रौप्य १ आणि कांस्य १, सोहम दीपक सावंत सुवर्ण ३, कार्तिकेय रवींद्र पवार सुवर्ण ३, अर्जुन अविनाश भुसारी सुवर्ण २, प्रसाद प्रमोद मांडे रौप्य २, कांस्य १, श्रीशा जितेश येडलवार सुवर्ण २, रौप्य १, हर्ष निशांत बेनारे सुवर्ण १, रौप्य १ आणि कांस्य १, कृष्णा आनंद ढाळे सुवर्ण २, रौप्य १, दिग्विजय सूर्यकांत धाकपाडे सुवर्ण २, रौप्य १. देशभरातून विविध राज्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पदक व प्राप्त गुणांकांवरुन महाराष्ट्र राज्याला द्वितीय विजेतेपद प्राप्त झाले. प्रियंका येडलवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले.



### करकंब परिसरामधील महायुती-भाजपाच्या घोंगडी बैठकीला मतदारांचा चांगला प्रतिसाद

**करकंब, दि. २९ एप्रिल-**

माढा लोकसभेतील महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ करकंब येथे पांडुरंग परिवार, भारतीय जनता पार्टी, रयत क्रांती संघटना, विविध घटक पक्षांच्यावतीने करकंब व वाड्या वस्त्यांवर घोंगडी बैठकांद्वारे प्रचार सुरू आहे. या घोंगडी बैठकीच्या प्रचारास मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. करकंब व वाड्या, वस्त्यावर जाऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांत केलेल्या लोकोपयोगी कार्याची माहिती सांगून नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान तसेच माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना खासदार करण्यासाठी या घोंगडी बैठकाद्वारे आवाहन करण्यात येत आहे. यासाठी करकंब येथील पांडुरंग परिवार, भारतीय जनता पार्टी, महायुतीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

### माढा लोकसभा मतदारसंघाकडे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचे विशेष लक्ष

**पिलीव, दि. २९ एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघाकडे भाजपने विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. मतदारसंघात यंदा ज्या घडामोडी घडल्या आहेत. त्या घडामोडीवर मात करुन हा मतदारसंघ पुन्हा भाजपच्या ताब्यात घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साम, दाम, दंड याचा वापर करीत मतदारसंघात स्वतः विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. माळशिरसमध्ये सर्वपक्षीय आघाडीची एकत्र मोट बांधून सर्वांना कामाला लावले आहेच. पण पुन्हा मोहिते-पाटील कुटुंबातील डॉ. धवलसिह मोहिते-पाटील यांना ताकद देत प्रचाराच्या अंतिम टप्पयात आपणाकडे खेचण्यास यश मिळविले आहे. याचा भाजपला नक्कीच फायदा आहे. संपूर्ण माढा लोकसभा मतदारसंघातील किरकोळ नाराजी दूर करीत सर्वांना त्यांनी कामाला लावले आहे तर त्यांनी माढा लोकसभा मतदारसंघात माढा तालुक्यातील वाकाव, सांगोला व अकलूज येथील विजय चौकात सभा घेऊन पदाधिकारी, कार्यकर्त्यांना चांगलेच टॉनिक दिले आहे तर माढा लोकसभा मतदारसंघात ३० एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचारसभा आयोजित केली आहे. यामुळे माढा लोकसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार फिल्डिंग लावली असून पुन्हा एकदा मोदी सरकार येणार आहे. तसेच मोदीच पंतप्रधान होणार आहेत. यामुळे माढा लोकसभा मतदारसंघात आपल्या विचाराचाच खासदार होणे आवश्यक आहे, हे ते जनतेला समजवून सांगत असल्याचे सांगत आहेत.


**फडणवीस यांची जोरदार मोर्चेबांधणी**

# प्रचारातील विस्कळीतपणाचा बसणार फटका!

**अतिआत्मविश्वास नडण्याची भीती**

**सामान्य मतदारांकडे पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २९ एप्रिल-**



दिवसेंदिवस लोकसभा निवडणूक वेगळ्या वळणावर जाऊन प्रचारात रंगत येत आहे. मात्र दक्षिणमधील प्रचार व सभेत कार्यकर्त्यांमधील एकीचे बेकी होत असल्याने विस्कळीतपणाचा फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दोन्ही पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांकडून दोन लाखांच्या पुढे मताधिक्य राहणार असल्याचे सांगत अतिआत्मविश्वास दाखविण्यात येत आहे. त्यामुळे उर्वरित प्रचार काळात अतिआत्मविश्वासाचा फटका कोणाला बसणार? याविषयी चर्चा सुरु आहे.

दक्षिण सोलापूर मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला. मात्र येथील नेत्यांमध्ये गटबाजी व मतभेद मोठ्या प्रमाणावर असल्याने या मतदारसंघात भाजपाने दोनवेळा विधानसभेला आणि तीनवेळा लोकसभेला कमळ फुलवून काँग्रेसला मागे टाकले आहे. दहा वर्षांत आ. सुभाष देशमुख यांनी कोट्यवधींचा निधी आणून तालुक्यात रस्त्यांची जाळे तयार केल्याने मोठ्या प्रमाणात विकासकामे दिसत आहेत. शिवाय इतर विविध क्षेत्रातही विकासनिधी देऊन कार्यकर्त्यांपर्यंत कमळ पोहोचविले आहे. त्यामुळे २०१४ नंतर तालुक्यात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांना पराभूत करून दोनवेळा मोदी लाटेत भाजपाचे उमेदवार निवडून आले. सध्या भाजपाच्या नेते व कार्यकर्त्यांमध्ये मोदी लाटेचा जोरदार प्रचार सुरू आहे. राममंदिर, ३७० कलम, तीन तलाक, शेतकरी सन्माननिधी यासारख्या मुद्यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. मात्र भाजपाच्या प्रचारात विस्कळितपणा दिसून येत आहे. प्रचारसभेतही निष्ठावान भाजपाच्या नेते व कार्यकर्त्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची चर्चा सुरू आहे. दक्षिणमधील अनेक गावांत उमेदवारांचा गावभेटदौरा झाला. मात्र आजही अनेक गावात भाजपाचे कमळ व उमेदवार नाव पोहोचले नसल्याने मोदींच्या नावाचा प्रचार सुरू आहे. भाजपाचे नेते व कार्यकर्ते मोदी लाटेत आ. राम सातपुते दोन ते अडीच लाख मताधिक्यांनी निवडून येणार म्हणत अतिआत्मविश्वास दाखवित असल्याचे जाणकारांमधून बोलले जात आहे. शिवाय मोदींची जाहीरसभा झाल्यामुळे मतदारांवर प्रभाव पडून वातावरण आणखी वातावरण बदलला आहे. गावातील कार्यकर्ते गावात प्रचार करून उमेदवार व चिन्ह पोहोचविण्याऐवजी सोलापुरात नेत्यांसमोर बसून गावातील मताधिक्याच्या गप्पा मारताना दिसून येत आहेत. वास्ताविक पाहता दक्षिणमध्ये आमदारांविषयी नाराजी, सिध्देश्वर कारखाना चिमणी पाडकाम, मित्रपक्षांकडून जबरदस्तीने प्रचार, अनेक गावांतील सरपंच व सदस्यांचे निवडणूक खर्च तक्रार, भाजपामधील गटबाजी, मित्रपक्ष प्रचारात सक्रीय नसणे याकडे पक्षश्रेष्ठी दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे ४ जूनला या नाराजीचा मतदानात रूपांतर झाल्यास नवल वाटू नये, अशी चर्चा सुरू आहे.

भाजपाप्रमाणेच काँग्रेसची अवस्था सुरू आहे. दक्षिणमध्ये उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या गावभेट दौऱ्यात विशिष्ट गटच सक्रीय राहिल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे गटबाजी उफाळून अनेक नेते व कार्यकर्ते प्रचारापासून अलिप्त आहेत. दक्षिणमधून आ. प्रणिती शिंदे यांना २५ हजारांच्या पुढे मताधिक्य मिळणार असल्याचे सांगत कार्यकर्ते बिनधास्त आहेत. भाजपाविषयी नाराजी असल्याने गावभेट दौऱ्यात प्रणिती शिंदे यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र प्रचारातील विस्कळीतपणा व प्रचारसभांमध्ये जुने निष्ठावान कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्याचा फटका बसू शकतो.

अनेक गावांत संयोजकांकडून जाणिवपूर्वक इतर गटाला डावलून श्रेय घेण्यासाठी धडपड सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे. मंद्रुपमध्ये माजी सभापती गुरूनाथ म्हेत्रे, ज्येष्ठ नेते अर्जून टेळे, माजी सरपंच बक्षुभाई मुल्ला, नजीर आवटे यांची अनुपस्थिती खटकणारी होती. त्यामुळे संयोजकाच्या चुकीमुळे काँग्रेसला फटका बसू शकतो. शिवाय गटबाजी असल्याने प्रचारयंत्रणा मिळण्यावरून इतर गट नाराजी व्यक्त करीत विरोधकांकडे दिसत असल्याची चर्चा सुरू आहे. शिंदे यांच्याजवळ दिसणाऱ्या नेत्यांचे कार्यकर्ते मात्र विरोधकांच्या बैठकीत दिसत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. आघाडीचे मित्रपक्षही प्रचारात अग्रेसर राहून प्रचार करताना दिसून येत नाहीत. काँग्रेसकडून मित्रपक्षांना सन्मानपूर्वक वागणूक मिळत नसल्याने त्यांचीही नाराजी उघड होत आहे. वास्तविक पाहता काँग्रेसचा एकगठ्ठा मतदार असणाऱ्या विशिष्ट समाजातच प्रचार दिसून येत आहे. त्यामुळे इतर समाजातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### भाजपाच्या नाराजीचा काँग्रेसला घेता येईना फायदा

सुशिलकुमार शिंदे यांनी पुढाकार घेऊन दक्षिणमधील नेते व कार्यकर्त्यांना एकत्र आणणे गरजेचे आहे. मात्र नेते मताधिक्याच्या गोष्टी करीत असल्याने त्यांचेही दक्षिणकडे दुर्लक्ष होत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे नाराज गट अलिप्त आहे. दक्षिणमध्ये भाजपबद्दल नाराजी असून काँग्रेसला त्याचा फायदा उठविता येणार का? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. प्रचारादरम्यान मतदारसंघाचा क्षेत्र मोठा असला तरी भाजप व काँग्रेसकडून नियोजनपूर्वक प्रचार करण्याऐवजी अतिआत्मविश्वास व्यक्त करीत मताधिक्याच्या गप्पा सुरू असल्याने उमेदवारांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रचार यंत्रणा मिळण्यावरून नाराजी

महायुती व महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची संख्या अधिक असल्याने प्रचारयंत्रणा व बुथ नियोजन आपल्याकडे पाहिजे म्हणत अनेक घटक पक्षांचे नेते दोन्ही उमेदवारांबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यांच्या वरिष्ठ नेत्यांनी आदेश दिला असला तरी 'लक्ष्मी' दर्शन झाल्याशिवाय अनेक नेते प्रचाराकडे पाठ फिरवत आहेत.



## आ. सातपुते यांची वळसंग विहिरीला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २९ एप्रिल-**

भीमनगर, वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील ऐतिहासिक वळसंग विहिरीचे उद्घाटन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रेश्मी धागा आणि चांदीचा ग्लास बुडवून २४ एप्रिल १९३७ रोजी केले होते. या विहिरीला भेट देऊन महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांनी पाहणी केली आणि त्या विहिरीला अभिवादन केले.

या ऐतिहासिक विहिरीची माहिती घेऊन आ. राम सातपुते यांनी सदिच्छा भेट देऊन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या ऐतिहासिक वळसंग विहिरीस विनम्र अभिवादन केले. ऐतिहासिक वळसंग विहिरीला सदिच्छा भेट दिल्यानंतर माझे जीवन धन्य झाल्याचे आ. सातपुते यांनी सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादीचे नेते आनंद चंदनशिवे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, वळसंग ग्राम पंचायत सदस्य श्रावणबाळ गायकवाड, शांतकुमार गायकवाड, मल्हारी वाघमारे, अक्षय गायकवाड, नामदेव गायकवाड, मोहन गायकवाड, महादेव गायकवाड, रवी गायकवाड, सीताराम वाघमारे, श्रीशैल गायकवाड, दीपक गायकवाड, अशोक गायकवाड, संदीप गायकवाड, खंडू गायकवाड, मसाजी गायकवाड, कुलदीप गायकवाड, संतोष गायकवाड आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काँग्रेसला विजयी करा

**आ. प्रणिती शिंदे : निंबर्गी गावभेट दौऱ्यात युवक, महिलांना आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २९ एप्रिल-**



केंद्रातील भाजपा व राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांचे जीवन जगणे मुश्कील केले आहे. पीकविमा, अतिवृष्टी रक्कम, हमीभाव, कांदा अनुदान, दुधाचे अनुदान या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांचा द्वेष व चेष्टा करणाऱ्या भाजपाला धडा शिकविण्यासाठी काँग्रेसला विजयी करण्याचे आवाहन आ. प्रणिती शिंदे यांनी केले.

निंबर्गी येथील प्रचारादरम्यान शेतकरी व महिलांना मार्गदर्शन करताना शिंदे बोलत होत्या. यावेळी माजी आ. दिलीप माने, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील, रूग्णसेवक बाबा मिस्त्री, अशोक देवकते, सरपंच श्रीदीप हसापुरे, उपसरपंच पीरसाब हवालदार, गंगाधर बिराजदार, चेअरमन बाळासाहेब उदाणे, चंद्रकांत काकमारे, तंटामुक्त अध्यक्ष चंद्रकांत पाटील, महादेव फुलारी, जगदेव सोड्डी, रफिक मुल्ला, गैबीसाब इनामदार, आप्पासाहेब माने, प्रदीप खुणे, बसवराज माळगे, इलाई मुल्ला, सिद्धाराम येळवंडे, रावसाहेब आळगी, सिद्धाराम शेट्टी, पंचप्पा सोड्डी, शरणाप्पा चडचणी, संजय लांडगे, सागर ककमारे, महासिद्ध ककमरे, सागर भंडारोटे, सोमा ऐवळे, गुंडाराज ऐवळे, बिरप्पा हलबने, कातू कोळी, राहुल दुपारगुडे उपस्थित होते. दक्षिण तालुक्यातील जनता भाजपा नेत्याच्या खुनशी राजकारण व कटकारस्थानाला कंटाळली आहे. मतदार मतपेटीतून राग व्यक्त करून काँग्रेसला मताधिक्य देणार आहे, असे सुरेश हसापुरे यंनी सांगितले.

### गटबाजी विसरुन मतदान करा

आ. प्रणिती शिंदे या युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणाऱ्या नेत्या आहेत. दक्षिण तालुक्याशी त्यांचे ऋणानुबंध आहेत. भाजपाच्या मनमानी कारभाराला विरोध करण्यासाठी युवक मतदार मोठ्या मताधिक्याने आ. प्रणिती शिंदे यांना विजयी करण्याचे चंग बांधले आहेत. दक्षिणच्या विकासासाठी प्रणिती शिंदे खासदार होणे गरजेचे असल्याने मतभेद व गटबाजी विसरून काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन सरपंच श्रीदीप हसापुरे केले.


# पवारांच्या 'शह'ला फडणवीसांचे 'काटशह'ने उत्तर

**अनेकांना 'उर्जा' अन् रणनीतीला 'सुरूंग'**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ एप्रिल-**

माढा लोकसभा मतदार संघातील उमेदवारी वरून राज्यभर चर्चेत आली असताना धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शरदचंद्र पवार गटाची तुतारी हाती घेऊन आणखी त्यात भर टाकली. त्यामुळे शरद पवार व देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिष्ठेची आणि अस्तित्वाची निवडणूक केली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून केल्या जाणाऱ्या प्रत्येक रणनितीला भाजपकडून सुरूंग लावला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शरद पवारांच्या प्रत्येक 'शह'ला देवेंद्र फडणवीसांकडून 'काटशह'ने उत्तर देत असल्याने या मतदारसंघाची निवडणूक राज्यभर गाजत असल्याचे दिसून येत आहे.

भारतीय जनता पक्षाकडून लोकसभा निवडणुकीसाठी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना दुसऱ्यांदा उमेदवारी दिली. त्यानंतर शरद पवारांनी या मतदारसंघात धनगर समाजाचे असणारे प्राबल्य लक्षात घेता धनगर समाजाला उमेदवारी देण्याची इच्छा असल्याचे घोषणा केली होती. रासपचे महादेव जानकर यांच्याबरोबर बैठकही झाली. त्यानंतर धनगर समाज महाविकास आघाडीकडे झुकू शकतो हे लक्षात येताच चाणक्य निती वापरत देवेंद्र फडणवीस यांनी महादेव जानकर यांच्या पक्षाला परभणीची एक जागा दिली. त्यामुळे शरद पवारांच्या शहला पहिला काटशह देण्यात फडणवीस यशस्वी झाले. दुसरीकडे धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपल्याला डावलून पुन्हा तोच उमेदवार दिल्याचे सांगत बंडाचा झेंडा उगारत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची तुतारी हाती घेतली आणि मैदानात उतरले. तत्पूर्वी त्यांनी मतदारसंघातील भाजप विरोधक व नाराज असणाऱ्यांची मोळी बांधली होती. यामध्ये करमाळ्याचे माजी आ. नारायण पाटील, सांगोल्याचे शेकाप नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील मोहिते-पाटील समर्थक यांना एकत्र करण्यात त्यांना यश आले. करमाळ्याच्या नारायण पाटलांचा पवार गटात प्रवेशही झाला तर त्यांचा विरोधी असणारा बागलगट सक्रीय करून तिथे काटशह दिला तर माळशिरसचे उत्तमराव जानकरांचा पाठिंबा मिळवण्यात राष्ट्रवादीला यश आल्याने ही निवडणूक एकतर्फी होती की काय असे चित्र मतदारसंघात निर्माण झाले असताना खडूस येथे ॲड. सोमनाथ वाघमोडे यांनी सर्व पक्षीय विरोधकांची बैठक घेऊन जनमत अजमाविले व दुसऱ्याच दिवशी उपमुख्यमंत्री फडणवीसांची शिष्टमंडळासह भेट घेऊन पाठिंबा दिला. त्यामुळे दुसरा काटशह देण्यात फडणवीस यशस्वी झाले. दुसरीकडे माढ्याचे आ. बबनराव शिंदे आणि शिवसेनेचे शिवाजीराव सांवत यांच्यातील २५ वर्षांचा राजकीय संघर्ष मिटवून माढ्यातून जास्तीचे लीड मिळण्याचा शब्द घेण्यात फडणवीस यशस्वी ठरले. त्याचवेळी पंढरपूर तालुक्यातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते आणि विठ्ठल सहकारी कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांना आर्थिक अडचणीत आलेल्या कारखान्याला मदत करण्याची भूमिका घेऊन तो गटही आपलासा करण्यात देवेंद्र फडणवीसांनी बाजी मारली. एकूणच शरद पवारांच्या प्रत्येक रणनितीला सुरंग लावण्यात फडणवीस यशस्वी ठरल्याचे दिसून येते.





### धनगर समाजाचा भाजपाकडे ओढा

दुसरीकडे या मतदारसंघात असणाऱ्या व भाजपाचे स्टार प्रचारक असणाऱ्या आ. गोपीचंद पडळकर समर्थक धनगर समाजाच्या दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना ॲक्टिव करीत मानाचे स्थान देण्यात ते यशस्वी ठरत असल्याचे दिसून येते. मतदारसंघात घोंगडी बैठकीच्या माध्यमातून तिसऱ्यांदा मोदींना पंतप्रधान का केले पाहिजे हे पटवून देत आणि सर्वसामान्य जनतेला केंद्र सरकारने दिलेल्या योजनाची माहिती देण्यासाठी बैठकांचा सपाटा लावल्याने धनगर समाज भाजपाकडे झुकत असल्याचे चित्र मतदारसंघात निर्माण झाले आहे.